



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार २१ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# जम्मू-उधमपूरमध्ये अपघातात २१ जणांचा मृत्यू

## प्रवासी म्हणाले- भरधाव वेगात बसचे टायर फुटले, चालकाचे नियंत्रण सुटले; बस 100 फूट खाली कोसळली

**उधमपूर/वृत्तसंस्था :** सोमवारी सकाळी जम्मूच्या उधमपूरमध्ये एका बसचा अपघात झाला. रामनगरहून येणारी बस कागोटजवळ रस्त्यापासून सुमारे १०० फूट खाली कोसळून उलटली. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, या अपघातात २१ जणांचा मृत्यू झाला असून २९ हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत.

जखमींच्या म्हणण्यानुसार, बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी होते आणि ती भरधाव वेगाने धावत होती. कागोट नाल्याजवळ अचानक एक टायर फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस रस्त्यापासून खाली कोसळली. या अपघातात बसचा वरचा भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला.केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये सांगितले की, अपघातात सामील असलेली बस सार्वजनिक वाहतुकीचे वाहन होते. जखमींवर जीएमसी उधमपूर येथे उपचार सुरू आहेत.

दरम्यान, पंतप्रधान मोदींनी मृतांबद्दल शोक व्यक्त केला आणि मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपयांची नुकसान भरपाई जाहीर केली.



प्रवाशांनी सांगितले- बस भरधाव वेगाने जात होती आणि टायर फुटल्यामुळे नियंत्रण सुटले

अपघाताच्या ठिकाणी उपस्थित असलेल्या लोकांनी सांगितले की, बसमधील क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी आणि अतिवेग यामुळे हा अपघात झाला. जखमी प्रवाशांची चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की चालक खूप वेगाने गाडी चालवत होता. टायर फुटल्यामुळे बसचा वेग नियंत्रणात राहिला नाही, ज्यामुळे ती सुमारे १०० फूट उंचीवरून खाली कोसळली.

# ‘राजा’ कायम, पण देशाची संरक्षण स्थिती तणावात



## भेंडवळच्या घटमांडणीचे भाकीत जाहीर

**बुलडाणा /प्रतिनिधी-** संपूर्ण महाराष्ट्रासह शेजारील राज्यांतील बळीराजाचे लक्ष लागून असलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील भेंडवळ येथील घटमांडणीचे भाकीत आज सकाळी ( २० एप्रिल) सूर्योदयाच्या वेळी जाहीर करण्यात आले. ३७० वर्षांची प्रदीर्घ परंपरा असलेल्या या घटमांडणीनुसार, यंदा देशाचा ‘राजा’ कायम राहिल परंतु देशाची संरक्षण स्थिती तणावात राहण्याची भविष्यवाणी करण्यात आली. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर सूर्यास्ताच्या वेळी करण्यात आलेल्या घटमांडणीचे निरीक्षण आज सकाळी करण्यात आले. यानुसार देशाचा राजा (सत्ता) कायम असेल, म्हणजेच सत्ताधारी बदलाचे संकेत दिसत नाहीत. देशाची संरक्षण स्थिती तणावपूर्ण असेल, सीमांवरील हालचाली वाढण्याची शक्यता आहे. देशाची आर्थिक स्थिती फारशी मजबूत राहणार नाही, महागाई किंवा आर्थिक मंदीचे सावट राहू शकते. (पान २ वर)

# राज्यातील 9 आयपीएस अधिका-यांच्या बदल्या

**मुंबई :** नुकत्याच पार पडलेल्या सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या जिल्हा परिषद सदस्यांना मतदानापासून रोखल्याप्रकरणी वादग्रस्त ठरलेले साताराचे पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांची बदली करण्यात आली आहे. दोशी यांची सांगलीच्या पोलिस अधीक्षकपदी नेमणूक करण्यात आली आहे. तर पुण्याचे पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे यांची बदली साताराचे पोलिस अधीक्षक म्हणून झाली आहे. गृह विभागाने सोमवारी गृह राज्यातील ९ आयपीएस अधिका-यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले.या आदेशात दोशी यांचा समावेश आहे. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत दोशी यांच्यावर आरोप झाल्यानंतर त्यांना सत्तीच्या रजेवर पाठवण्यात आले होते. शिवसेना शिंदे गटाच्या आग्रहाखातर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अखेर दोशी यांची बदली करण्याचा निर्णय घ्यावा लागला. (पान २ वर)




# आरोपी उजेर खानविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल

## 15 वर्षिय पीडितेचा जवाब तपासात जोडण्यात आला

### आणखीन 6 मोबाईल जप्त

**परतवाडा लैंगिक शोषण प्रकरण**

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यभरात चर्चेचा विषय ठरलेल्या परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात दुसऱ्या क्रमांकाचा आरोपी उजेर खान विरोधात आणखी एका गुन्हाची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान काल या प्रकरणात एका १५ वर्षीय पीडित मुलीचा जबाब नोंदवण्यात आला होता, तो मूळ गुन्हाच्या तपासात जोडण्यात आला आहे, अशी माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक (पान २ वर)



### सोमय्यांनी घेतला आढावा



परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणाचे गांभीर्य पाहून भाजप नेते किरिट सोमय्या परतवाडा पोलीस ठाण्यात पोहचले. त्यांनी पोलिसांकडून तपासाचा आढावा घेतला आणि आवश्यक निर्देश दिले. पोलिसांच्या तपासावर त्यांनी समाधान व्यक्त केले.

### वझ्झर डॅमवर तरुणीने केला आत्महत्याचे प्रयत्न

परतवाडा जवळील वझ्झर डॅमवर आज सोमवार २० एप्रिल रोजी एक तरुणीने आत्महत्या करण्याच्या प्रयत्न केला. यामुळे एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच पोलीस आणि महसूल विभागाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तरुणीला वेळीच वाचवण्यात यश आले असले तरी, या घटनेने मुळे सेक्स स्कँडल प्रकरणात धक्कादायक वळण आले आहे. पोलिसांनी तपास सुरू केला असून, तरुणीने आत्महत्येचा प्रयत्न का केला, याची चौकशी केली जात आहे. विशेष म्हणजे, या तरुणीचा परतवाडातील ‘अयान प्रकरणा’शी काही संबंध आहे का, याचीही पोलिसांकडून सखोल तपास केला जाणार आहे. कारण आरोपी अयान हा मुलींना भेटण्यासाठी वारंवार याच वझ्झर डॅमवर घेऊन जात होता, अशी माहिती समोर आली आहे. या दोन्ही घटनांमुळे परतवाडा-अमरावती सेक्स स्कँडल प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. पोलिसांनी दोन्ही प्रकरणांची जोडणी तपासण्यास सुरुवात केली असून, लवकरच अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. परतवाडा परिसरात लैंगिक शोषणाच्या घटनांबाबत स्थानिक स्तरावर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ‘बुलडोझर बुद्धी’

## महुआ मोइत्रांची योगीवर टीका

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालमधील एका सभेत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे एक अत्यंत प्रसिद्ध असलेले वाक्य स्वामी विवेकानंद यांचे असल्याचे सांगितले. यावरून तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा यांनी योगी आदित्यनाथ यांच्यावर जोरदार टीका केली आहे. मोइत्रा यांनी योगी आदित्यनाथ यांचा उल्लेख ‘बुलडोझर बुद्धी’ असा केला आहे. महुआ मोइत्रा यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, हॅलो बुलडोझर बुद्धी योगी आदित्यनाथ, तुमची माहिती तपासून घ्या. नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणाले होते, तुम मुझे खून दो मैं तुम्हें आजादी दूंगा. स्वामी विवेकानंद असे म्हणाले नव्हते. कृपया फॅटा प्यायला उत्तर प्रदेशात परत जा आणि बंगालला सोडून द्या. तुम्ही हास्यास्पद आहात.



तृणमूल काँग्रेसने आपल्या अधिकृत हँडलवरून उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचा हा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये योगी आदित्यनाथ तुम मुझे खून दो मैं तुम्हें आजादी दूंगा हे वाक्य स्वामी विवेकानंदांचे असल्याचे सांगताना ऐकू येत आहेत. यावरून तृणमूलने भाजपावर टीका केली आहे. या चुकीतून भाजपाचे बंगालच्या इतिहासाबद्दलचे (पान २ वर)

# काँग्रेस, तृणमूल, द्रमुक, सपा ते ठाकरे आणि शरद पवारांचा पक्ष महिलांविरोधी

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, १७ एप्रिल हा दिवस देशाच्या राजकीय व सामाजिक वाटचालीतील एक महत्त्वाचा ठरेल अशी अपेक्षा होती. एक निर्णायक क्षण ठरेल असे वाटले होते. पण दुर्दैवाने काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, ठाकरे गट, शरद पवार गट, समाजवादी पार्टी आदी विरोधी पक्षांनी आपल्या महिलाविरोधी मानसिकतेचे प्रदर्शन करत या विधेयकाला आवश्यक ते दोन तृतीयांश मते मिळू दिली नाही. ७० कोटी महिलांचा विश्वासघात करत या विधेयकाची भ्रूणहत्या विरोधकांनी केली. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे अशा प्रकारची हत्या केल्यानंतर जो आनंदोत्सव त्यांनी साजरा केला, तो एक प्रकारे भारतातील समाजसुधारकांच्या विचारांवर केलेले तांडव होते. मुख्यमंत्री म्हणाले, मला अतिशय दुःख आहे की, महात्मा जोतिबा फुले यांची २०० वी जन्मशताब्दी सुरू असताना विरोधकांनी त्यांच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम केले. त्यात भाषणापुरते महात्मा फुलेंचे (पान २ वर)






# देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात अंधश्रद्धा वाढली

## भोंदू बाबांचे प्रस्थ सरकार पुरस्कृतचः 'अंनिस'च्या श्याम मानव यांचा थेट निशाणा

**बुलढाणा /प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात राज्यात अंधश्रद्धा वाढली असून यातूनच खरात प्रकरण घडले. राज्य सरकारमुळेच अशोक खरात हा मोठा बाबा झाला. अंधश्रद्धेचा प्रसार करण्यासंदर्भात रूपाली चाकणकर या देखील सहआरोपी होउ शकतात, असा आरोप अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अंनिस) संस्थापक-राष्ट्रीय संघटक श्याम मानव यांनी केला.



खरात प्रकरणासंदर्भात अंधश्रद्धा आणि जादूटोणा विरुद्ध विज्ञानवाद दृष्टिकोन रुजवण्यासाठी अंनिसने राज्यभरात प्रचार-प्रसार दौरे सुरू केले आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून ‘वृक्ष तिथे छाया’ बुवा तिथे बाया जनजागृती अभियान राज्यभर राबविण्यात येत आहे. यानिमित्त आज, २० एप्रिलला श्याम मानव बुलढाणा दौ-यावर होते. प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्य सरकारवर गंभीर आरोप केले.

■ **बागेश्वर धीरेंद्र शास्त्रीवर कारवाई का नाही?**

सध्या राज्यात भोंदू खरात प्रकरण गाजत आहे. प्रदीप मिश्रा, धिरेंद्र शास्त्री, बागेश्वर यांच्या सारखे बुवा-बाबांचे प्रस्थ वाढत आहे. खरात यांच्यावर कारवाई करण्यात आली ते योग्यच झाले, पण धीरेंद्र शास्त्री, बागेश्वर आणि इतरांवर कारवाई का नाही, असा प्रा. मानव यांनी उपस्थित केला. राज्यात बुवा बाबांचे प्रस्थ वाढवण्याचे, त्यांना प्रतिष्ठा देण्याचे काम सरकार पुरस्कृत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केला.

■ **अधिका-यांवर, यंत्रणांवर मोठे दडपण-** धीरेंद्र शास्त्री व प्रदीप मिश्रा यांच्यावरही आरोप आहे. कायद्यानुसार या दोघांवर कारवाई करणे सहज शक्य आहे. मात्र खरातसारखा न्याय या लोकांना लावण्यात आलेला नाही. खरात वाईट व इतर चांगले, असे होउ शकत नाही. गेल्या काही वर्षांपासून जादूटोणाविरोधी कायद्याचा प्रचार व प्रचार आणि अंमलबजावणी करण्यात येत नाही. अजित पवार यांनी याबाबत सकारात्मकता दर्शविली होती. कामही सुरू झाले, मात्र फडणवीस यांनी नुसते झुलवत ठेवले. सरकारने या कायद्याचा प्रचार आणि प्रसार करण्याबाबत पूर्ण उदासीनता दाखवली आहे. हा कायदा राबवायचाच नाही, असे त्यांचे ठरले असल्याचे ते म्हणाले. अधिका-यांवर, यंत्रणांवर फार मोठे दडपण आहे. अशी अवस्था आपण आयुष्यात कधी पाहिली नाही. काँग्रेसच्या काळात गुलाब बाबाचे भक्त शंकरराव चव्हाण आणि सत्यसाईबाबा भक्त विलासराव देशमुख यांच्यासारखे नेते मुख्यमंत्री असताना देखील त्यांच्या विरोधात पोलीस कारवाई करीत. आता साधा नगरसेवक येउन काम बंद पाडतो. अलीकडच्या काळात जादूटोणाविरुद्ध कायद्याचा प्रभावी प्रचार प्रसार झाला असता तर खरात सारखा भोंदू उदयास आलाच नसता. या प्रकरणात अनेक लोक अडकले त्याला जबाबदार राज्य सरकार असल्याचा आरोप मानव यांनी केला.



### काँग्रेसच्या काळात पोलीस निर्णय घ्यायचे

काँग्रेसच्या काळात बुवा-बाबांवर एफआयआर दाखल करताना पोलीस स्थानिक पातळीवर निर्णय घ्यायचे. मात्र आता सरकारच्या संमतीशिवाय काहीही करता येत नाही. खरातसारख्या भोंदूंना प्रतिष्ठा देण्याचे काम सरकारच्या माध्यमातूनच सुरू आहे. भाजप मंत्रिमंडळातील एका मोठ्या मंत्र्यांने मुख्यमंत्री होण्यासाठी खरातकडे पूजा केल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. या पार्श्वभूमीवर खरात विरुद्ध कारवाई झाली, असे प्रा. मानव यांनी सांगितले.

# कडूंना विधान परिषदेची ऑफर?

**अमरावती /प्रतिनिधी :** विधानपरिषदेच्या रिक्त झालेल्या ९ जागांसाठी येत्या १२ मे रोजी निवडणूक होणार असल्याने राजकीय पक्षांमध्ये हालचालींना वेग आलेला असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून माजी राज्यमंत्री आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांना विधान परिषद सदस्यपदाची ऑफर देण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि बच्चू कडू यांची आज मुंबईत भेट झाली. यावेळी विधान परिषदेच्या निवडणुकीसंदर्भात दोघांमध्ये चर्चा झाल्याचे बोलले जात आहे. बच्चू कडू यांना यावेळी शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडून संधी दिली जाईल, असे संकेत मिळाले आहेत. पण, अद्याप बच्चू कडू यांनी त्यांची भूमिका जाहीर केलेली नाही.

गेल्या काही महिन्यांपासून बच्चू कडू हे सरकारविरोधी आंदोलनांमुळे चर्चेत आहेत. त्यांनी शेतक-यांना संपूर्ण कर्जमाफी मिळावी, यासाठी मोठे आंदोलन केले होते. अखेर सरकारला जून २०२६ पुर्वी शेतक-यांची कर्जमाफी केली जाईल, असे आश्वासन द्यावे लागले होते. त्यानंतर बच्चू कडू यांनी मोळघाटातील आदिवासींच्या प्रश्नांवर महिनाभरापुर्वी भर उन्हात पदयात्रा काढली होती. त्याचीही दखल सरकारला घ्यावी लागली. राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी चिखलदरा येथे पोहचून मेळघाटातील प्रश्न सोडविण्याबाबत सकारात्मक भूमिका दर्शवल्यानंतर बच्चू कडू यांनी आंदोलन स्थगित केले होते.



शेतकरी कर्जमाफी, दिव्यांग, आदिवासींच्या प्रश्नांवर सत्ताधा-यांवर सडकून टीका करणारे, आंदोलनात्मक भूमिका घेणारे बच्चू कडू हे विधान परिषद सदस्यपदाची ऑफर स्वीकारणार का, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. बच्चू कडू हे एकनाथ शिंदे यांचे समर्थक मानले जातात. एकनाथ शिंदे यांच्या बंडाच्या वेळी बच्चू कडू यांनी त्यांची साथ दिली होती. त्यामुळे कडू यांना टीका देखील सहन करावी लागली होती. पण, बच्चू कडू यांनी एकनाथ शिंदे यांच्या पक्षातील नेत्यांसोबत चांगले संबंध राहिलो आहेत. यापुर्वी आंदोलनाच्या वेळी मध्यस्थी करण्यासाठी शिंदे गटाचे नेते समोर आल्याचे चित्र दिसले.

**दोन जागांसाठी स्पर्धा-** विधान परिषदेच्या ९ जागांसाठी ही निवडणूक होत असताना पक्षीय बलाबलाचा विचार करता विधानसभेतील सध्याच्या आमदारांच्या संख्येनुसार एका आमदाराला निवडून येण्यासाठी २८ ते २९ मतांच्या कोट्याची गरज भासणार आहे. शिवसेनेचे (शिंदे गट) दोन सदस्य सहज निवडून येउ शकतात.



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# बढती-बदलीच्या जाचक नियमांविरोधात शिक्षण मंडळाच्या कर्मचाऱ्यांचे आंदोलन

## काळया फिती लावत आंदोलन, २८ एप्रिलपासून 'काम बंद' चा इशारा



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी २० एप्रिलपासून आंदोलन सुरू केले आहे. कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती आणि बदलीबाबत कार्यकारी परिषदेने घेतलेला अन्यायकारक निर्णय रद्द करावा, या मुख्य मागणीसाठी अमरावती विभागीय शिक्षण मंडळातील कर्मचारी एकवटले आहेत. सोमवारी काळया फिती लावत आंदोलन करण्यात आले. प्रशासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास २८ एप्रिलपासून पूर्णतः 'काम बंद' आंदोलन करण्याचा इशारा संयुक्त कृती समितीने दिला आहे.

या आंदोलनामुळे आगामी निकालाच्या कामावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आता प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हे आंदोलन संघटना सचिव विश्वनाथ कासारकर व राजेश हनुमंते यांच्या नेतृत्वात करण्यात येत आहे.शिक्षण मंडळ ही १९६५ च्या अधिनियमान्वये एक स्वायत्त संस्था आहे. १९९३ पासून मंडळाचे कर्मचारी आणि संघटनांच्या सहमतीने बदल्या व पदोन्नतीचे निकष ठरलेले होते. मात्र, डिसेंबर २०२५ मध्ये नवीन अध्यक्षांच्या नियुक्तीनंतर, कर्मचारी संघटनांना विश्वासात न घेता शासकीय बदली नियम २००५ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय स्वायत्त संस्थेच्या नियमावलीला छेद देणारा असून यामुळे कर्मचाऱ्यांचे आर्थिक, मानसिक आणि शैक्षणिक नुकसान होणार असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.आंदोलक कर्मचाऱ्यांच्या मते, मंडळ कार्यालयातील एकूण ५९१ पदांपैकी ३८६ कनिष्ठ लिपिकांची पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण येत आहे. तरीही कर्मचारी परीक्षेची व निकालाची कामे वेळेत पूर्ण करत आहेत. वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रशासन पदभरतीबाबत उदासीन असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.कर्मचारी महासंघटना आणि बहुजन कर्मचारी कल्याण महासंघ यांच्या संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू झाले आहे. 'प्रशासनाने आमचे जुने निकष मोडीत काढून कर्मचाऱ्यांवर अन्याय केला आहे. जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर २८ एप्रिलपासून मंडळाचे सर्व कामकाज बंद पाडले जाईल,' असा इशारा समितीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.माध्यमिक (इ.१०वी) व उच्च माध्यमिक (इ१२वी) शिक्षण मंडळ, पुणे यांचे अंतर्गत असलेले अमरावती विभागीय मंडळ, अमरावती येथील कर्मचारी महासंघटना व बहुजन कर्मचारी कल्याण महासंघ यांचे संयुक्त कृती समितीचेवतीने दिनांक २० एप्रिल २०२६ पासून आंदोलन सुरु झाले आहे. मागण्या मान्य न झाल्यास दिनांक २८ एप्रिल २०२६ पासून मंडळ प्रशासनास काम बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला आहे.

## संपात सहभागी होणा-या शासकीय-निमशासकीय कर्मचा-यांवर शिस्तभंगाच्या कारवाईचा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :**विविध प्रलंबित मागण्यांसाठी २१ एप्रिल २०२६ पासून बेमुदत संप पुकारण्याबाबत राज्य सरकारी, निमशासकीय कर्मचा-यांनी शासनास नोटीस दिली असून, या पार्श्वभूमीवर या संपामध्ये सहभागी होणा-या कर्मचा-यांविरु द्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा शासनाच्या वतीने देण्यात आला आहे.राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, राज्य सरकारी गट-ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी २१ एप्रिलपासून राज्यव्यापी संपाची नोटीस शासनास दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील विविध शासकीय, निमंशासकीय कार्यालये आणि इतर अनेक शासकीय सेवा प्रभावित होण्याची शक्यता आहे.महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ६ च्या तरतुदीनुसार कोणत्याही शासकीय कर्मचा-याला संप करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. काम नाही, वेतन नाही हे केंद्र शासनाचे धोरण राज्य शासनही अनुसरत आहे. याबाबत शासनाने २० एप्रिल रोजीच परिपत्रक निर्गमित केले असून सर्व शासकीय कर्मचा-यांचे लक्ष वेधण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सर्व शासकीय, निमशासकीय कर्मचा-यांनी जनहिताच्या दृष्टीने आपला प्रस्तावीत संप मागे घेउन, नियमितपणे कर्तव्य बजावावे, असे आवाहन प्रसिद्धिपत्रकात करण्यात आले आहे. नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होवू नये, यासाठी शासकीय कामकाज न थांबवता योग्य मार्गाने आपल्या मागण्या शासनापुढे मांडाव्यात, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे केले आहे.

## नांदगाव व भातकुलीत गोवंश तस्करांवर कारवाई

*अमरावती/प्रतिनिधीः*-अवैध गोंवश तस्करी करणाऱ्यांवर नांदगाव पेठ व भातकुली पोलिसांनी कारवाई करून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आणि चार आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल केले आहे. नांदगाव पेठ पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की मोर्शी ते अमरावती कडे येणाऱ्या मालवाहू वाहनांमध्ये गोवंश तस्करी होत आहे. यावरून पोलिसांनी राष्ट्रीय महामार्गावर रेवा हॉटेल जवळ कार्यवाही करून एक लाख ८७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अनिकेत रमेश गणवीर (वय ३५, नांदगाव पेठ), फिरोज खान युसुफ (वय ४५,मुर्तीजापुर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. भातकुली मध्ये पोलिसांनी कारवाई करून आरोपी शेख कासम हसन कुरेशी (वय ६५) आणि मोहम्मद हसनेन (वय १९) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून १ लाख ७५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन वेगवेगळ्या प्रकरणात पोलिसांनी कारवाई करून गोवंशाला मुक्त केले आणि आरोपीविरुद्ध कारवाई केली.



## महाराष्ट्र दिन कार्यक्रम शहर परेड मैदानावर साजरा होणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्याचा ६७वा स्थापना दिवस १ मे रोजी साजरा होणार आहे. यावर्षीचा साजरा होणारा मुख्य शासकीय कार्यक्रम पोलिस मुख्यालयाच्या शहर परेड मैदानावर होणार आहे. यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी केले आहे.

# आजपासून प्रत्येक पंचायत समितीत रोजगार मेळावा



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा येथील गार्डियन ट्रेनिंग अकादमीचे कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमेंतर्गत मंगळवार, दि. २१ एप्रिलपासून दि.८ मेपर्यंत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक पंचायत समितीमध्ये हा रोजगार मेळावा होणार आहे. मेळाव्यामध्ये हैद्राबाद प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येते. कंपनीला आवश्यक असलेल्या पात्रतेच्या पदासाठी सदर कंपनीचे प्रतिनिधी लेखी परीक्षा घेऊन मुलाखती घेतील. मेळाव्यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी कागदपत्रांसह उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६, ८९८३४१९७९९, ८६०५६५४०२५ किंवा amravatirojgar@gmail.com या मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांनी बायोडाटा, पासपोर्ट फोटो आणि आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

पान १ व १० वरून

## 'राजा' कायम, पण देशाची

अमरावती-बुलडाणा सीमेवर असलेल्या भेंडवळ येथे महान तपस्वी चंद्रभान महाराज वाघ यांनी ३५०-३७० वर्षांपूर्वी ही परंपरा सुरू केली होती. आजही त्यांचे वंशज ही परंपरा पुढे चालवत आहेत. शेतात मध्यभागी खड्डा खोदून त्यात मातीचा घट मांडला जातो. त्यावर पाण्याने भरलेली घागर आणि विविध खाद्यपदार्थ (पापड, वडा, भजा) ठेवले जातात. घटाच्या भोवती १८ प्रकारची धान्ये मांडली जातात. सकाळी या घटात आणि धान्यात होणा-या बदलांवरू न वर्षभराचे भाकीत वर्तवले जाते. विज्ञानाच्या युगात या घटमांडणीला कोणताही शास्त्रीय आधार नसल्याचे अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून सांगितले जाते. मात्र, तरीही गेल्या साडेतीनशे वर्षांपासून शेतक-यांचा यावर गाढा विश्वास आहे.

**पाउस आणि महापुराचा धोका-**शेतक-यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या हवामान अंदाजाबाबत भेंडवळच्या भाकितात म्हटले आहे की, पावसाची सुरु वात जोमदार असेल, जूनमध्ये भरपूर पाउस होईल. जुलैमध्ये पावसाचे प्रमाण सर्वसाधारण राहील. ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात पावसाचे प्रमाण कमी राहून ओढ देण्याची शक्यता आहे. तर अनेक भागात अतिवृष्टीमुळे महापुराचे संकट ओढवेल, ज्यामुळे पिकांचे नुकसान होउ शकते.

**कापूस-तांदूळ जोमात, पण रोगराईची भीती**

यंदा पिकांवर रोगराईचे प्रमाण जास्त राहण्याचा अंदाज आहे. कापूस, तांदूळ, तीळ आणि बाजरीचे उत्पादन भरपूर येईल. ज्वारी, तूर, मूग, उडीद, मटकी, जवस आणि वाटाणा ही पिके सर्वसाधारण राहतील.

## राज्यातील 9 आयपीएस

बदली झालेले पोलिस अधिकारी

संदिप घुगे : पोलिस अधीक्षक, सांगली- पोलिस उपायुक्त सुरक्षा राज्य गुप्तवार्ता, मुंबई

योगेश गुप्ता : पोलिस अधीक्षक, कोल्हापूर - पोलिस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र

निलोत्पल : पोलिस अधीक्षक, गडचिरोली - पोलिस अधीक्षक, कोल्हापूर

महेश्वर रेड्डी : पोलिस अधीक्षक, जळगाव - पोलिसअधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे

श्रीकांत ढिवरे : पोलिस अधीक्षक, धुळे - पोलिस अधीक्षक, जळगाव

राजकुमार शिंदे : पोलिस उपायुक्त, पुणे - पोलिस अधीक्षक, वाशिम

## 'बुलडोझर बुद्धी'

धक्कादायक अज्ञान आणि अनादर उघड झाल्याचे टीएमसीने म्हटले आहे. योगी आदित्यनाथ यांनी पुन्हा एकदा बंगालच्या इतिहासाबाबत भाजपाचे धक्कादायक अज्ञान आणि अनादर उघड केला आहे. त्यांनी तुम मुझे खून दो मैं तुम्हें आजादी दूंगा हे अजरामर वाक्य स्वामी विवेकानंदांचे असल्याचे सांगितले. जे नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे आहे. दोघे पूर्णपणे वेगळे आदर्श आहेत. दोघांचा पूर्णपणे वेगवेगळा वारसा आहे. दोघेही बंगालचे सुपुत्र आहेत. एका व्यक्तीने एकाच वाक्यात या दोघांचा अपमान केला आहे, असे टीएमसीच्या पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यांना स्वामी विवेकानंद आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यातील फरक सांगता येत नाही. एकाचे वाक्य दुस-याचे म्हणून सांगतात, नेताजी म्हणत स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याला हार घालतात. आणि तरीही हे लोक सोनार बंगला घडवण्याचे स्वप्न पाहण्याचे धाडस करतात. त्यांच्या अज्ञानाची खोली ही फक्त त्यांच्या अहंकाराशी जुळणारी आहे, असे पोस्टमध्ये म्हटले आहे. पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुका २३ एप्रिल आणि २९ एप्रिल अशा दोन टप्प्यांत होणार असून, ४ मे रोजी मतमोजणी पार पडणार आहे. राज्यात विधानसभेच्या एकूण २९४ जागा आहेत आणि सत्ता स्थापनेसाठी कोणत्याही पक्षाला किमान १४८ जागांच्या बहुमताची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात निवडणूक प्रचाराने जोर पकडला असून भाजपा आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात जोरदार लढत होताना पाहायला मिळत आहे.

## काँग्रेस, तृणमूल, द्रमुक, सपा

नाव घेणारे हे पक्ष पूर्णतः उघडे पडले. सभागृहात ३ विधेयके मांडण्यात आली होती. १३४ वे घटनादुरु स्ती विधेयक, परिसीमन विधेयक व केंद्रशासित प्रदेश विधेयक यांचा त्यात समावेश होता. आपल्याला कल्पना असेल की, १९७६ मध्ये देशात डीलिमिटेशन झाले, तेव्हा घटनादुरु स्ती करू न आपण निर्णय घेतला की, १९७१ ची लोकसंख्या फ्रिज ठेवून २००० सालापर्यंत डीलिमिटेशन होणार नाही. यासंदर्भात २००२ साली डीलिमिटेशन कमिशन अस्तित्वात आले, तेव्हा महाराष्ट्रासह दक्षिणेतील राज्यांवर अन्याय होउ नये यासाठी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्याला पुन्हा २० वर्षांची वाढ दिली. २०२३ साली महिला आरक्षणासाठी घटनादुरु स्ती झाली, त्यावेळी जनगणना व डीलिमिटेशन या दोन्ही गोष्टी पूर्ण करून हे विधेयक लागू करण्यात येईल अशी घटनादुरु स्ती झाली. याचा अर्थ परवा जी विधेयके आली, ती काही अचानक आली नाही.

**१ कोटी महिलांच्या सह्या गोळा करणार-**महिलांच्या अधिकारांची भ्रुणहत्या होत असेल, तर त्याविरोधात लोकशाहीत जनमताचा रेटा तयार केला जाईल. आपण महिलांचा सामना करू शकणार नाही असे ज्या दिवशी वाटेल, त्या दिवशी हे राजकीय पक्ष वठणीवर येतील. महिला आरक्षण विधेयकाला मान्यता देतील. त्यासाठी महायुतीतील सर्वच घटकपक्ष जनमत तयार करण्याचे काम करतील. महिलांना संघटित करण्याचे काम करू . या बिलाच्या समर्थनार्थ महाराष्ट्रातील १ कोटी महिलांच्या सह्या गोळा केल्या जातील. त्याचबरोबर तालुका पातळीपर्यंत मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जाईल.

**जनमताचा रेटा तयार करणार-** भारतीय जनता पक्षाने यासंदर्भातील मेळावा बोलावला आहे. तिथे मित्रांना निमंत्रित करू. सर्व पक्ष महिलांमध्ये जनजागृती करू न, महाराष्ट्रात काँग्रेस, शरद पवार आणि उबाठाचा चेहरा उघडा करू . निश्चितपणे असा जनमताचा रेटा तयार होईल, की त्यांना निश्चितपणे महिला आरक्षण विधेयकाला मंजूर करू न द्यावा लागेल. जोपर्यंत महिलांना आरक्षण मिळत नाही तोपर्यंत आता आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## आरोपी उजेर खानविरुद्ध आणखी

विशाल आनंद यांनी आज सोमवार २० एप्रिल रोजी एका पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी सांगितले की, गुन्ह्यातील आरोपी उजेर खान इकबाल खान (वय २० वर्ष रा. परतवाडा) हा परतवाडा येथील एका १६ वर्षीय मुलीच्या संपर्कात होता. ही बाब पीडितेच्या पालकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी आरोपीला तसे न करण्याबाबत समजावून सांगितले होते. परंतु त्यानंतरही आरोपीने पिडीतेला मोबाईल फोनद्वारे संपर्क करणे चालू ठेवल्याचे पिडीतेच्या पालकांच्या निदर्शनास आले. त्यावरून पिडीतेच्या आईने परतवाडा पोलीस ठाण्यात नोंदविलेल्या तक्रारीच्या आधारे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. विशेष तपास पथकाच्या देखरेखीखाली या गुन्ह्याचा तपास करण्यात येत आहे.या प्रकरणात एका १५ वर्षीय पिडीतेने पोलीसांसमोर जबाब देण्याची सहमती दर्शविल्यानंतर विशेष तपास पथकातील महिला पोलीस अधिकारी तसेच महिला व बाल कल्याण अधिकाऱ्यांसमोर पीडितेचा जबाब नोंदविण्यात आला आहे, हा जबाब मूळ गुन्ह्याच्या तपासात जोडण्यात आला आहे.

या प्रकरणात आरोपींकडून जप्त करण्यात आलेले ५ मोबाईल यापूर्वीच तांत्रीक विश्लेषणाकरिता न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून या व्यतिरिक्त जप्त करण्यात आलेले इतर ६ मोबाईल, १ लॅपटॉप, १ टॅब आणि एक हार्ड डिस्क त्वरीत विश्लेषणासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात येत आहेत, असे पोलीस अधीक्षकांनी सांगितले.

## ऑनलाईन बेटिंगचा पर्दाफाश;

फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात 'FINE EXCH' या आयडीचा वापर करण्यात आला असून ती आयडी यवतमाळ येथील रितेश जोशी याच्याकडून घेतल्याचे उघड झाले आहे. तसेच सट्टयाची आर्थिक उलाढाल पुणे येथील गणेश उर्फ परेश भुत उर्फ अग्रवाल याच्याकडे दिली जात असल्याचेही तपासात समोर आले आहे. या कारवाईत महेश सुरेश पाटकर (वय ३४, अमरावती), अभिजीत अरुण पेटकर (वय ३६, वरूड) व सागर रामकृष्ण निबंरते (वय ३०, बडनेरा) या तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, रितेश जोशी (यवतमाळ) व गणेश उर्फ परेश भुत उर्फ अग्रवाल (पुणे) हे आरोपी निष्पन्न झाले आहेत. आरोपींकडून ९ मोबाईल फोन (३ लाख ६० हजार रुपये), २ लॅपटॉप (२ लाख रुपये) तसेच जुगार साहित्य व ग्राहकांच्या हिशोबाचे रजिस्टर असा एकूण ५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ व सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.फेजरपुरा पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## भ्रष्टाचारावर गाजला

सादर झाल्यानंतर संबंधितांवर एफआयआर दाखल करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. विरोधी पक्षनेता विलास इंगोले यांनी प्रस्ताव क्रमांक ३३ अंतर्गत प्रशासकीय कार्यकाळातील कामावर चर्चा उपस्थित केली. त्यांनी आरोप केले की, जिल्हा नियोजन आणि शासन निर्धारित कामे ऑफलाइन निविदाद्वारा देण्यात आली. तसेच नियम टाळण्यासाठी कामे तुकड्यांमध्ये विभागून मंजूर करण्यात आली. दहा लाखापर्यंत कामासाठी आवश्यक असलेली निविदा प्रक्रिया टाळण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी ऑनलाइन टेंडर प्रक्रिये ऐवजी ऑफलाईन पद्धतीचा अवलंबून करून भ्रष्टाचारास खतपाणी घातल्याचा आरोप करत संबंधित कर्मचाऱ्यांवर कार्यवाहीची मागणी केली. स्वीकृत नगरसेवक प्रशांत देशपांडे यांनी या घटनांना न्यायालयापेक्षाही गंभीर असे संबोधले, तर बबलू शेखावत यांनी तत्कालीन आयुक्तांवर मनपाची लूट केल्याचा आरोप केला. गटनेता चेतन गावंडे यांनी पाटबंधारे विभागाचा जीआर महापालिकेला लागू केल्या बाबत प्रश्न उपस्थित करत संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी केली. दरम्यान स्वच्छता समितीच्या अहवालावरूनही सभागृहात चर्चा रंगली. अनिल अग्रवाल यांनी अहवालातील त्रुटीवर कार्यवाही करण्याची मागणी केली तर गुड्डू धर्माळे यांनी कंत्राटदाराने ९० दिवस उलटणूनही काम सुरू न केल्याबाबत प्रशासनाला जाब विचारला. नगरसेवक चंदू खेडकर यांनी सभागृहात एक ऑडिओ रेकॉर्डिंग सादर करत संबंधित अधिकाऱ्यांवर सदस्यांवर दबाव टाकण्याचा आरोप केला. एका दिवसात ६० फोन आल्याचा दावा करत त्यांनी कार्यवाहीची मागणी केली. महापौर श्रीचंद तेजवानी यांनी चौकशी करून योग्य ती कार्यवाही केली जाईल असे आश्वासन दिले. मनपा प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह यामुळे निर्माण झाले आहे. पुढील चौकशी अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. आमसभेमध्ये जोरदार घमासान यामुळे आज पाहायला मिळाले.

## बंटी-बबली स्टाईल चोरीचा

मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथक प्रमुख पोउपनि. सागर ठाकरे यांच्या नेतृत्वात पथकातील कर्मचाऱ्यांनी ही यशस्वी कारवाई केली.

## तापमानाची तीव्रता

प्रतिकूल परिणाम होऊ नये, यासाठी हा खबरदारीचा उपाय योजण्यात आला आहे. कोणत्याही परिस्थितीत सकाळी १० नंतर शाळा सुरू ठेवता येणार नाहीत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याचे पुरेसे पाणी, सावलीची व्यवस्था आणि उष्मालाटेपासून संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ नुसार कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनातर्फे देण्यात आला आहे.

## सर्पदंशाने युवकाचा मृत्यू

अखेर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. सध्या त्यांचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आला असून, पुढील वैद्यकीय व कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे चेडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## सफाई कर्मचाऱ्यांचे मानधन

या कामावर अवांतर व्यक्तीना काम देऊन मेहतर समाजाचा हक्क मारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे समाजातील युवक, महिलांचे बेरोजगारीचे जास्त प्रमाणात वाढ झाली आहे. या कारणामुळे मेहतर समाजावर फार मोठा अन्याय होत असुन उपासमारीची पाळी येत आहे. तसेच ठेकेदार हा कुटनीतीचा वापर करून मजुरांमध्ये फूट पाडण्याचे कट कारस्थान रचुन स्वतःची पोळी भाजण्याचे काम करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच वेतन देत असताना धर्म समानता न ठेवता हिंदू दलितांवर अन्याय करत असल्याचा आरोपही गावंडे यांनी केला आहे.

इतर दोन धर्म बांधवांना दोन महिन्याचे पगार देण्यात आले.परंतु हिंदू दलीत समाजातील कामगारांना वेतन देण्यात आले नाही हा सरळ, सरळ अन्याय आहे.ठेकेदारांनी आम्हाला किमान वेतन दराप्रमाणे माहे फेब्रुवारी व मार्च २०२६ चे थकीत वेतन आणि नियमा प्रमाणे इ.पी.एफ. भरणा करून चलान देण्यात यावी व इ.एस.आय. सी. सुद्धा भरलेला नसुन तो भरण्यात यावा तसेच कामगारांना लागणारे साहित्य सुद्धा अजुन पर्यंत मिळाले नाही. या सर्व नियमांचे उल्लंघन ठेकेदार करीत असल्यामुळे अ. भा. भ्र. निर्मूलन चे अध्यक्ष सचिन गावंडे, भाजपा जिल्हा उपा. ओबीसी मोर्चा चे मनोहर मुरकुटे, माजी नगरसेवक मनोहर भावे, शहर उपा. नितीन दातीर, सुंदर तांबे, निलेश मोगरे कृणाल समुद्रे, चेतन इटकरे,आकाश मोगरे, नीता मोगरे इत्यादी सर्व पदाधिकारी व मेहतर समाज बांधवांनी मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन संपूर्ण विषयाची चौकशी करून हिंदू दलीत समाजावर होणारा अन्याय, अत्याचार थांबवावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## डिव्हायडरला कार धडकल्याने

घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणाची माहिती मिळताच वलगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, वाहनाचा वेग, रस्त्याची स्थिती किंवा इतर कोणते कारण याचा तपास सुरू आहे. दरम्यान, या दुर्दैवी घटनेमुळे मेश्राम कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पुढील तपास वलगाव पोलीस करत आहेत.

## तासिका तत्वावरील प्राध्यापकांना

त्या कालावधीचे वेतन मिळत नाही. ही बाब अन्यायकारक, विसंगत आणि शिक्षकांवर आर्थिक अन्याय करणारी असल्याचे डॉ.प्रशांत विघे यांनी नमूद केले आहे.

मागील ७–८ वर्षांपासून नियमित पदभरती ठप्प असल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षणाचा मोठा भार CHB प्राध्यापकांवरच पडला आहे. हे प्राध्यापक प्रत्यक्षात शिक्षण व्यवस्थेचे म्हणून काम करत असून प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन, प्रकल्प मार्गदर्शन यांसारखी जबाबदारी ते प्रभावीपणे पार पाडत आहेत. तरीदेखील त्यांना पूर्ण मोबदला मिळत नसल्याने प्राचार्यांसमोरही प्रशासनिक अडचणी निर्माण होत आहेत.

दरम्यान, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मुळे शैक्षणिक सत्र, अभ्यासक्रम आणि मूल्यांकन पद्धतीत मोठे बदल झालेले असताना, जुने ऑर्डिनन्स वापरून ९ महिन्यांचे अप्रोल देणे हे नव्या वास्तवाशी विसंगत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

त्यामुळे सत्रवाढीनुसार वेतनात तात्काळ सुधारणा करावी, एप्रिल २०२६ मध्ये कार्य केलेल्या प्राध्यापकांना वेतन द्यावे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार नियम व ऑर्डिनन्समध्ये बदल करावेत, 'जेवढे काम – तेवढा मोबदला' हा मूलभूत न्यायाचा सिद्धांत आहे. मात्र CHB प्राध्यापकांना वेतनापासून वंचित ठेवणे हे सामाजिक न्यायाच्या तत्त्वालाही बाधा देणारे असल्याची खंत डॉ. विघे यांनी व्यक्त केली. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

यासंदर्भात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी सकारात्मक भूमिका दर्शवित, या प्रश्नावर लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल असे आश्वासन दिले आहे.

तसेच, २६ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार अप्रोल कालावधी ९ महिने व आठवड्याच्या तासिकेच्या मर्यादेत ठेवण्याचा उल्लेख आहे. मात्र बदललेल्या शैक्षणिक परिस्थिती आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर या नियमांमध्ये आवश्यक बदल करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत असून, यासाठी शासन स्तरावरही सकारात्मक पुढाकार घेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## रहाटगाव रिंग रोडवर अपघात

पसार झाला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्परता दाखवत जखमी अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या रायबोले यांना तात्काळ जवळील डॉ. गोडे हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र प्रकृती खालावत गेल्याने १९ एप्रिल रोजी दुपारी डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलीस ठाण्याचे कर्मचारी रुग्णालयात दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे फरार वाहनाचा शोध घेतला जात आहे, अशी माहिती नांदगाव पेठ पोलिसांनी दिली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

नागरिकांनी सतर्क राहण्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने आवाहन

# राज्यात वादळी पाउस, गारपीट व विजांचा इशारा



**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय हवामान खात्याच्या (आयएमडी) दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी जाहीर केलेल्या पाच दिवसीय अंदाजानुसार, राज्यातील विविध भागांत २० ते २४ एप्रिल या कालावधीत वादळी वारे, विजांचा कडकडाट, गारपीट आणि पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि कोकण विभागातील जिल्ह्यांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**नागरिकांसाठी सूचना** :विजेचा कडकडाट ऐकू आला किंवा विज चमकताना दिसताच तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, मोकळ्या शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोन किंवा इतर इलेक्ट्रानिक उपकरणांचा वापर करू नये. निवा-यापासून दूर असल्यास जमिनीवर आडवे न पडता पाय एकत्र करून खाली बसून राहावे.

**प्रशासनासाठी उपाययोजना :** ग्रामपंचायत, पोलीस व आरोग्य विभागांनी तातडीने जनजागृती करावी. रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि आपत्कालीन पथके सज्ज ठेवावीत. शाळा, सभागृह व सार्वजनिक इमारती सुरक्षित निवा-यासाठी खुल्या ठेवाव्यात. हवामान खात्याचे अद्ययावत इशारे गावपातळीपर्यंत त्वरित पोहोचवावेत.

**विशेष सूचना :** शेतकरी बांधवांनी विजांच्या इशा-याच्या कालावधीत शेतातील कामे टाळावीत. बांधकाम स्थळांवरील कामकाज तात्पुरते थांबवावे. तसेच यात्रा, धार्मिक कार्यक्रम आणि मोठ्या प्रमाणावरील गर्दीचे आयोजन तातडीने स्थगित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने सर्व संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# पत्रकारिता क्षेत्रात एआय मुळे महत्त्वाचे बदल

**मुंबई/प्रतिनिधी :**वेगाने बदलणा-या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात पत्रकारिता क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान महत्त्वाचे बदल घडवत आहे. या बदलांकडे संधी म्हणून पाहत महिला पत्रकारांनी अधिक तंत्रस्नेही व्हावे. या तंत्रज्ञानाच्या उपयोगाने महिला पत्रकार पत्रकारितेच्या माध्यमातून सकारात्मक परिवर्तन घडवून आणू शकतात, असा विश्वास माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय महिला आयोग आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर सभागृह येथे आयोजित महिला, माध्यमे आणि तंत्रज्ञान या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारितेवरील त्याचा परिणाम' या विषयावर प्रधान सचिव ब्रिजेश सिंह बोलत होते. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, प्रख्यात लेखिका डॉ रिचा सूद, नवी दिल्ली येथील वरिष्ठ पत्रकार डॉ. स्वाती गुप्ता उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान हे मानवीय संदर्भावर काम करते. त्यामुळे त्यामध्ये चूक असण्याची शक्यता



असते. पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करताना संदर्भ बिनचूक असतील याची खात्री करावी. महिला पत्रकार राजकीय, मनोरंजन क्षेत्रासह गुन्हेविषयक क्षेत्राचेही वार्तांकन करीत असतात. वार्तांकन करताना महिला पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान अत्यंत उपयोगाचे ठरू शकते.

**विश्लेषणात्मक आणि संशोधनात्मक कामांसाठी अधिक वेळ**

ए आय हे केवळ माहितीचे साधन नसून ते पत्रकारितेचा वेग वाढवणारे एक शक्तिशाली माध्यम आहे. माहितीचे संकलन, भाषांतर आणि विविध व्यासपीठांवर मांडणी करण्यासाठी एआयचा प्रभावी वापर करून कामाची गुणवत्ता सुधारता येते. एआयमुळे मानवी श्रमाची बचत होउन पत्रकारितेतील विश्लेषणात्मक आणि संशोधनात्मक कामांसाठी अधिक वेळ मिळत असल्याचेही प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले. बदलत्या काळात समृद्ध पत्रकारिता आणि आघाडीवर राहण्यासाठी महिलांनी एआय टूल्सचा वापर करणे काळाची गरज आहे. एआयमुळे उपलब्ध होणा-या नव्या संधींचा फायदा घेण्यासाठी महिला पत्रकारांनी तांत्रिक कौशल्यांत प्रगती करणे आवश्यक आहे. येणा-या काळात तंत्रज्ञानाशी मैत्री करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याची संधी महिलांकडे असल्याचे सांगत ब्रिजेश सिंह यांनी राष्ट्रीय महिला आयोगाने महिला पत्रकारांसाठी एआय मधील कौशल्य प्रशिक्षण सुरू करण्याचे आवाहनही केले.

## बदलांकडे संधी म्हणून पाहत महिला पत्रकारांनी अधिक तंत्रस्नेही व्हावे

### प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

इंग्रजी भाषेचा अडसर दूर करून प्रादेशिक भाषांमध्ये एआयचा वापर करणे आवश्यक आहे. सर्वम सारख्या 'इंडिक' एआय टूल्समुळे ग्रामीण भागातील बातम्या किंवा माहिती थेट संबंधित लोकांपर्यंत स्थानिक भाषेत पोहोचवणे आता सोपे होणार आहे. यामुळे भाषेची मर्यादा संपुष्टात येउन माहिती सार्वत्रिक होईल आणि त्याचा लाभ स्थानिक स्तरावरील महिला पत्रकारांना होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. कार्यशाळेदरम्यान माहिती व जनसंपर्क विभागात सुरू असलेल्या डिजिटल उपक्रमांची माहिती देत प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले, विभागात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगातून अचूक वृत्तांकन वेगाने वितरण करण्यात येत आहे.

# ६८६ रुग्णांना सुमारे ६.५५ कोटींची मदत

**मुंबई** : शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. मुंबई जिल्ह्यात आर्थिक वर्षात ६८६ रुग्णांना सुमारे ०६ कोटी ५५ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे. कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णांना मदतीसाठी

# आरोग्य योजनांची एकीकृत व्यवस्थापन कार्यपद्धती लागू करावी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील नागरिकांना आणि गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांच्या आर्थिक मदतीसाठी केंद्र व राज्य शासन विविध योजना राबविते. राबविण्यात येणा-या विविध आरोग्य योजनांमधून अधिक प्रभावी व सुलभ मदत मिळावी यादृष्टीने एकीकृत व्यवस्थापन कार्यपद्धती लागू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री शासकीय योजना मदत व समन्वय कक्ष संदर्भात आढावा बैठक झाली. बैठकीत मित्रा (महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फार ट्रान्सफार्मेशन) चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी सादरीकरण केले. बैठकीस शासनाच्या विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण आणि केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे सहसचिव किरण वसाका, तसेच विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा फुले जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ आदी विविध आरोग्य योजनांमधील लाभार्थ्यांची संख्या मोठी आहे. मागील वर्षभरात महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत ५ लाख २२ हजार, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत २ लाख १८ हजार रुग्णांचे अर्ज प्राप्त झाले असून विविध योजनांमधून मोठ्या प्रमाणात मदत देण्यात आली आहे. आतापर्यंत विविध योजनांद्वारे सुमारे ३,२४३ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. आरोग्य योजनांमधील रुग्णालये व लाभार्थी यांचे व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्यासाठी, तसेच केंद्र व राज्य योजनांचे एकत्रिकरण करून एकीकृत आरोग्य लाभार्थी व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वॉर रूम स्थापन करण्यात आली आहे.

# विकसित महाराष्ट्र साठी ठोस कृती आराखडा; प्रादेशिक तफावत कमी करण्यावर भर-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**प्रादेशिक तफावत कमी करून सर्व जिल्ह्यांचा समतोल विकास साधण्यावर भर देउन सर्व विभागांनी कालमर्यादेत ठोस कृती आराखडा निश्चित करावा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन मॅनेजमेंट नियामक



मंडळाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध विभागांच्या कामांचा सविस्तर आढावा घेत पुढील टप्प्यात प्रभावी अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीत कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मत्स्यव्यवसाय विकास मंत्री नितेश राणे, वित्त राज्यमंत्री अड.आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल दूरदृश्य प्रणालीद्वारे, संबंधित विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे आदी उपस्थित होते.फडणवीस म्हणाले, राज्याचे दरडोई उत्पन्न देशाच्या सरासरीपेक्षा अधिक आहे. तथापि, राज्यातील ११ जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. या जिल्ह्यांना विकासाचे इंजिन समजून विकसित करण्यावर भर देउन त्यांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणले, तर राज्याच्या एकूण विकासाला मोठी चालना मिळेल. केंद्र सरकारच्या चार आकांक्षी जिल्ह्यांच्या धर्तीवर राज्यात १० आकांक्षी जिल्हे आणि १७४ आकांक्षी तालुके निश्चित करण्यात आले असून सूक्ष्म पातळीवर विकास साधण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. यामुळे केवळ राज्यस्तरावर नव्हे, तर तालुका स्तरावरही विकासाचे मापदंड सुधारण्यावर भर देउन प्रादेशिक समतोल देखील साधला जाईल. शाश्वत विकास उद्दिष्टांच्या निर्देशांकात २०१८-१९ मध्ये चौथ्या स्थानावर असलेला महाराष्ट्राला पुन्हा आघाडीवर येण्यासाठी विभागनिहाय ठोस कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. यासाठी नियोजन विभागाने पहिल्या टप्प्यातील कृती आराखड्याच्या मार्गदर्शक सूचना तातडीने जाहीर कराव्यात, तर वित्त विभागाने ३० एप्रिलपर्यंत सर्व विभागांसोबत समन्वय साधून प्रकल्पांचे आर्थिक मूल्यमापन पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी दिले. विविध योजनांसाठी निधी उभारणीचे स्रोत स्पष्ट करण्यासाठी केंद्र व राज्य योजना, जिल्हा वार्षिक योजना, वित्त आयोग अनुदान, तसेच बाह्य आणि अंतर्गत कर्ज यांचे नियोजन करण्यावर त्यांनी भर दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पर्यायी निधी स्रोतांचा अधिक प्रभावी वापर करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी आणि जमीन मूल्य धोरणांचा योग्य उपयोग करावा. केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त निधी मिळवण्यासाठी उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेत सादर करण्याचे महत्त्व अधोरेखित करुन प्रलंबित प्रमाणपत्रे तातडीने सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. खाजगी गुंतवणूक, निर्यात आणि खाजगी उपभोग वाढविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज व्यक्त करुन इज ऑफ डुईंग बिझनेस सुधारण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. महसूल विभागाने राबविलेल्या सुधारणांमुळे सुनावण्यांची संख्या कमी होण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. विभागांमधील परस्पर समन्वय वाढवून सहकार्याने काम करण्याचे निर्देश देउन प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी पार पाडावी, असे फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# माध्यमांनी समाजमत घडवत महिलांविषयी संवेदनशील वृत्तांकन करण्याची गरज

## राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्षा विजया रहाटकर

**मुंबई/प्रतिनिधी :** माध्यमांनी केवळ माहिती देण्यापुरते मर्यादित न राहता समाजमत घडवण्याची जबाबदारी पार पाडावी आणि महिलांविषयीचे वृत्तांकन करताना संवेदनशीलता व कायदेशीर अचूकता राखावी, असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले. राष्ट्रीय महिला आयोग आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आयोजित महिला, माध्यमे आणि तंत्रज्ञान या एकदिवसीय कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी माहिती व जनसंपर्क विभागाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, लेखिका डॉ.रिचा सूद, वरिष्ठ पत्रकार स्वाती गुप्ता तसेच मुंबईतील पत्रकार उपस्थित होते.राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी महिलांच्या संरक्षणासाठी देशात प्रभावी कायदे अस्तित्वात असल्याचे सांगताना घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा हा महिलांसाठी



संरक्षणात्मक असल्याचे सांगितले. तसेच भारतीय राज्यघटनेने दिलेले अधिकार, नव्याने लागू झालेल्या भारतीय न्याय संहितेमधील तरतुदी, तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा, पॉश आणि पॉक्सो कायद्यांचे महत्त्व त्यांनी सांगितले. महिलांच्या सन्मानाला धक्का पोहोचवणा-या इनडिसेंट रिप्रेजेंटेशन ऑफ वूमन कायद्याचे वारंवार उल्लंघन होत असल्याबद्दल विजया रहाटकर यांनी खंत व्यक्त करून या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी माध्यमांनी ठाम भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. माध्यमांची ताकद मोठी असून सकारात्मक बातम्यांद्वारे समाजात चांगला बदल घडवता येतो, असे सांगत त्यांनी पॉझिटिव्ह स्टोरीजला अधिक वाव देण्याचे महत्त्वही सांगितले. महिलांसाठी उपलब्ध असलेल्या विविध हेल्पलाईन्स (१८१, ११२, १४४९०) तसेच वन स्टॉप सेंटर सारख्या सुविधा प्रभावीपणे कार्यरत असून त्यांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.विजया रहाटकर ट्रिपल तलाक विरोधी कायदा आणि मॅटर्निटी बेनिफिट ॲक्टसारखे कायदे महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे ठरत असल्याचे सांगितले. नव्याने लागू करण्यात आलेल्या चार श्रमसंहितांमुळे कामगार महिलांना अधिक संरक्षण मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.पत्रकारांनी वृत्तांकन करताना पीडितेची ओळख गोपनीय ठेवणे, तथ्यांची पडताळणी करणे, मीडिया ट्रायल टाळणे आणि न्यायप्रक्रियेचा सन्मान राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांच्या प्रश्नांकडे केवळ गुन्हेगारी दृष्टिकोनातून न पाहता सामाजिक, आर्थिक आणि धोरणात्मक अंगानेही मांडणी करावी, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. तळागाळातील आणि वंचित महिलांचा आवाज मुख्य प्रवाहात आणणे ही माध्यमांची जबाबदारी असल्याचे सांगून त्यांनी नियमित प्रशिक्षण आणि क्षमता विकास कार्यक्रमांची गरज व्यक्त केली. माध्यमे आणि विविध संस्थांमधील समन्वयातूनच व्यापक सामाजिक परिवर्तन शक्य असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपसंचालक (वृत्त) वर्षा आंधळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्य सज्ज -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी, प्रभावी अंमलबजावणी आणि समन्वयाच्या माध्यमातून या आपत्तीचे सौम्यीकरण करण्यात यावे. यासाठी सर्व विभागांनी तत्काळ उपाययोजना राबवाव्यात. पाण्याचे सुयोग्य नियोजन, जलसंधारणाच्या कामांना गती आणि जुन्या जलस्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन यावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. बैठकीस कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषि, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांच्यासह कृषी, मदत व पुनर्वसन, वित्त, जलसंपदा, जलसंधारण, भारतीय हवामानशास्त्र विभाग, वित्त व नियोजन विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत एल निनोचा सर्वाधिक परिणाम जाणवण्याची शक्यता असून पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मे महिन्यात उष्णतेची तीव्रता तुलनेने कमी राहील, मात्र उष्णतेच्या लाटा अधिक प्रमाणात येण्याची शक्यता वर्तविण्यात आली. दरम्यान, पॉझिटिव्ह आयओडी विकसित झाल्यास एल निनोच्या परिणामांची तीव्रता काही प्रमाणात कमी होउ शकते, असेही यावेळी सांगण्यात आले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, २०१५ मध्ये पावसाळा संपल्यानंतर राज्यातील पाणीसाठा केवळ ४५ टक्के होता, मात्र सध्या पावसाळा सुरू होण्यापूर्वीच तितका साठा उपलब्ध आहे. त्यामुळे योग्य नियोजन केल्यास राज्याला या परिस्थितीचा सक्षमपणे सामना करता येईल. २०१५ मधील एल निनोच्या कालावधीतील अनुभवावरून २०१८ या वर्षी उपाययोजना केल्यामुळे पिके वाचविता आली. एल निनोच्या कालावधीत पावसातील अनियमिततेमुळे विशेषतः मराठवाड्यात मोठा परिणाम दिसून आला होता. दोन पावसाच्या सरींमध्ये दीर्घ खंड पडल्यास पिकांवर ताण येतो, मात्र संरक्षित सिंचनाच्या माध्यमातून पिकांचे नुकसान कमी करता येते. त्यामुळे जलसंधारण व पाणी साठवण क्षमतेत वाढ करणे अत्यावश्यक आहे.

**जलयुक्तशिवार आणि गाळमुक्तधरण-गाळयुक्त शिवार योजनांचीकामे तातडीने करावी**

यासाठी जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार या योजनांची कामे तातडीने आणि मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. या कामांसाठी वित्त विभागाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच जुन्या जल स्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवनाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. यामुळे कमी पैशात जास्त पाणी साठा उपलब्ध होईल. कमी पावसाच्या परिस्थितीतही सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणारी हीच साधने प्रभावी

- उपलब्ध पाण्याचे नियोजन व जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा
- जुन्या जलस्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवनावर भर द्यावा
- पाणी बचतीसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक स्तरावर टास्क फोर्स स्थापन करावे
- वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवा
- खत पुरवठा व वितरणावर एआयच्या माध्यमातून लक्ष ठेवा



ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. जी रामजी योजनेतून होणारी जलयुक्त शिवारची कामे योग्य प्रकारे झाली आहेत की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी तसेच जी रामजी मधून जास्तीत जास्त कामे मिळविण्यासाठी टास्क फोर्स तयार करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्यातील पर्जन्यमान ९० टक्क्यांपेक्षा कमी राहिल्यास पिण्याच्या पाण्यासह शेतीवर मोठा परिणाम होतो. अशा परिस्थितीत नुकसान कमी करण्यासाठी पूर्वतयारी करण्यात यावीत. मनरेगा योजनेअंतर्गत जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देउन उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करण्याचेही निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसेच पिण्याच्या पाण्याबाबत केवळ चालू वर्षाचा नव्हे, तर पुढील उन्हाळ्याचाही विचार करून नियोजन करावयात. पावसातील संभाव्य घट लक्षात घेउन पाणी साठवून ठेवणे आणि त्याचा काटेकोर वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.पाणी बचतीसाठी आणि इतर पूरक उपाययोजनांसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक स्तरावर टास्क फोर्स स्थापन करण्यात यावे. जिल्हाधिकारी, सिंचन विभागाचे अधिकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्या समन्वयातून पाण्याचा काटेकोर वापर आणि साठवणूक सुनिश्चित केली जावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

**वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत-**पशुधनासाठी चारा टंचाई होउ नये यासाठी आतापासूनच उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले. एल निनोचा परिणाम इतर राज्यांवरही होण्याची शक्यता असल्याने बाहेरील राज्यांवर अवलंबून न राहता राज्यातच वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत. धरणांच्या बॅक वॉटर क्षेत्रात वैरण विकास कार्यक्रम हाती घेण्यात यावा. मोठ्या प्रमाणात पशुधन असणा-या तसेच चारा टंचाई जाणविणा-या सोलापूर, सांगली आणि मराठवाडा या भागांमध्ये चारा उपलब्ध कसा होईल, याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. खतांच्या उपलब्धतेबाबत तात्काळ निर्णय घेउन अंमलबजावणी करावी. ॲग्रीस्टॅक प्रणालीशी खत वितरण जोडून पारदर्शकता वाढविणे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तपासणी यंत्रणा मजबूत करण्यावर भर देण्यात यावा, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

**शेततळे योजनेवर भर द्यावा -** यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर कृषी विषय प्रभावीपणे हाताळण्यासाठी कृषी विभागाच्या सर्व अधिका-यांची बैठक घेण्यात आली असून विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. उद्भवू शकणा-या संभाव्य अडचणींचा पूर्वानुमान करून त्यासाठी आवश्यक तयारी करण्यावर भर देण्यात आला आहे. यंदाच्या पावसातील अनिश्चिततेमुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान होउ नये, यासाठी शेतक-यांना वेळेवर खतांचा पुरवठा होणे अत्यावश्यक आहे. विशेषत? डीएपी खताचे वितरण नियोजनबद्ध पद्धतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून त्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश दिले जाणार आहेत. खते आणि बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण होउ नये, यासाठी कृषी विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांना सर्व विक्री केंद्रांची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे भरणे यांनी सांगितले. कृषिमंत्री भरणे म्हणाले की, पावसाच्या अनियमिततेमुळे चा-याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेउन त्यावरही उपाययोजना करण्यात येत आहेत. महाबीज तसेच इतर बियाणे व चारा पुरवठा करणा-या संस्थांना आवश्यक साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुबार पेरणीची वेळ उद्भवल्यास अतिरिक्त बियाण्यांचा पुरवठा करण्यासाठीही संबंधित संस्थांना सज्ज राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतक-यांना पाणी साठवणुकीसाठी शेततळे योजना प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात यावा. त्यासाठी आवश्यक साहित्य, विशेषता प्लास्टिक लाइनिंग उपलब्ध करून देण्यात यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी कृषी विभाग पूर्णपणे सज्ज-** संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी कृषी विभाग पूर्णपणे सज्ज असून शेतक-यांचे नुकसान टाळण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्यात येत असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव के. एच. गोविंदराज, बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, पर्यावरण विभागाचे सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन सचिव एन रामास्वामी, मृद व जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव माणिक गुरसाळ, राज्य आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे संचालक डॉ भालचंद्र चव्हाण, भारतीय हवामान शास्त्र विभागाचे अतिरिक्तमहासंचालक साई कृष्णन आदींसह उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्थानचे संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक, आयमेट वेदर सर्व्हिसेसचे संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र संचालक उपस्थित होते.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ मंगळवार २१ एप्रिल २०२६ ■ मुल्य ३.०० ■ पृष्ठे ४

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


## मालेगाव (केळी) तलावातून पाणी उपसा बंद करण्यासाठी निवेदन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



मालेगाव नजीकच्या केळी तलावातून पाणी उपसा मोठ्या प्रमाणात सुरूच आहे.आज रोजी या तलावात अत्यल्प मृत जलसाठा शिल्लक आहे.तरीही काही धनदांडग्या लोकांच्या पाण्याच्या मोटारी सुरूच आहेत.तेव्हा या तलावातून पाणी उपसा बंद करा अशी मागणी ता.१६ शुक्रवारी रोजी पन्नास ते साठ नागरिकांच्या स्वाक्षऱ्याचे लेखी निवेदन नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे यांना देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केले की, तलावात पाणी साठा अत्यल्प असून, पाण्याच्या मोटारी अशाच सूरू आहेत .या मोटारी अशाच सुरू राहिल्यास तलाव लवकरच कोरडा ठण्ण पडणार आहे.व पशु, पक्षी प्राणी, यांची पिण्याच्या पाण्याची फार मोठी गैरसोय होणार आहे.आजुबाजूल जवळपास कुठेही पाणी नाही.तेव्हा तातडीने अवैध पाणी उपसा बंद करा अशी मागणी गाडगे बाबा नगर, खवले वेटाळ, अकोला फाटा परिसरातील नागरिकांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

## 'दै. जनमाध्यम'चा दणका; झोपेतल्या प्रशासनाला जाग तेल्हाऱ्यात उष्माघात कक्ष सुरू!

### बातमीचा थेट परिणाम; काही दिवसांतच हालचाल—नागरिकांना दिलासा, प्रशासनाची निष्क्रियता उघडी

■ तेल्हारा | प्रतिनिधी ■



शब्दांचा फटका कधी कधी सत्तेला हलवून टाकतो—याचा प्रत्यय पुन्हा एकदा तेल्हाऱ्यात आला आहे. 'दै. जनमाध्यम'ने उष्माघात कक्षाच्या अभावावर केलेल्या आक्रमक आणि थेट प्रहारानंतर अखेर प्रशासनाने गुडघे टेकत काही दिवसांतच उष्माघात कक्ष सुरू केला आहे.

वाढत्या तापमानाने नागरिक हैराण झाले असताना, जीवघेण्या उष्माघाताचा धोका डोक्यावर असतानाही प्रशासन मात्र गाढ झोपेत होते. शहरासह ग्रामीण भागात कोणतीही ठोस वैद्यकीय व्यवस्था नसल्याचे वास्तव 'दै. जनमाध्यम'ने उघड करताच नागरिकांमध्ये संताप उसळला. या संतापाची धग इतकी तीव्र होती की अखेर प्रशासनाला हालचाल करावीच लागली. बातमीचा दणका बसताच आरोग्य विभागाने धावाधाव करत शासकीय रुग्णालयात उष्माघात कक्ष कार्यान्वित केला. कक्षात थंड पाण्याची सुविधा, आवश्यक औषधे आणि प्राथमिक उपचारांची व्यवस्था करण्यात आली आहे. इतकेच नव्हे, तर ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांनाही सतर्कतेचे आदेश देत कर्मचाऱ्यांना सज्ज राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.परंतु प्रश्न असा उभा राहतो ही व्यवस्था आधी का नव्हती? नागरिकांच्या जीवाशी खेळ झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? 'दै. जनमाध्यम'च्या एका बातमीने जे शक्य झाले, ते प्रशासनाने स्वतःहून का केले नाही, याचे उत्तर अद्याप अनुत्तरितच आहे. दरम्यान, स्थानिक नागरिकांनी 'दै. जनमाध्यम'च्या निर्भीड पत्रकारितेचे जोरदार कौतुक केले. 'ही बातमी नसती, तर प्रशासन अजूनही डोळेझाक करून बसले असते,' अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

## गौण खनिजांची लूट उघड; कंत्राटदारांसह अधिकाऱ्यांना तहसीलदारांचे पत्र

### पहाडसिंगी-मळसुर रस्त्याच्या कामात अवैध वापर; जबाब नोंदविण्यासाठी मुदतवाढ



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यात गौण खनिजांच्या अवैध उत्खननाला आळा बसत नसल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. पहाडसिंगी–मळसुर रस्त्याच्या डांबरीकरणासाठी तब्बल १.५८ ब्रास गौण खनिजांचे उत्खनन करून ते बेकायदेशीररीत्या वापरल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तहसीलदार राहुल वानखेडे यांनी संबंधित कंत्राटदार व विभागीय अधिकाऱ्यांना जबाब नोंदविण्यासाठी पत्र बजावले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १ ते ५ मार्चदरम्यान जेसीबीच्या साहाय्याने उत्खनन करून आठ ते दहा ट्रॅक्टरद्वारे रात्रीच्या अंधारात खडक व मुरमाची वाहतूक करण्यात आली. विशेष म्हणजे, विहिरीतील खडक उपसून शेकडो ब्रास खनिज रस्त्याच्या कामात वापरल्याचे समोर आले. प्रकरण उघडकीस आल्यानंतर पुरावे लपविण्याच्या उद्देशाने गावंडगाव परिसरात 'शेत सपाटीकरण'च्या नावाखाली मोठ्या प्रमाणात मुरमाचे उत्खनन केल्याचीही माहिती पुढे आली आहे. या सर्व प्रकारामागे महसूल विभागातील एका अधिकाऱ्याचे 'आशीर्वाद' असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, तहसीलदारांनी जबाब नोंदविण्यासाठी नोटीस बजावली असली तरी संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी मुदतवाढ मागितली असून त्यांना वेळ देण्यात आल्याने संशय अधिकच गडद झाला आहे.

**दंडात्मक कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष**

महसूल अधिकारी, कंत्राटदार आणि संबंधित अभियंत्यांच्या संगनमतातून शेकडो ब्रास गौण खनिजांची लूट झाल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या प्रकरणात ठोस दंडात्मक कारवाई होणार की प्रकरण दडपले जाणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

**प्रकरण दडपण्यासाठी 'राजकीय' हालचाली?**

अवैध उत्खनन व वाहतुकीचा प्रकार उघड झाल्यानंतर काही राजकीय नेत्यांची एन्ट्री झाल्याची चर्चा रंगली आहे. त्यामुळे प्रकरण दडपले जाण्याची भीती व्यक्त होत असून, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांमुळेच स्त्रियांना सन्मानाचे जीवन – प्रा. माधुरी गायधनी (दुपटे)

■ प्रतिनिधी | कारंजा (लाड)




येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला समितीच्या वतीने आयोजित ४४ व्या व्याख्यानमालेतील 'प्रथम पुष्प' कार्यक्रम शनिवार, १८ एप्रिल रोजी मुलजी जेठा स्कूलच्या प्रांगणात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली.

प्रमुख व्याख्यात्या प्रा. माधुरी गायधनी (दुपटे), समितीचे अध्यक्ष प्रा. विनोद भगत, उपाध्यक्ष डॉ. राम पाटील, सचिव डॉ. पंजाबराव मोरे, प्रा. प्रकाश जंजाळ, ज्येष्ठ समाजसेवक प्रा. राजाभाऊ चव्हाण आणि डॉ. वासुदेव भगत यांच्या हस्ते हा अभिवादन सोहळा पार पडला. यावेळी उपस्थितांनी महापुरुषांच्या जयघोषाने परिसर दणाणून सोडला.यानंतर कारंजा शहरातील महिलांच्या वतीने प्रा. माधुरी गायधनी (दुपटे) यांचा शाल, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन भव्य सत्कार करण्यात आला. 'स्त्री मुक्तीचा विचार मांडणाऱ्या विदुषीचा सन्मान म्हणजे संपूर्ण स्त्रीशक्तीचा सन्मान,' अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.नागपूर येथील प्रख्यात विचारवंत प्रा. माधुरी गायधनी (दुपटे) यांनी 'बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन' या विषयावर अत्यंत प्रभावी व अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. त्यांनी सांगितले की, भगवान बुद्धांनी स्त्रियांना संघात प्रवेश देऊन त्यांना सामाजिक व आध्यात्मिक स्वातंत्र्याचा मार्ग खुला करून दिला. स्त्री ही गुलाम नसून स्वतंत्र आणि प्रज्ञावान आहे, हा मूलभूत विचार बुद्धांनी समाजासमोर मांडला. महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. 'स्त्री शिकली तर कुटुंब आणि समाज घडतो,' या विश्वासाने त्यांनी समाजाच्या विरोधात जाऊन स्त्रियांच्या शिक्षणासाठी कार्य केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांना मालमत्तेचे अधिकार आणि पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देत सामाजिक न्यायाची वाट मोकळी केली. तसेच आरक्षण धोरणाद्वारे त्यांना प्रशासनात स्थान मिळवून दिले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाद्वारे स्त्रियांना समान हक्क बहाल केले. 'हिंदू कोड बिल'च्या माध्यमातून स्त्रियांना मालमत्तेतील हक्क व घटस्फोटाचा अधिकार देऊन त्यांना पुरुषी गुलामगिरीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. 'मी कोणत्याही समाजाची प्रगती त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून मोजतो,' हा त्यांचा विचार स्त्री सक्षमीकरणाचा मूलाधार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.प्रा. गायधनी यांनी स्पष्ट केले की, बुद्ध, फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारांमुळेच आज स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. स्त्री ही केवळ 'गृहलक्ष्मी' नसून समाजाचा समान व स्वावलंबी घटक आहे. स्त्री मुक्तीशिवाय राष्ट्राची प्रगती अशक्य आहे, हा संदेश त्यांनी आपल्या व्याख्यानातून दिला.परिचय सौ. वंदना शिरसाट यांनी करून दिला. सूत्रसंचालन सौ. सुजाता वानखडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. माधुरी कोकरे यांनी मानले.या व्याख्यानमालेस कारंजा परिसरातील नागरिक, महिला व विचारवंत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडिलांच्या खुनानंतर आरोपी मुलाला दोन तासांत अटक

### बेलखेड येथील घटना; हिवरखेड पोलिसांची कारवाई



■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

हिवरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेलखेड येथे घडलेल्या खून प्रकरणातील आरोपीला अवघ्या दोन तासांत अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २० एप्रिल रोजी सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास हिवरखेड ठाणेदार गजानन राठोड यांना दूरध्वनीवरून माहिती मिळाली की, दिपक रामदास चतुरकार याने आपल्या वडिलांचा—रामदास चतुरकार (वय अंदाजे ७५)—लोखंडी रॉडने डोक्यात वार करून खून केला असून तो घटनास्थळावरून फरार झाला आहे.माहिती मिळताच ठाणेदार राठोड यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेतली. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक गोपाल गिलबिले, पोलीस कर्मचारी प्रफुल पवार व प्रमोद चव्हाण यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. गुप्त माहितीच्या आधारे आरोपी दहिगाव फाटा ते पंचगव्हाण फाटा मार्गावरून पळून जात असल्याचे समजताच पोलिसांनी सापळा रचत त्याला शिताफीने ताब्यात घेतले. विशेष म्हणजे, ही कारवाई घटना घडल्यानंतर अवघ्या दोन तासांत पार पडली.सदर प्रकरणी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास ठाणेदार गजानन राठोड हे करीत आहेत. या तपासासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी निखील पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

## जिल्ह्यात संत्रा पिकातील मृगबहार पूर्वनियोजन विषयक वैज्ञानिक प्रशिक्षण संपन्न

■ प्रतिनिधी | वाशीम ■



जिल्ह्यात संत्रा पिकामध्ये मृग हंगामातील बहाराचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. संत्रा बागांची उत्पादकता, फळधारणा क्षमता व गुणवत्तापूर्ण उत्पादन वाढविण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र अंतर्गत उद्यानविद्या विभागाचे माध्यमातून विविध तांत्रिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार व स्थानिक गरजांचा विचार करून कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने 'संत्रा पिकातील मृगबहारासाठी पूर्वनियोजन' या विषयावर दिनांक १७ एप्रिल रोजी विधाता शेतकरी प्रशिक्षण केंद्र येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. रवींद्र काळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशस्वी संत्रा उत्पादक शेतकरी श्री. भागवतराव सोमटकर (घाटा) उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उद्यानविद्या तज्ज्ञ श्री. निवृत्ती पाटील यांनी शास्त्रीय मार्गदर्शन केले. तसेच व्यासपीठावर प्रगतिशील शेतकरी श्री. सखाराम वाळले (व्याळ) व श्री. नितेश बोरकर (वडजी) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तांत्रिक सत्रात श्री. निवृत्ती पाटील यांनी यशस्वी मृगबहार व्यवस्थापनासाठी झाडावरील कार्यक्षम पर्णसंख्या, प्रकाशसंश्लेषण क्षमता, झाडातील अन्नसाठा (कार्बोहायड्रेट संचय) आणि त्याचा फुलधारणा व फळधारणेवरील परिणाम यांचे महत्त्व स्पष्ट केले. संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, सूक्ष्म अन्नद्रव्यांची योग्य मात्रा व वेळेवर फवारणी, ओलीत व्यवस्थापन, वैज्ञानिक छाटणी तंत्रज्ञान, तसेच बहार धारणेसाठी आवश्यक नियंत्रित पाण्याचा ताण याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.याशिवाय हवामान बदलामुळे निर्माण होणारी अनिश्चितता, उष्णतेच्या लाटा, अवकाळी पाऊस, कीड व रोगांचा प्रादुर्भाव यांसारख्या आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या प्रतिबंधात्मक व व्यवस्थापनात्मक उपाययोजनांची माहितीही देण्यात आली. एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन तसेच हवामान आधारित बाग व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला.भूमी सुपोषण अभियानाच्या अनुषंगाने जमिनीचे आरोग्य, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण, मृदा परीक्षणाचे महत्त्व, मृदासुधारकांचा वापर, जैविक घटकांचा समावेश, सूक्ष्मजीव संवर्धन तसेच दीर्घकालीन उत्पादनक्षमतेसाठी आवश्यक शाश्वत उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. उज्वल वानखडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. प्रकाश पाटील यांनी केले. प्रशिक्षणास परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला असून सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांची गरज असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली नगरसेवक गणेश अहिर यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

## आमदार सई डहाके यांच्या हस्ते १.७ कोटींच्या विकासकामांचे भव्य भूमिपूजन सोहळा संपन्न



■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेल्या खोलेश्वर संस्थान ऋषी तलाव परिसरात रविवारी (दि. १९ एप्रिल) सायंकाळी ६ वाजता १ कोटी ७० लाख रुपयांच्या विकासकामांचे भव्य भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास आमदार सई डहाके अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या.

मठाधीपती श्री. ब्र. १०८ मरुळसिद्ध शिवाचार्य महाराज, श्री गुरु अभेद्यनाथ गुरु सेवेनाथ महाराज यांच्या शुभहस्ते विधिवत भूमिपूजन करण्यात आले. प्रारंभी पुरातन खोलेश्वर शिवलिंगाचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या विकासकामांमध्ये संरक्षण भिंत उभारणी, घाट बांधकाम, पर्यटक निवारा उभारणी, त्या पर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता, डोम बांधकाम तसेच विविध मूलभूत सुविधा आणि अनुषंगिक कामांचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे परिसराचा पर्यटन विकास साधला जाणार असून स्थानिकांना देखील सुविधा उपलब्ध होणार आहेत. कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, भाजपा गटनेत्या शालिनी ठाकरे, विजय बगडे, संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त भूतडाजी, भाजपा शहराध्यक्ष अमित संगेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी कंकाळे यांनी प्रास्ताविकात या निधीचा योग्य वापर होत असल्याचे सांगितले. तर युवा नेते कौस्तुभ डहाके यांनी आपल्या मनोगतातून संस्थानाचा ऐतिहासिक वारसा आणि छत्रपती शिवाजी महाराजांशी असलेला संबंध अधोरेखित करत शहराच्या विकासासाठी या प्रकल्पाचे महत्त्व स्पष्ट केले. या सोहळ्यास परिसरातील नागरिक, नगर परिषदेचे भाजपा नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रसन्ना पळसकर यांनी केले तर ऋषी भारती यांनी आभार प्रदर्शन केले.

## मृत्यूच्या दारातून परत आणले जीवन; कारंज्यात डॉक्टर राऊत दाम्पत्याची मानवतेची जिवंत कहाणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■



कारंजा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगर परिसरात राहणाऱ्या सविता सुभाष नवघन यांच्यावर ओढवलेली जीवघेणी वेळ येथील डॉक्टरांच्या तत्परतेमुळे टळल्याची प्रेरणादायी घटना घडली आहे. ६ एप्रिल रोजी दुपारी नवघन यांना अचानक दोन अतितीव्र हृदयविकाराचे झटके आले. परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना तातडीने स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले.

यावेळी हृदयरोग तज्ज्ञ डॉ. रितेश अशोक राऊत यांनी क्षणाचाही विलंब न करता उपचार सुरू केले. रुग्णाची प्रकृती अत्यंत चिंताजनक असतानाही त्यांनी शर्थीचे प्रयत्न करत वेळेवर योग्य उपचार करून नवघन यांचा जीव वाचवण्यात यश मिळवले. उपचारादरम्यान त्यांच्या पत्नी डॉ. मेश्वा राऊत यांनीही आईप्रमाणे रुग्णाची काळजी घेतली, ज्यामुळे रुग्णाला मानसिक आधार मिळाला. रुग्णालयातील संपूर्ण वैद्यकीय स्टाफच्या समन्वयित प्रयत्नांमुळे नवघन यांना मृत्यूच्या दारातून परत आणण्यात यश आले. पुढील उपचारासाठी त्यांना अमरावती येथे हलविण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र, रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध नसतानाही डॉ. राऊत यांनी आवश्यक वैद्यकीय साहित्य उपलब्ध करून देत रुग्णाला सुरक्षितरीत्या अमरावती येथे रवाना करण्याची जबाबदारी पार पाडली. अमरावती येथे पुढील उपचारानंतर नवघन यांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली आणि त्या पूर्णपणे बऱ्या होऊन १६ एप्रिल रोजी घरी परतल्या. या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराज नगर परिसरातील नागरिक व मित्रपरिवाराच्या वतीने १७ एप्रिल रोजी संबंधित रुग्णालयात भेट देऊन डॉ. रितेश राऊत व डॉ. मेश्वा राऊत यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी प्रशांत ठाकरे, विशाल दबडे, राहुल सरक, गणेश बहाळे, अविनाश नवघण यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. डॉक्टरांनी दाखवलेली तत्परता, सेवाभाव आणि मानवतेचा उत्कृष्ट आदर्श यामुळे परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.


**CHANGE IN NAME**

**I Have Changed My Name From ZAHAUDDIN AINUDDIN MAHANMAD TO SYED ZIYAUDDIN SYED ANODDIN**

My Residential Address in:- Aqsa Masjid k pass, khadakpura appu kirana, Barshitakli, Akola

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com | एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १४४ ■ मंगळवार २१ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारा १० कोटींचा 'व्हीआयपी आराम

## जनतेचा पैसा, व्हीआयपींचा ऐश : विकासाच्या नावाखाली उधळपट्टी थांबवा

### शेतकरी हवालदिल, महागाईने कंबर मोडलीष्ठ तरीही विश्रामगृहावर कोट्यवधींची उधळपट्टी

**वर्धा । रवींद्र लाखे**

एकीकडे राज्यातील शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली अक्षरशः दबला आहे, तर दुसरीकडे महागाईने सर्वसामान्य कुटुंबांचे जगणे कठीण केले आहे. गॅस सिलेंडरच्या वाढत्या किंमतींनी स्वयंपाकघराचा गॅसही जणू आटवला आहे. अशा गंभीर परिस्थितीत वर्ध्यात शासकीय विश्रामगृहाच्या नूतनीकरण आणि नव्या बांधकामासाठी तब्बल १० कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय घेतला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. नागरिकांच्या कराचा गैरवापर करू नका, असा ठाम सूर आता सर्वत्र उमटू लागला आहे.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी नुकतीच विश्रामगृहाची पाहणी करत जुन्या इमारतीचे नूतनीकरण व नवीन सुसज्ज इमारत उभारण्याचे निर्देश दिले. सध्या अस्तित्वात असलेल्या दोन इमारतींमध्ये ९ व्हीआयपी सूट आहेत. त्यांचे आधुनिकीकरण, नवीन किचन-पॅन्ट्री, कॉन्फरन्स हॉल, अंतर्गत रस्ते आणि सुशोभीकरण यासाठी सुमारे ७.५ कोटी रुपये खर्च प्रस्तावित आहे. तर चार नव्या अत्याधुनिक सूट असलेल्या इमारतीसाठी २.५ कोटींचा स्वतंत्र आराखडा तयार करण्यात आला आहे. एकूण मिळून १० कोटी रुपयांचा खर्च हा सध्या चर्चेचा आणि वादाचा विषय ठरला आहे.

दुसरीकडे, महात्मा गांधी यांच्या कर्मभूमीत आजही शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे. शेतीसाठी लागणारे खत, बियाणे, वीज बिल आणि बाजारभावातील अस्थिरता यामुळे




शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे. महिलांसाठी जाहीर केलेल्या योजनांचे पैसे वेळेवर मिळत नाहीत. 'लाडक्या बहिणी' योजनेतील निधी अडकलेला आहे, तर सामान्य नागरिक महागाईच्या तडाख्यात सापडला आहे.

अशा परिस्थितीत सरकारने प्राधान्य कोणाला द्यावे, हा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. जनतेच्या मूलभूत गरजा की व्हीआयपींसाठी आलिशान सुविधा? हा संघर्ष आता उघडपणे दिसू लागला आहे. गावखेड्यात रस्ते खड्ड्यांनी भरलेले आहेत, पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, आरोग्य सेवा अपुरी आहे, तरीही कोट्यवधींचे आरामगृह उभारले जात आहे, ही बाब नागरिकांच्या जिव्हारी लागत आहे.

वर्ध्यासारख्या जिल्ह्यात, जिथे आचार्य विनोबा भावे यांच्या साधेपणाचा वारसा आहे, तिथेच आज दिखाऊपणा आणि व्हीआयपी संस्कृतीला चालना दिली जात असल्याची टीका होत आहे. प्रशासनाचा भर जनतेच्या प्रश्नांवर नसून केवळ दिखाऊ प्रकल्पांवर असल्याचा आरोप वाढत आहे.

जनतेच्या करातून उभारल्या जाणाऱ्या या खर्चाचा तातडीने पुनर्विचार करून तो निधी शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी वळवावा, अशी ठाम मागणी पुढे आली आहे. अन्यथा, या उधळपट्टीविरोधात जनतेचा रोष अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# एल निनोचा इशारा;

## राज्य सज्ज पाणी नियोजन, जलसंधारण व टास्क फोर्सला वेग देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

### कमी पावसाची शक्यता; सरकार अलर्ट जलयुक्त शिवार जलस्त्रोत दुरुस्ती व चारा नियोजनावर भर



**मुंबई जनमाध्यम** – संभाव्य 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पूर्वतयारीला गती देत दुष्काळसदृश परिस्थितीचा परिणाम कमी करण्यासाठी सर्व विभागांना सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत पाणी व्यवस्थापन, जलसंधारण, शेती व पशुधन यासंदर्भातील उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या अंदाजानुसार, यंदा ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत 'एल निनो'चा प्रभाव अधिक तीव्रतेने जाणवण्याची शक्यता आहे. यामुळे पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहू शकते, तसेच उष्णतेच्या लाटांचे प्रमाण वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य संकटाचा प्रभाव कमी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, २०१५ च्या तुलनेत सध्या राज्यातील पाणीसाठा समाधानकारक असला तरी त्याचे काटेकोर नियोजन करणे अत्यावश्यक आहे. जलसंधारणाच्या कामांना गती देत 'जलयुक्त शिवार' व 'गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार' योजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच जुन्या जलस्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन करून कमी खर्चात अधिक पाणी साठवणूक निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

पाणी बचतीसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक स्तरावर विशेष कार्यगट (टास्क फोर्स) स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्हाधिकारी, सिंचन विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समन्वयातून पाण्याचा काटेकोर वापर व साठवण सुनिश्चित करण्यात येणार आहे. मनरेगा योजनेअंतर्गत जलसंधारणाची कामे प्राधान्याने राबवून उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करण्यावरही भर देण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याचे नियोजन करताना केवळ चालू वर्ष नव्हे, तर पुढील उन्हाळ्याचाही विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, पशुधनासाठी चाऱ्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी 'वैरण विकास कार्यक्रम' प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. विशेषतः सोलापूर, सांगली आणि मराठवाडा या भागांमध्ये चारा उपलब्धतेसाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे.

खतांचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यावर भर देण्यात आला आहे. 'अ?ग्रीस्टॅक' प्रणालीशी खत वितरण जोडून त्यावर लक्ष ठेवण्यात येणार असून, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने तपासणी यंत्रणा अधिक सक्षम करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना वेळेवर खत व बियाणे उपलब्ध व्हावेत यासाठी संबंधित विभागांना सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेततळे योजनेला प्राधान्य देण्याची गरज व्यक्त केली. पावसातील अनिश्चिततेमुळे खरीप हंगामावर परिणाम होऊ नये यासाठी पूर्वतयारीवर भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

संभाव्य 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर राज्य प्रशासन पूर्णपणे सज्ज असून, शेतकरी व नागरिकांचे नुकसान टाळण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना वेळेत राबविण्यात येतील, असा विश्वास शासनाकडून व्यक्त करण्यात आला.

# अडीच वर्षांच्या चिमुकल्याची जागतिक विक्रमात नोंद; 'प्रतिभावंत बालक' सन्मान




**वर्धा जनमाध्यम** – वर्ध्यातील अवघ्या अडीच वर्षांच्या नक्ष सुरज बन्सोड या चिमुकल्याने आपल्या विलक्षण आकलनशक्ती आणि स्मरणक्षमतेच्या जोरावर जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. 'कलाम वर्ल्ड रेकॉर्ड्स' या संस्थेकडून त्याला असामान्य आकलन क्षमता प्रतिभावंत बालक या विशेष सन्मानाने गौरविण्यात आले आहे. ११ डिसेंबर २०२३ रोजी जन्मलेल्या नक्षने एवढ्या लहान वयात विविध विषयांमध्ये उल्लेखनीय प्रावीण्य मिळवले आहे. वन्य प्राणी, फळे, भाज्या, पक्षी, रंग, आकार, संख्या, शरीराचे अवयव, वाहने तसेच घरातील वस्तू यांची तो अचूक ओळख करून देतो. याशिवाय विरुद्ध शब्द, कृती शब्द, फुले, समुद्री प्राणी, कविता, वर्णमाला, चांगल्या सवयी आणि शिष्टाचार यांचेही त्याला उत्तम ज्ञान आहे. या कामगिरीची अधिकृत नोंद ३० मार्च २०२६ रोजी करण्यात आली. नक्षच्या असामान्य क्षमतेची दखल घेत त्याला प्रतिभावंत बालक हा किताब प्रदान करण्यात आला आहे.

नक्षच्या या यशामागे त्याची आई श्वेता यांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरले आहेत. एवढ्या लहान वयात मिळवलेले हे यश कुटुंबासह वर्धा जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत आहे.

# श्वानांचा सुळसुळाट; निष्पापावर झडप : चिमुकल्यावर भीषण हल्ला

**सेलू जनमाध्यम:** शहरात वाढलेल्या मोकाट श्वानांच्या सुळसुळाटाने नागरिकांचे जगणे असुरक्षित झाले असून, त्याचा फटका आता थेट चिमुकल्यांना बसू लागला आहे. सोनिया नगर, घोराड येथे सोमवारी घडलेल्या अंगावर शहारे आणणाऱ्या घटनेत एका मोकाट श्वानाने अवघ्या ४ वर्षीय बालकावर झडप घालत भीषण हल्ला केला. या हल्ल्यात बालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.दीपांशु महेश गुरुपंच (वय ४) हा घराजवळ खेळत असताना श्वानाने त्याच्या चेहऱ्यावर तसेच शरीराच्या विविध भागांवर चावे घेतले.

# तडकाफडकी बदलीवर वादंग : सीएस डॉ. वाघ मॅटच्या दारात


### नवीन जिल्हा शल्य चिकित्सक सोमवारीही रुजू नाहीत; आरोग्य यंत्रणेत अनिश्चिततेचे सावट

**वर्धा जनमाध्यम** : जिल्हा शल्य चिकित्सक (सीएस) डॉ. सुमंत वाघ यांची तडकाफडकी करण्यात आलेली बदली आता वादाच्या भोवऱ्यात अडकली असून हे प्रकरण थेट महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) पर्यंत पोहोचल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दरम्यान, नव्याने नियुक्त करण्यात आलेले जिल्हा शल्य चिकित्सक सोमवारीही रुजू न झाल्याने वर्धा जिल्ह्याच्या आरोग्य यंत्रणेत संभ्रम आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. १७ एप्रिल रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाचे उपसचिव दीपक केंद्रे यांनी प्रशासकीय कारणास्तव डॉ. सुमंत वाघ यांची नागपूर जिल्ह्यातील कामठी येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक पदावर बदली केली. या निर्णयाने अचानक खळबळ उडाली. त्याच दिवशी वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजसिंग बसराम पवार यांची वर्धा येथे जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

मात्र, सोमवारीही नवीन सीएस रुजू झाले नसल्याने प्रशासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याचदरम्यान, डॉ. सुमंत वाघ यांनी त्यांच्या बदली आदेशाविरोधात मॅटमध्ये धाव घेतल्याने या प्रकरणाला कायदेशीर वळण मिळाले आहे. अचानक घेतलेल्या निर्णयामागील कारणे, तसेच प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत विविध प्रश्न उपस्थित होत आहेत.आरोग्य विभागातील या घडामोडींमुळे जिल्ह्यातील आरोग्य सेवांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात असून, प्रशासनाने लवकरात लवकर स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी पुढे येत आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाकडे जिल्ह्यातील वैद्यकीय वर्तुळाचे लक्ष लागून आहे.

# केळझर येथे बेवारस कारला मध्यरात्री आग; कारण अस्पष्ट, तपास सुरू

**सेलू जनमाध्यम-** केळझर परिसरातील सामाजिक वनीकरण रोपवाटिकेजवळ मागील आठ दिवसांपासून संशयास्पदरीत्या उभी असलेली विना नंबरची कार रविवारी (दि. १९) मध्यरात्री अचानक पेटल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, आग लागण्याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. पोलिसांनी या प्रकरणी तपास सुरू केला आहे.



वर्ध्याकडे जाणाऱ्या मुख्य मार्गालगत असलेल्या सामाजिक वनीकरण रोपवाटिकेजवळ ही कार काही दिवसांपासून बेवारस अवस्थेत उभी असल्याचे स्थानिकांनी सांगितले. वाहनावर कोणताही नोंदणी क्रमांक नसल्याने सुरुवातीपासूनच नागरिकांमध्ये संशय व्यक्त होत होता. रविवारी मध्यरात्री अचानक वाहनातून धूर निघत असल्याचे काहींनी पाहिले. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केले.

आगीची तीव्रता मोठी असल्याने जवळील झाडे-झुडपेही आगीच्या विळख्यात सापडली. घटनेची माहिती मिळताच सिंदी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिस उपनिरीक्षक ओम कलेगुरुवार, प्रफुल डफ व रवी मोरे यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला.

दरम्यान, सिंदी रेल्वे नगर परिषदच्या अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून पाण्याचा मारा करत काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळविले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

सदर वाहन नेमके कुणाचे आहे, ते येथे का उभे करण्यात आले होते, तसेच आग अपघाती होती की हेतुपुरस्सर लावण्यात आली, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचीही तपासणी करण्यात येत असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

नोटीसद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्री चेतनकुमार गौतम तायडे हे मौजा देवळी, ता. देवळी, जि. वर्धा येथील खालील वर्णन केलेल्या मालमत्तेचे मालक आहेत. सदर मालमत्ता मौजा क्र. ७२, पी.एच. क्र. २१, वार्ड क्र. ७, फील्ड सर्व्हे नं. २०९/२ मधील प्लॉट क्र. २४ पैकी, घर क्र. ९३ असलेली असून, एकूण क्षेत्रफळ १०८.०० चौ. मी. (११६२.०८ चौ. फूट) आहे.

**हद्दी पुढीलप्रमाणे :**
**पूर्व : प्लॉट क्र. २५,**
**पश्चिम : प्लॉट क्र. २३,**
**उत्तर : प्लॉट क्र. ३१**
**दक्षिण : ९ मीटर रस्ता (लेआउट)**

श्री किशोर रमेशराव तायडे यांनी दिनांक ३०/१२/२०२५ रोजी दस्त क्र. ३०८८/२०२५ अन्वये प्लॉट क्र. २४ हा श्री चेतनकुमार गौतम तायडे यांच्या नावे विक्री केलेला असून सदर मालमत्तेवर त्यांचे नाव कायदेशीररीत्या नोंद (म्युटेशन) करण्यात आलेले आहे.

माझ्या पक्षकारांचे दि. १६/०६/२०२३ रोजीचे दस्त क्र. १७८७/२०२३ व दि. २४/०४/२०१४ रोजीचे दस्त क्र. ७४५/२०१४असे मूळ लिंक विक्रीपत्र हरवलेले आहेत.

तसेच श्री चेतनकुमार गौतम तायडे यांनी मुथूट हाउसिंग फायनान्स कंपनी लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

म्हणून सर्वसाधारण जनतेस नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा वरील नमूद मूळ कागदपत्रे कोणास सापडल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीपासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा**
**मोबा. ९९२२४२६१६८**

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर N8664580 वरील माझे NILOFAR BAKSH असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील NILOFER NAUSHAD BAKSH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-** दाते सभागृह जवळ,वर्धा ४४२००१

## नावात बदल

माझे पूर्वी MOHAMMAD AKRAM DOSI KACHHI असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील AKRAM MOHAMMAD HARUN DOSHI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-** शास्त्री वॉर्ड हिंगणघाट, वर्धा ४४२३०१

## ग्रामपंचायत कार्यालय, पळसगांव (आ) ता.देवळी, जि.वर्धा

### निविदा सूचना क्र.०१/२०२६-२७

ग्रामपंचायत कार्यालय पळसगांव (आ) ता.देवळी, जि.वर्धा कडून खालील कामाची निविदा अटी व शर्ती पूर्ण करणार अशा योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून बंद लिफाफ्यात निविदा ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत दिनांक २०.०४.२०२६ ते २७.०४.२०२६ या कालावधीत सादर करावी. निविदा उघडण्याची प्रक्रिया माहे एप्रिल मासिक सभेमध्ये वेळ सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | योजनेचे नांव | प्राकलन किंमत | तांत्रिक मंजूरी क्रमांक | कोरी निविदा फी | सुरक्षा ठेव | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सिमेंट नाली बांधकाम करणे | १५ वा वित्त आयोग २०२४-२५-२६ | ३,५५,५००/- | TS ७५ SDE/2025-26 | ५००/- | ३५५५/- | ६ महिने |
| २. | सार्वजनिक विहीर व लोखंडी जाळी टाकणे | १५ वा वित्त आयोग २०२४-२५-२६ | २,५५,३७१/- | TS ५७ SDE/2025-26 | ५००/- | २५५५/- | ६ महिने |

**अटी व शर्ती -**

१) मंजूर काम हे प्राकलनाप्रमाणे करण्यात यावे व तसेच काम करतांना कंत्राटदारांनी सक्षम अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घ्यावे.
२) नियमानुसार देयकातून सर्व संवैधानिक कपाती करण्यात येईल.
३) शासनाकडून प्राप्त निधीनुसार कामाचे मुल्यांकन व सी.सी.प्राप्त झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.
४) कंत्राटदारांनी नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड, जीएसटी प्रमाणपत्र, आयकर रिटर्न २ वर्षे इत्यादी आवश्यक कागदपत्रे निविदा सोबत सादर करावे.
५) निविदा फी व सुरक्षा ठेव हे RTGS/NEFT/UPI हे सामान्य फंड ग्रामपंचायत पळसगांव (आ) बॅंक ऑफ इंडिया, देवळी खाते क्र.972210110000572 IFSC Code BKID0009722 मध्ये स्विकारण्यात येईल..
६) कामाचे प्राकलन ग्रा.पं.कार्यालयीन वेळेमध्ये पाहण्याकरीता उपलब्ध आहे.
७) निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत.

**प्रशासक,**
**ग्रा.पं.पळसगांव (आ)**

**सचिव,**
**ग्रा.पं.पळसगांव (आ)**

## कार्यालय, ग्रामपंचायत पवनार, ता.जि.वर्धा

### ग्रा.पं.पवनार येथील सन २०२५-२६ करीता निविदा मागविण्याबाबत

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास सविनय पुर्वक विनंती करण्यात येते की, ग्रामपंचायत पवनार येथील १५ वा वित्त आयोग कामाचे निविदा मागविण्यात येत आहे. कालावधी दिनांक २१.०४.२०२६ ते २७.०४.२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. निविदा सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | कामाचे नांव | TS No. | प्राकलन किंमत | निवीदा फी व अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | पाईप ड्रेन बांधकाम करणे ३०० मीटर | ५६९/DE /२०२५-२६ | ४,५०,०००/- | ४५०० अनामत ५०० नि.फी |

**निविदेच्या अटी व शर्ती -**

१) निविदा मंजुर अथवा नामंजुरीचे अधिकार ग्रामपंचायतीकडे राहतील. तथा कोणतेही कारण न देता प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा फेटाळण्याचा अधिकार ग्रामपंचायत स्वतःकडे राखून ठेवत आहे.
२) शासन नियमानुसार जी.एस.टी. व इन्कम टॅक्स कपात करण्यात येईल.
३) निविदाधारक जी.एस.टी.नंबर असणे आवश्यक आहे.
४) निविदाधारक पॅन कार्ड असणे आवश्यक आहे.
५) निविदाधारक सन २०२५-२६ इन्कम टॅक्स भरल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६) निविदाधारकास ITR जोडणे अनिवार्य आहे.
७) अनामत रक्कम भरणा ग्रा.पं.पवनार सामान्य फंड A/c No.2160333157 IFSC Code CBIN ०२८२१६५ सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया पवनार यावर NEFT/RTGS करण्यात यावे.

**स्वा/-**
**डब्ल्यू.जी.राऊत,**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत, पवनार**

**स्वा/-**
**राजु भूजंगराव गलांडे**
**प्रशासक,**
**ग्रामपंचायत, पवनार**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## आरक्षणाचे खलनायक

देशातील सत्तर कोटी महिलांच्या हितासाठी सरकारने संसदेत आणलेल्या महिला आरक्षण सुधारणा विधेयकाची जणू या विरोधी पक्षांनी हत्याच केली. केवळ नरेंद्र मोदी-अमित शहा आणि भाजप द्वेषापोटी विरोधी पक्षांनी महिला आरक्षण उधळून लावले. संसदेत महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाले; पण भाजप व मित्र पक्षांनी आता यावरून रस्त्यावर संघर्ष करण्याचा निर्णय घेतला आहे. महिलांच्या आक्रोशालाही काँग्रेसला आता सामोरे जावे लागेल असे दिसते. या विधेयकात लोकसभेच्या जागा ५४३ वरून ८५० पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव होता. लोकसभेच्या काही मतदारसंघांत वीस ते चाळीस लाख मतदार आहेत, तर काही मतदारसंघांत ६-७ लाख मतदार. गेल्या अनेक वर्षांत मतदारसंघांची फेररचना झालेली नाही. वीस ते चाळीस लाखांच्या मतदारसंघात खासदारांना जनसंपर्क ठेवणे कठीण असते. मतदारसंघांची फेररचना झाली, तर महिलांना आरक्षण देताना त्यांचेही प्रतिनिधित्व वाढेल. लोकसभेसाठी ८५० मतदारसंघ झाले, तर महिलासांठी २७२ जागा आरक्षित राहतील. हे सर्व मोदी-शहा यांनी सभागृहात भाषणातून समजावून सांगितले होते. महिला आरक्षणाचे आम्हाला श्रेय घ्यायचे नाही, पाहिजे तर विरोधी पक्षाने घ्यावे, असेही सरकारने म्हटले होते; पण मोदी सरकारने प्रस्ताव आणला की त्याला विरोध करायचा, एवढीच नीती विरोधी पक्ष राबवताना दिसतात. त्याचा फटका प्रत्येक निवडणुकीत इंडिया ब्लॉकमधील घटक पक्षांना बसतो आहे.व्यापक महिला हिताच्या रक्षणासाठी स्त्री सबलीकरणाचा राजकीय पक्षांचा दावा किती पोकळ, महिलांच्या डोळ्यांत धूळफेक करणारा आहे, हे विरोधी पक्षांनी शुक्रवारी संसदेत दाखवून दिले. महिला आरक्षणाशी संबंधित १३१ वी घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर करून घेण्यात मोदी सरकारला अपयश आले. ते सरकारचे नव्हे, तर विरोधकांचेच अपयश म्हणावे लागेल. विरोधी पक्षांकडून त्यावर आता कितीही आणि कशीही मखलाशी केली जात असली, तरी साऱ्या देशासमोर त्यांचा बुरखा टराटरा फाटला! प्रथमदर्शनी सरकारचा पराभव झाला असला, तरी तो सर्वच राजकीय पक्षांचा आहे. त्यातही सरकारवर नामुष्की ओढावल्याचे समाधान मानणाऱ्या काँग्रेसचा अधिक आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून काँग्रेस पक्षाने सहा दशकांहून अधिक काळ केंद्रात सत्ता उपभोगली; पण देशात पन्नास टक्के लोकसंख्या असलेल्या महिलांना संसदेत आणि विधिमंडळात आरक्षण देता आले नाही. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्ष महिला आरक्षणाविषयी आग्रही असताना त्याला संसदेत खोडा घालण्याचे काम विरोधी पक्षांनी कसे केले, हे सर्व देशाने यावरील विधेयकाच्या निमित्ताने पाहिले.मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या कारकिर्दीत प्रथमच एका विधेयकावरून सरकारला दोन तृतियांश बहुमताअभावी पराभव पत्करावा लागला; पण यानिमित्ताने महिला आरक्षणाचे मारेकरी कोण, हे देशातील एकशे चाळीस कोटी जनतेला स्पष्टपणे समजले. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पार्टी, डावी आघाडी हे सारे विरोधक मोदी सरकारच्या विरोधात एकवटले. महिला आरक्षणासाठी गेली चाळीस वर्षे संसदेत संघर्ष चालू आहे. आता वाढीव जागांसह सरकारने सुधारणा विधेयक आणले, तर त्यावर विरोधी पक्षाने घाव घालण्याचे काम केले. मोदींनी दिले आणि काँग्रेसने रोखले, असे चित्र संसदेत बघायला मिळाले. सरकारने मांडलेल्या विधेयकावर लोकसभेत ५२८ खासदारांनी मतदान केले. विधेयक मंजूर होण्यासाठी दोन तृतियांश म्हणजे ३५२ मतांची गरज होती; पण विधेयकाच्या बाजूने २९८ व विरोधात २३० मते पडली. लोकसभेत एनडीएचे मिळून २९३ खासदार आहेत. वायएसआर पक्षाची पाच मते मिळविण्यात भाजपला यश आले; पण तेवढे पुरेसे ठरले नाही. महिला आरक्षणाच्या विषयात सरकारवर कुरघोडी करून काँग्रेस पक्षाने काय मिळवले? देशातील महिलांसाठी मोदी सरकारने दिलेले आरक्षण रोखण्याचे काम राहुल गांधी, एम. के. स्टालिन, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव यांनी व त्यांच्या पक्षांनी केले. एक मोठी संधी या पक्षांनी गमावली, हे स्पष्टच आहे. त्यावर सरकारच्या बाजूने प्रयत्न सुरूच राहणार असले, तरी सर्वपक्षीय एकमत घडवण्याचे मोठे आव्हान सरकारसमोर असेल.कोणत्याही सार्वजनिक हिताच्या मुद्द्यावर सरकारने विरोधकांचे सहकार्य आणि सहमती गृहीत धरलेली असते; मात्र महिला विधेयकाच्या बाबतीत ती फोल ठरली. दक्षिणेतील राजकारण, उत्तरेकडील राज्यांत भाजपला होणारा राजकीय फायदा या गोष्टींची ढाल करीत विरोधकांनी ते फेटाळले असले, तरी त्यामुळे देशभरातील महिला सशक्तीकरणाच्या प्रयत्नांना नख लागले, हे लक्षात घ्यावे लागेल. मोदी सरकारला काँग्रेस नेहमीच विरोध करीत आहे. भाजपने द्रौपदी मुर्मू या आदिवासी महिलेला देशाच्या राष्ट्रपतिपदाने सन्मानित केले आहे. सुषमा स्वराज, उमा भारती, वसुंधरा राजे, आनंदीबेन पटेल, रेखा गुप्ता अशा महिलांना मुख्यमंत्रिपदावर बसवले. मोदी सरकारने देशातील महिलांना संसदेची व विधिमंडळाची दारे हक्काने खुली करण्यासाठी हे महिला आरक्षण सुधारणा विधेयक आणले होते; पण सरकार मतदारसंघांची फेररचना करताना उत्तर भारत विरुद्ध दक्षिण भारत असा भेदभाव करीत असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला. सर्व राज्यांमध्ये लोकसभेच्या पन्नास टक्के जागा वाढणार आहेत, असे अमित शहा यांनी आकडेवारीनिशी सांगून समजावण्याचा प्रयत्न केला. राहुल गांधी लोकसभेतील विरोधी पक्ष नेते आहेत. ते काँग्रेसचे नेते आहेत; पण मोदी-शहा म्हणजे खलनायक आहेत, असे समजूनच ते बोलत असतात. बालाकोट, पुलवामा, ऑपरेशन सिंदूर, नोटाबंदीचा जादूगार पकडला गेलाय, अशा भाषेत त्यांनी देशाच्या नेतृत्वावर टीका करणे, हे मुळीच शोभनीय नव्हते. महिला आरक्षण रोखले, याचा विरोधी पक्षांना आनंद झाला; पण २०२९ च्या निवडणुकीत ते लागू होण्याचे मार्ग बंद झाले. राजकीय डावपेचात महिला हक्काच्या निर्णयाचा बळी गेला. देशाचे राजकारण कोणत्या दिशेने घेऊन जात आहोत, याचे भान विरोधी पक्षांनी ठेवावे, असाच याचा अर्थ!

# युध्दामुळे भारतातील शेती क्षेत्राची कोंडी

**इस्राईल, अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धाचा परिणाम जागतिक पातळीवर जाणवत आहे. खत टंचाईमुळे अन्न सुरक्षा धोक्यात येण्याची चर्चा आहे. तर इंधन दरवाढीने सर्वच देशांमध्ये महागाईने डोके वर काढले आहे. भारताला या युद्धाचा कोणकोणत्या क्षेत्रात फटका बसत आहे, सध्या भारताकडे कोणते पर्याय आहेत, याचा दीर्घकालीन काय परिणाम होईल, शेती क्षेत्राचे चित्र काय राहील यासारख्या - मुद्द्यांवर शेतीमाल बाजार अभ्यासक राजेंद्र जाधव यांच्याशी साधलेला संवाद...**



**इस्राईल, अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धाचा जागतिक शेतीमाल बाजारपेठेवर कसा परिणाम होत आहे?**

युद्धजन्य परिस्थितीमुळे शेतीमाल बाजारावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारे खोल परिणाम होत आहेत. विशेषतः आखाती देशांकडे होणाऱ्या भारताच्या शेतीमाल निर्यातीवर या तणावाचा थेट आघात झाला आहे. तांदूळ, कांदा, विविध फळे आणि पालेभाज्या यांची निर्यात मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली आहे. काही बाबतीत ती जवळपास ठप्प झाल्याचे चित्र आहे. होर्मूझ सामुद्रधुनीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या सागरी मार्गावरील अनिश्चितता तसेच खनिज तेलाच्या दरातील तीव्र वाढ यामुळे समुद्री मालवाहतुकीच्या खर्चात मोठी उसळी दिसून येत आहे. होर्मूझ सामुद्रधुनी मार्गे जाणाऱ्या जहाजांना अधिक धोका असल्यामुळे विमा महाग झाला आहे. त्यामुळे मालवाहतूक कंपन्या अतिरिक्त शुल्क आकारत आहेत किंवा पर्यायी मार्ग वापरत आहेत. त्यामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाढत आहेत. याचा थेट परिणाम धान्य, खाद्यतेल, कडधान्य आणि इतर शेतीमालाच्या जागतिक व्यापारावर होत आहे. शेतीमालाच्या दरवाढीपेक्षा वाहतूक भाड्यातील वाढ अधिक तीव्र आहे. युद्ध थांबल्यानंतर दर स्थिर होतील आणि मालवाहतुकीचा खर्च कमी होईल, या अपेक्षेने अनेक आयातदारांनी खरेदी पुढे ढकलली, युरोप, आफ्रिका आणि आशियातील अनेक बाजारपेठांमध्येही हीच सावध भूमिका घेतली जात आहे. परिणामी, भारताच्या शेतीमाल निर्यातीला मंदीची झळ बसत आहे. खनिज तेलाच्या दरवाढीमुळे जैवइंधनाची मागणी वाढली. त्यामुळे जागतिक बाजारात खाद्यतेल, मका आणि साखर यांच्या दरांवर वाढीचा दबाव निर्माण झाला आहे. त्याचा प्रतिध्वनी भारतातही उमटताना दिसतो. गेल्या दोन महिन्यांत सोयाबीन, मोहरी आणि भुईमूग यांच्या दरांमध्ये वाढ झाली आहे. युद्ध आणखी काही महिने लांबले, तर अनेक देश अन्नसाठा वाढवण्याकडे, निर्यात निर्बंध लादण्याकडे किंवा आयात धोरणांमध्ये बदल करण्याकडे वळतील. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे जागतिक बाजारात तुटवडा निर्माण होऊन किमती भडकतील.

**युद्धामुळे देशात खतटंचाई जाणवत आहे. या युद्धाचा आणि देशातील खत पुरवठ्याचा संबंध काय ?**

देशात सर्वाधिक वापर युरियाचा होतो. त्यापैकी सुमारे एक चतुर्थांश युरियाची गरज आयातीद्वारे भागवली जाते. तसेच देशांतर्गत युरिया निर्मितीसाठी लागणारा नैसर्गिक वायू आयात करावा लागतो. तो मुख्यतः ओमानसारख्या आखाती देशांतून येतो. युरियाच्या तुलनेत फॉस्फेट आणि पोटॅश खतांमध्ये आयातीवरील अवलंबित्व आणखी तीव्र आहे. केवळ दोन महिन्यांत युरियाचे दर जवळपास दुप्पट होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत. सरकारकडून शेतकऱ्यांना अनुदानित दरात खत उपलब्ध करून दिले जाते. खतांची विक्री किंमत वाढवण्याचा सरकारचा विचार नाही. त्यामुळे अधिकच्या अनुदानाचा आर्थिक बोजा सरकारवरच पडणार आहे.

**युद्धामुळे जागतिक अन्नसुरक्षा धोक्यात आल्याची चर्चा सुरू आहे. यात कितपत तथ्य आहे?**

ही चर्चा काही अंशी तथ्यावर आधारित असली, तरी सध्याच्या घडीला परिस्थिती तात्काळ अन्नटंचाईपर्यंत र्च पोहोचलेली नाही. सर्वात मोठा परिणाम ऊर्जा आणि खतांच्या किमतींवर झाला आहे. तेल आणि नैसर्गिक वायू महागल्यामुळे शेती उत्पादनाचा खर्च वाढला असून युरिया व इतर खतांचे दरही वाढले आहेत. त्यामुळे शेतकरी खतांचा वापर कमी करू शकतात. त्याचा परिणाम उत्पादनावर होण्याची शक्यता आहे. तेल महागल्यामुळे जैवइंधनाची मागणी वाढते आणि मका, सोयाबीन यांसारख्या पिकांचा वापर अन्नाऐवजी इंधनासाठी होऊ लागतो. त्यामुळे अन्नपुरवठ्यावर अतिरिक्त ताण येत आहे. गेल्या काही वर्षांत हवामानाने साथ दिल्याने जगात अन्नधान्याचे चांगले उत्पादन झाले. त्यामुळे प्रमुख उत्पादक देशांकडे सध्या पुरेसे अन्नसाठे उपलब्ध आहेत. त्यामुळे तात्काळ जागतिक अन्नटंचाई निर्माण होण्याची शक्यता कमी आहे. मात्र युद्ध दीर्घकाळ चालल्यास आफ्रिका खंडातील गरीब व विकसनशील देशांमध्ये भुकेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

**कमी पावसाचा अंदाज त्यातच युद्धामुळे निविष्ठा टंचाई आणि भाववाढीचे चटके बसत आहेत. याचा पीक लागवड आणि उत्पादनावर कसा परिणाम होऊ शकतो?**

भारतीय हवामान विभाग मॉन्सूनचा अंदाज देताना अनेक घटकांचा सखोल अभ्यास करतो. यंदाच्या पहिल्या अंदाजानुसार पर्जन्यमान सरासरीच्या सुमारे ९२ टक्के राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. जवळपास तीन दशकांनंतर पहिल्यांदाच हवामान विभागाने इतक्या कमी पावसाचा पहिला अंदाज दिला आहे. जागतिक हवामान मॉडल्सनुसार जूनपासून एल निनोचा प्रभाव वाढण्याची चिन्हे आहेत. यापूर्वी एल निनोच्या वर्षांत भारतात साधारणपणे पर्जन्यमान कमी राहिले आहे. परंतु एल निनो असूनही १९९७ मध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला होता, मात्र मागील सहा एल-निनो वर्षांत प्रत्येक वेळी साथ न मिळणे हे शेतकऱ्यांसमोरील संकट अधिक गडद करणारे ठरत आहे. केंद्र सरकारने अद्याप खत आणि इंधनाचे दर वाढवलेले नाहीत. उत्तर प्रदेश आणि पंजाब या शेतीवर अवलंबून असलेल्या राज्यांमध्ये पुढील वर्षाच्या सुरूवातीला विधानसभेच्या निवडणुका आहेत. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात खत आणि इंधन दरवाढीचा निर्णय घेण्याची शक्यता कमी मानली जाते. मात्र, इतर निविष्ठांचे वाढते दर शेतकऱ्यांवर निश्चितच परिणाम करणार आहेत. अशा परिस्थितीत शेतकरी कमी खर्चिक आणि कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांकडे वळण्याची शक्यता अधिक आहे. पाण्यावर अवलंबून असलेल्या भात आणि ऊस यांसारख्या पिकांचे क्षेत्र कमी होऊन बाजरी, कडधान्य आणि तेलबिया यांसारख्या कमी पाणी लागणाऱ्या पिकांकडे कल वाढू शकतो. खरीप आणि रब्बी पिकांचे उत्पादन मॉन्सूनच्या पावसावर अवलंबून असते. पेरणीनंतर लगेचच पावसामध्ये मोठा खंड पडला किंवा पिके पक्व होताना पुरेसा पाऊस झाला नाही, तर उत्पादनात मोठी घट होऊ शकते; मात्र ते कधी आणि कुठल्या भागात पाऊस कसा होतो यावर अवलंबून आहे.

**कमी पाऊस आणि युद्धाच्या संकटात सरकार शेतकऱ्यांना कसा आधार देऊ शकते?**

निसर्ग साथ देत नाही, तेव्हा शेतकरी साहजिकच सरकारकडून मदतीची अपेक्षा करतो. खते आणि इंधनाचे दर स्थिर ठेवण्याबरोबरच सरकार पिकविमा, कमी व्याजदराने पीककर्ज उपलब्ध करून देणे, परतफेडीसाठी अधिक कालावधी देणे, तसेच सरकारी खरेदी आणि किमान आधारभूत किमतीत वाढ करून शेतकऱ्यांना दिलासा देऊ शकते. यापूर्वी दुष्काळाच्या काळात सरकारने एका बाजूला शेतकऱ्यांसाठी तुटपुंजी मदत जाहीर केली, तर दुसरीकडे अन्नधान्याच्या निर्यातीवर निर्बंध लादले होते. उदाहरणार्थ, २०२३ मध्ये दुष्काळ पडल्यानंतर तांदूळ, साखर आणि कांदा यांच्या निर्यातीवर निर्बंध घालण्यात आले होते. त्याचवेळी आयातीला मोकळीक देण्यात आली. या धोरणातूना शेतकऱ्यांपेक्षा ग्राहकांना प्राधान्य देण्यात आल्याचे दिसून आले. याही वेळी महागाई वाढण्याच्या भीतीने सरकारने ग्राहककेंद्री धोरण अवलंबले, तर शेतकऱ्यांचे नुकसान निसर्गापेक्षा अधिक प्रमाणात धोरणांमुळेच होण्याची भीत आहे सरकारने खते आणि इंधनावरील अनुदान वाढवण्याची भागांपर्यंत सुरळीतपणे होतो आहे का, याची काटेकोर पाहणी करणे आवश्यक आहे. सरकारकडून युरियाचा पुरेसा साठा असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात अनेक भागांत शेतकऱ्यांना युरिया मिळविताना अडचणी येत आहेत. ही परिस्थिती जून महिन्यात आणखी गंभीर होऊ शकते. त्यामुळे वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. हवामान विभागाच्या अंदाजावर आधारित जिल्हानिहाय अचूक कृषी सल्ला देणे अत्यावश्यक ठरते. याशिवाय सूक्ष्म सिंचन, जलसंचय योजना, तलाव आणि बंधाऱ्यांचे पुनर्भरण यांसारख्या उपाययोजनांद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर करणे गरजेचे आहे.

**युद्धामुळे भारताच्या कोणकोणत्या क्षेत्रावर परिणाम दिसत आहे?**

जागतिक पातळीवरील युद्धजन्य तणावाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम हा सीमित किंवा एकांगी नाही; उलट तो बहुआयामी स्वरूपात विविध क्षेत्रांत कोंडी निर्माण करणारा ठरत आहे. या परिणामांचे प्रतिबिंब आता टप्प्याटप्प्याने स्पष्ट दिसू लागले आहे. यातील सर्वाधिक झळ बसत आहे ती ऊर्जा क्षेत्राला. भारत आपल्या खनिज तेलाची तब्बल ८५ टक्क्यांहून अधिक गरज आयातीच्या माध्यमातून भागवतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमतींनी उसळी घेतल्याने पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी दरवाढीचा दबाव अपरिहार्य ठरतो. इंधन महागले की वाहतूक खर्च वाढतो आणि त्याची साखळी प्रतिक्रिया सर्वच वस्तूंच्या किमतींवर उमटते. परिणामी, महागाईचा धोका गडद होतो. सरकारने तात्पुरता दिलासा देण्यासाठी इंधनदर स्थिर ठेवण्याची भूमिका घेतली असली, तरी त्याची किंमत वित्तीय तुटीच्या वाढीच्या रूपाने मोजावी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. खनिज तेलाच्या दरवाढीचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे चलनावरील दबाव, रुपया डॉलरच्या तुलनेत घसरत असल्याने आयात अधिक खर्चिक ठरते. याउलट, निर्यातीमधून तुलनेने अधिक परतावा मिळण्याची संधी निर्माण होते. त्यामुळे देशांतर्गत बाजारात साखर, कापूस आणि मका यांसारख्या पिकांना काही प्रमाणात दराचा आधार मिळताना दिसतो. मात्र ही चित्राची एक बाजू झाली. आयातदार देशांकडून मागणी अचानक घटल्यास कांद्यासारख्या नाशवंत पिकांचे दर कोसळतात, हे वास्तवही तितकेच ठळक आहे. आखाती देश भारतातील हिरे-दागिन्यांपासून ते फळे आणि पालेभाज्यांपर्यंत विविध उत्पादनांचे महत्त्वाचे ग्राहक आहेत. त्या बाजारपेठांतील अस्थिरता आणि समुद्री वाहतुकीच्या वाढत्या खर्चामुळे निर्यात आधारित अनेक उद्योगांना फटका बसत आहे. जलमार्गावरील अडथळे आणि वाढते भाडे यामुळे भारताची निर्यातीची स्पर्धात्मकता कमी होण्याची भीती आहे. दरम्यान, वाढत्या महागाईचा परिणाम चलनविषयक धोरणांवरही होऊ शकतो. किरकोळ महागाईत वाढ कायम राहिल्यास रिझर्व्ह बँकेला व्याजदर वाढवण्याचा पर्याय निवडावा लागू शकतो.त्याचा थेट परिणाम कर्जाच्या दरांवर होऊन उद्योग, गृहनिर्माण आणि ग्राहक कर्ज घेणाऱ्या सर्व घटकांवर आर्थिक ताण वाढेल. व्याजदर वाढल्यास गुंतवणूक मंदावते, आर्थिक विकासदरावर परिणाम होतो आणि नव्या रोजगारनिर्मितीची गती कमी होते. एकूणच, युद्धाचा प्रभाव हा केवळ सीमारेषांपुरता मर्यादित राहत नाही; तो अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक स्तरावर लहरी निर्माण करतो. ऊर्जा, चलन, व्यापार, शेती आणि रोजगार... या सर्वच क्षेत्रांमध्ये निर्माण झालेली ही कोंडी भारतासाठी दीर्घकालीन धोरणात्मक आव्हान ठरेल.(साभार-सकाळ ॲग्रोमनी)

**मुलाखत- अनिल**

## संवाद

### ट्रम्प यांच्या पोकळ धमक्या !

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध थांबावे म्हणून पाकिस्तानच्या मध्यस्थीने वरील दोन देशांमध्ये वाटाघाटी होऊन, युद्धविराम जाहीर झाला तो २२ एप्रिल रोजी संपत आहे.आता पुन्हा एकदा अमेरिका आणि इराण यांनी वाटाघाटींसाठी पुढे यावे म्हणून पाकिस्तान, तुर्कस्तान आणि इजिप्त यांच्याकडून प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे.युद्धविराम सुरू असताना अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीत इराणकडून येणाऱ्या आणि इराणकडे जाणाऱ्या जहाजांची नाकेबंदी केल्याने, युद्धविरामाला तसा काही अर्थ उरला नव्हता.इराणी बंदरांतून येणाऱ्या आणि जाणाऱ्या जहाजांची अमेरिकेने नाकेबंदी केल्यानंतर, इराण गप्प बसणे शक्यच नव्हते.इराणने ताबडतोब होर्मुझच्या सामुद्रधुनीचा मार्ग बंद केला.अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धविराम झाल्यानंतरही इस्त्रायलने लेबनान वरील आपले हल्ले सुरूच ठेवले होते.नंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्या सुचनेनुसार इस्त्रायल आणि लेबनान यांच्यात दहा दिवसांचा युद्धविराम झाला.त्यानंतर इराणने होर्मुझ सामुद्रधुनीचा मार्ग मोकळा केला.मात्र अमेरिकेने इराणच्या बंदरांची नाकेबंदी उठवण्यास नकार दिल्यानंतर इराणने पुन्हा एकदा होर्मुझ सामुद्रधुनीचा मार्ग बंद केला.

इराणने जाहिर केले आहे की, जोपर्यंत इराणच्या बंदरांतून येणाऱ्या आणि इराणी बंदरांकडे जाणाऱ्या जहाजांची नाकेबंदी अमेरिकेकडून उठवली जात नाही, तोपर्यंत इराण,होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील आपले निर्बंध हटवणार नाही.संपूर्ण जगाला पुरवल्या जाणाऱ्या गॅस आणि ऑईलपैकी २० टक्के गॅस आणि ऑईल हे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मार्गस्थ होते.त्यामुळे होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्यानंतर त्याचा फटका सर्व जगाला बसतो.ही वस्तुस्थिती इराणला चांगलीच ठाऊक असल्याने, होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून, इराण, अमेरिकेला ब्लॅकमेल करत असते.अमेरिकेने इराण विरुद्ध युद्ध छेडल्यानंतर गॅस आणि ऑईल महाग झाल्याने तसेच त्याचा तुटवडा भासू लागल्याने, जगभरातील देशांकडून, युद्ध संपवण्यासाठी अमेरिकेवर दबाव टाकला जात आहे.होर्मुझची सामुद्रधुनी ओपन करणे आणि इराणकडे समृद्ध युरेनियम नसल्याची खात्री करणे ही करारातील प्रमुख कलमे आहेत.

**अभय गोखले**

### कांदा निर्यात संकटात

मागील वर्षीच्या तुलनेत यंदाच्या मार्च महिन्यात कांद्याची निर्यात ४५ टक्क्यांनी कमी झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे कंटेनर वाहतूक खर्चात मोठी वाढ झाल्यामुळे निर्यात मंदावली आहे. परिणामी देशांतर्गत बाजपेठेतच कांदा विक्रीसाठी आणला जात आहे. प्रचंड आवक झाल्याने बाजारपेठेत कांद्याचे दर मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. अलीकडेच झालेल्या अवकाळी पावसाचा महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांनाही चांगलाच फटका बसला आहे. त्यामुळे देखील कांदा पिकवणारे शेतकरी संकटात सापडले आहेत. दरवर्षी कांदा निर्यातीमधून देशाला कोट्यवधी रुपयांचे परकीय चलन मिळत असते. मात्र, युद्धामुळे परिस्थिती बिकट होत चालली आहे.

शेतकऱ्यांचा नाशवंत माल पिकवण्याची व्यवस्था अद्यापही पुरेशी नाही. मध्य पूर्वेतील अनेक देशांमध्ये भारताचा शेतमाल पाठवणे अतिशय सोयीचे होते. त्यातून अनेक शेतकऱ्यांना आर्थिक लाभ झालेला आहे. उन्हाळ्याच्या हंगामात कांदा पिकात मोठी तेजी पाहायला मिळते. परंतु, युद्धामुळे कांद्याला उठाव नसल्याची तक्रार व्यापारी करत आहेत. मागच्या वर्षी म्हणजेच मार्च २०२५ मध्ये उन्हाळी कांद्याला २६०० च्या पुढे तर लाल कांद्याला ३१०० रुपये प्रति क्विंटल असा दर मिळाला होता. परंतु, यावर्षी तोच दर १४००ते १५०० असा मिळाला आहे. यावरून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीचा अंदाज येतो.परंतू युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीने शेतकरी रडकुंडीला येत आहेत.

**प्रा. मधुकर चुट**

### दुहेरी नागरिकत्व प्रकरण राहुल गांधीं यांच्या अंगलट येण्याची शक्यता?

दुहेरी नागरिकत्व प्रकरणात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या अडचणीत वाढ झाली असून अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने दुहेरी नागरिकत्व प्रकरणात लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि रायबरेलीचे खासदार राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले आहेत.दुहेरी नागरिकत्वाचे प्रकरण नेमके काय आहे, ज्याच्या सुनावणीमुळे राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याचा आदेश देण्यात दिले आहेत.२६ जुलै, २०२५ रोजी, विग्नेश शिशिर यांनी रायबरेलीच्या एसपींना पत्र लिहून, दुहेरी नागरिकत्व बाळगल्याबद्दल राहुल गांधींविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची विनंती केली. १९ ऑगस्ट २०२५ रोजी, तपास अधिकाऱ्याने अर्जाच्या आधारे त्याला बोलावले आणि विग्नेशने राहुल गांधींच्या दुहेरी नागरिकत्वाशी संबंधित सर्व पुरावे तपास अधिकाऱ्याकडे सादर केले.

जेव्हा पोलिसांनी एफआयआर नोंदवण्यास नकार दिला, तेव्हा रायबरेली येथील खासदार-आमदार न्यायालयात एक अर्ज दाखल करण्यात आला.१५ डिसेंबर, २०२५ रोजी, या खटल्याची सुनावणी रायबरेलीहून लखनौला हस्तांतरित करण्यासाठी उच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली. १७ डिसेंबर, २०२५ रोजी, न्यायमूर्ती ब्रजराज सिंह यांच्या एकल.खंडपीठाने हे प्रकरण लखनौ येथील खासदार-आमदार न्यायालयात वर्ग केले. या प्रकरणाची सुनावणी लखनौ येथील खासदार-आमदार न्यायालयात ७ जानेवारी २०२६ रोजी सुरू झाली. ७ आणि ८ जानेवारी रोजी झालेल्या सलग सुनावण्यांदरम्यान, याचिकाकर्त्याने असा युक्तिवाद केला की तो दुहेरी नागरिक आहे.२८ जानेवारी, २०२६ रोजी, लखनौ येथील खासदार-आमदार न्यायालयाने राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याचा अर्ज फेटाळला. विग्नेश शिशिर यांनी १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी याविरोधात एक याचिका दाखल केली होती,पुढे उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले.उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने राहुल गांधी यांच्या विरोधात विविध कलमांखाली एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले आणि केंद्रीय यंत्रणेमार्फत तपास करण्याचे निर्देश दिले.भारतीय संविधान दुहेरी नागरिकत्वाला परवानगी देत नाही, त्यामुळे जर एखाद्या भारतीय नागरिकाकडे दुसऱ्या देशाचे नागरिकत्व असल्याचे आढळून आले, तर त्याचे भारतीय नागरिकत्व आपोआप संपुष्टात येते.

**प्रा.डॉ. सुधीर अग्रवाल,** वर्धा
मो.९५६१५९४३०६

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# "तीन वर्षे प्रतीक्षा, तरीही लाभ नाही !

## जिल्हाधिकारी कार्यालयावर 'शोले स्टाईल' आक्रमक आंदोलन



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - दिग्रस तालुक्यातील शेकडो विधवा, घटस्फोटित व गरजू महिलांना बाल संगोपन योजनेचा लाभ तीन वर्षांपासून मिळत नसल्याने संतप्त महिलांनी आणि भुमीपुत्र संघटनेने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर चढून आक्रमक आंदोलन छेडले. "जय जवान, जय किसान", "इंकलाब जिंदाबाद" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला आणि प्रशासनाची झोप उडाली.

दिग्रस तालुक्यातील लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर होऊनही प्रत्यक्षात निधी मिळालेला नाही. वारंवार गृहचौकशी, कागदपत्रांची पूर्तता करूनही महिला व बालविकास विभागाकडून केवळ उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. "वरून निधी आला की मिळेल" अशा उत्तरांमुळे महिलांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. दरम्यान, भुमीपुत्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विशाल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली लाभार्थ्यांनी कडक उन्हात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवर चढत 'शोलेस्टाईल' आंदोलन सुरू केले. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अधिकारी व कर्मचारी यांची धावपळ उडाली. शासनाची ही योजना विधवा, अपंग व अनाथ मुलांच्या पालन पोषणासाठी महत्त्वाची मानली जाते. मात्र, दिग्रस तालुक्यातील लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित ठेवले जात असल्याचा गंभीर आरोप महिलांनी केला आहे. विशेष म्हणजे इतर तालुक्यांतील नव्या अर्जदारांना लाभ मिळत असताना दिग्रसकडे दुर्लक्ष होत असल्याने भेदभावाचा मुद्दा पुढे आला आहे. यापूर्वी प्रशासनाला २० एप्रिलपर्यंत निधी जमा न झाल्यास आत्मदहनाचा इशारा देण्यात आला होता. तरीही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर महिलांनी आक्रमक पवित्रा घेतला. आता प्रशासन या गंभीर प्रश्नावर तातडीने निर्णय घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# फळबाग लागवड प्रशिक्षण उत्साहात संपन्न



**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी - अंजी (नरसिंह), दि. 20 एप्रिल 2026 रोज सोमवारला Say Trees संस्थेच्या माध्यमातून अंजी (नृसिंह) येथे आयोजित करण्यात आलेले फळबाग लागवड प्रशिक्षण व कार्यशाळा उत्साहात व यशस्वीरित्या पार पडले.

या प्रशिक्षणासाठी एकूण 45 शेतकरी उपस्थित होते. सातारा जिल्ह्यातील तज्ज्ञ मार्गदर्शक आभा लाड सर यांनी शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसंदर्भात सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी फळबाग लागवडीची पद्धत, झाडांची छाटणी (कटिंग), फवारणी, तसेच जीवामृत तयार करण्याची प्रक्रिया याबाबत सविस्तर माहिती दिली. फळबाग व्यवस्थापनातील विविध तांत्रिक बाबींवरही त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास गंगाधर स्वामी (मॅनेजर, यवतमाळ) तसेच संजय सर (PO) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी एक विशेष उपक्रम राबविण्यात आला. मागील वर्षी फळबाग लागवड केलेल्या प्रगत शेतकऱ्यांकडून काही शेतकऱ्यांना कटर मशीन व मायक्रो न्यूट्रियन्स चे 1 किलो खत देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व इतर शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान शेतकऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून आपल्या शंकांचे निराकरण करून घेतले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने फळबाग लागवड करण्यासाठी प्रेरणा मिळाली असून भविष्यात उत्पादन वाढीसाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# नापिकीचा शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजारांचा तातडीचा विमा द्या !

## आ. मांगुळकरांचा इशारा



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यंदाच्या खरीप हंगामात सततच्या पावसामुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तात्काळ प्रती हेक्टर २५,००० रुपये विमा परतावा जाहीर करावा, अशी ठाम व टोकदार मागणी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी केली आहे. अन्यथा शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

जिल्ह्यात जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत अनुक्रमे २१, १९ व २६ दिवस पाऊस झाल्याने सोयाबीन पिकावर गंभीर परिणाम झाला. दाणा भरण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यात सतत पावसामुळे दाणे बारीक राहिले व उत्पादनात मोठी घट झाली. २०२५-२६ च्या खरीप हंगामात २,६४,४४९ हेक्टरवर सोयाबीन लागवड झाली होती. मात्र अपेक्षित २५ ते ३० क्विंटल उत्पादनाऐवजी केवळ ८.७५ क्विंटल प्रती हेक्टर उत्पादन नोंदवले गेले, जे नापिकीचे स्पष्ट चित्र असल्याचे त्यांनी सांगितले. मांगुळकर यांनी पिक विमा योजनेतील त्रुटींवरही जोरदार टीका केली. २०२४ पर्यंत ७२ तासांत नुकसान नोंदवण्याची अट शेतकऱ्यांसाठी फायदेशीर होती; मात्र २४ जून २०२५ च्या शासन निर्णयानुसार ही अट रद्द केल्याने योजना शेतकरीविरोधी ठरत असल्याचा आरोप त्यांनी केला. सध्याची कापणी प्रयोगावर आधारित पद्धतही अपुरी असून, केवळ ०.००५ हेक्टर क्षेत्रावर आधारित निष्कर्ष काढणे हे अन्यायकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, ७० टक्के जोखीम स्तरामुळे शेतकऱ्यांना ३० टक्के नुकसान स्वतः सहन करावे लागते, ही बाबही अन्यायकारक असल्याचे त्यांनी नमूद केले. विमा संरक्षित रक्कम ५८ हजार रुपये असतानाही प्रत्यक्षात अत्यल्प भरपाई मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने निर्णय घेत शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपये मदत जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी विविध शेतकरी व राजकीय संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# • वेचक



## उमरखेड येथे जंगम समाज बांधवांच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती साजरी


उमरखेड - येथील शिरडकर सदनमध्ये थोर समाज सुधारक महामानव जगतज्योती महात्मा बसवेश्वरांची ९२१ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी उपस्थित सर्व जंगम समाज बांधवांनी महात्मा बसवेश्वराच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पुजन केले. महात्मा बसवेश्वरांनी लंडन मध्ये १२ व्या शतकात 'अनुभव मंटप ' ची स्थापना केली. ज्याला जगातील पहिली संसद मानल्या जाते म्हणून लंडनला लोकशाहीची जननी म्हटल्या जाते. त्या ठीकाणी त्यांनी 'बसव कल्याण ' हा ग्रंथ लीहीला. त्या वेळी त्यांनी गरीब श्रीमंत भेद, उच्च निच जाती भेद हटवून समान हक्क समान कायदा ह्या सारख्या गोष्टी सर्व समाजातील व्यक्तींच्या मनामना मध्ये रूजवून नि:पक्ष न्यायदानाचे कार्य केले. लंडनच्या लोकशाही परंपरेत त्यांच्या पुतळ्या ला स्थान मिळणे ही त्यांच्या लोकशाही विचारांना मिळालेली जागतिक पावती आहे. असे मत या कार्यक्रम प्रसंगी बालाजी शिरडकर स्वामी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला सारंग स्वामी हदगांवकर, विनायकस्वामी मुळावकर, डॉ. विष्णुकांत शिवणकर, वैजनाथस्वामी पुजारी, कैलास स्वामी खडकेश्वर, रत्नाकर स्वामी पुजारी, सावन महाराज बेंडके, सदाशिव स्वामी मुळावकर, देवानंद स्वामी पुजारी, संतोष स्वामी कंठाळे,, प्रसाद स्वामी खडकेश्वर, सुभाष स्वामी कंठाळे, मयूर स्वामी पुजारी, प्रशांत स्वामी जंगम,वेदांत पुजारी सह अनेक जंगम समाज बांधव उपस्थित होते.

## पुसद भीमशक्तीतर्फे महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी!



पुसद - महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्त शहरातील बालाजी मंदिर समोर असलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले चौक येथे भीमशक्ती सामाजिक संघटना यांच्यातर्फे महात्मा बसवेश्वर जयंती चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राजू दुधे माजी पाणीपुरवठा सभापती न.प.पुसद. लक्ष्मण कांबळे अध्यक्ष प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती पुसद प्रबोधनपर्व २०२६. डॉ शंकर दळवे. ऍड पद्माकर विघ्ने. नारायण आप्पा वडस्कर. सुरज कुरील, यादव वानखेडे, प्रदीप पापीनवार, यांची विशेष उपस्थिती होती. सर्वप्रथम महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन राजू दुधे नगरसेवक तथा माजी सभापती तसेच प्रबोधनपर्व समितीचे अध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्ताविक राज गिरे. यांनी केले आभार यादव वानखेडे यांनी मानले कार्यक्रमाचे आयोजन संतोष अंभोरे अध्यक्ष भीमशक्ती सामाजिक संघटना पुसद यांनी केले बसवेश्वर जयंतीच्या आयोजित कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती हे विशेष.

## वासनिक दांपत्याकडून होतकरू विद्यार्थ्यांला पुस्तके भेट



यवतमाळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'सम्राट अशोक मैत्री संघ'तर्फे आयोजित कार्यक्रमात, जिल्हा परिषद शाळा परसोडी येथील पाचवीचा विद्यार्थी क्षितिज कोल्हे याचा सत्कार करण्यात आला. क्षितिजने महादीप परीक्षेत जिल्हा प्रथम, तसेच नवोदय आणि सैनिक स्कूल प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल आणि सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल हा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विलास आणि प्रिया वासनिक दांपत्याने त्याला शैक्षणिक पुस्तके भेट दिली.

# भिम भगवान माझ्या झोपडीची शान आहे

## चेतन चोपडे यांच्या गिताने रसिकांचे मन जिंकले





**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती पुसद प्रबोधन पर्व २०२६ यांच्या वतीने जुनी पंचायत समितीच्या शिवाजी सभागृहांमध्ये घेण्यात आलेल्या चेतन चोपडे (छत्रपती संभाजी नगर) प्रस्तुत या आंबेडकरी गीताच्या बहारदार कार्यक्रमास समाजाचा रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला "भीम भगवान माझ्या झोपडीची शान आहे" तसेच "बुद्ध फुले आंबेडकर सांगू आम्ही..याच एका कार्याला लागू आम्ही" अशा अनेक गीताने उपस्थितांचे मन जिंकले. चेतन चोपडे व त्यांचा संच यांनी बुद्ध-भीम गित एक से बढकर एक सादर करून महामानवाच्या विचाराचे प्रबोधनही केले त्यामुळे रसिकांच्या प्रचंड गर्दीने सभागृह ठणकावून भरले होते.

या कार्यक्रमाची सुरुवात संभाजीनगर येथील लुंबिनी महिला मंडळाच्या वतीने बुद्धवंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ . मोहम्मद नदीम काँग्रेस कमिटी महाराष्ट्र प्रदेश सचिव यांच्या हस्ते सर्व महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.नदीम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की प्रबोधनपर्व समिती यांनी गेल्या वर्षीही चांगले डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कार्यक्रम घेतले व त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि याही वर्षी त्यांनी चार दिवसीय गायन व प्रबोधनाचे कार्यक्रम घेतले हे सुद्धा चांगल्या प्रकारे पार पडत आहे, ज्या प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण भारतातील लोकांना संविधानाच्या माध्यमातून सर्वांना आपले हक्क, अधिकार,व स्वतंत्र दिले त्याचप्रमाणे प्रज्ञासूर्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती प्रबोधनपर्व हे पण सर्व जाती, धर्म,पंथाच्या लोकांना सोबत घेऊन जयंती उत्सव चांगले करतात असे त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मनोगत व्यक्त करतांना बोलत होते. यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सर्व समाज बांधवांना तसेच विचार मंचावर उपस्थित असलेले आमंत्रित मान्यवरांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती मध्ये.. प्रा. मिलिंद सोमकुंवर,परमेश्वर जयस्वाल, संदीप मैराळ पाटील, भगवान हनवते तालुका अध्यक्ष बामसेफ, पांडुरंग व्यवहारे मुख्य संघटक बिरसा मुंडा, डी.एस.अगमे सर, राजेंद्र नाईक, दीपक परिहार,अश्विन जयस्वाल, भारत कांबळे भारतीय बौद्ध महासभा, अशोक भालेराव भीम आर्मी संघटक, दीपक धानोरकर जिल्हाध्यक्ष बामसेफ, राजू पठाडे सामाजिक कार्यकर्ते, इत्यादी उपस्थित मान्यवरांना भारतीय संविधानाची प्रत भेट देण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रबोधनपर्व आयोजन समिती पुसद २०२६ चे सर्व सदस्य तसेच उपासक, उपासीका तसेच महिला मंडळ यांनी अथक परिश्रम घेतले.

# पांढरकवडाकरांच्या शिस्तीचा 'पंच' ; कराटे बेल्ट परीक्षेत २२ विद्यार्थ्यांची भरारी



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - जपान शोतोकान कराटे-डो कानिन-जुकू ऑर्गनायझेशन इंडिया व यवतमाळ जिल्हा कराटे असोसिएशनच्या वतीने पांढरकवडा येथे नुकतीच कराटे प्रशिक्षण व बेल्ट ग्रेडेशन परीक्षा पार पडली. १८ एप्रिल रोजी जंगोदाई पेनठाणा टेकडी येथे आयोजित या परीक्षेत २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपले कौशल्य सिद्ध केले. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या १३ विद्यार्थ्यांनी नवनवीन बेल्ट प्राप्त करत आपल्या मेहनतीचे फळ मिळवले.

या परीक्षेसाठी जपान शोतोकान कराटे-डो कानिन-जुकू ऑर्गनायझेशन ऑफ इंडियाचे टेक्निकल डायरेक्टर आणि जागतिक कराटे महासंघाचे (WKF) 'ए' ग्रेड पंच हांशी परमजीत सिंग (ठाणे) यांचे मार्गदर्शन लाभले. परीक्षेचे मुख्य निरीक्षक म्हणून महाराष्ट्रातील कराटे क्षेत्रातील पहिली डॉक्टरेट प्राप्त केलेले, ५ व्या डॅनचे ब्लॅक बेल्ट धारक डॉ. प्रा. आनंद एस. भुसारी यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे अवलोकन केले. याप्रसंगी बोलताना कराटे प्रशिक्षक सेन्साई योगेश पडोळे म्हणाले की, "कराटे म्हणजे केवळ शारीरिक कसरत नाही, तर ती शिस्त आणि संयमाची साधना आहे. विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढवण्यासोबतच त्यांना आत्मसंरक्षणाचे धडे देण्याचा आमचा प्रयत्न आहे." या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊरावजी मरापे यांनी भूषविले. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या परीक्षेत विविध गटांतून विद्यार्थी यशस्वी झाले. यामध्ये येलो बेल्टसाठी पद्मजा जगन्नाथ साबळे, मंजिरी योगेश जगताप, नव्या संदिप मोतिकार, परमविर अश्विनकुमार पाटील, रुद्र प्रशांत येडशीकर आणि पार्थ भारत निपुणे हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ब्ल्यु बेल्टसाठी नव्या संदिप मोतिकार, ईश्वरी रामकृष्ण गेडाम, मानसी दिपक चौधरी, मनस्वी मुकेश माथुर, पुर्वी विलास राठोड, मार्टिन मुकेश माथुर, साईप्रसाद हितेश नागभिडकर, अंश योगेश पडोळे आणि सौरव रविंद्र सुकेवार यांनी यश संपादन केले. तसेच ग्रीन बेल्टसाठी मनस्वी मुकेश माथुर, क्रितीका शशिकांत वानखडे आणि मानसी दिपक चौधरी हे यशस्वी झाले असून, क्रितीका शशिकांत वानखडे हिने परपल बेल्ट संपादन केला आहे.

# सुरक्षारक्षकाचा वेतन कपाती विरोधात संताप

## १० दिवसांत तोडगा न निघाल्यास कामबंद आंदोलनाचा इशारा



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्ह्यातील अवादा सोलर प्रकल्पांवर कार्यरत सुरक्षारक्षकांनी वेतन कपात, नियुक्तीपत्र न देणे व कामगार हक्कांचे उल्लंघन याविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे आठवण निवेदन सादर करत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ARMAPRO Security Service Pvt. Ltd. मार्फत कार्यरत असलेल्या या सुरक्षारक्षकांनी प्रशासनाकडून तात्काळ हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

जिल्ह्यातील सुमारे ५८ सोलर प्लांट साईटवर २०० ते २५० सुरक्षारक्षक मागील एक ते दोन वर्षांपासून सेवा बजावत आहेत. मात्र, त्यांना वेळेवर वेतन दिले जात नसून वेतनाची निश्चित तारीखही नाही. तसेच कामावर रुजू करताना दीर्घकालीन कराराचे आश्वासन देण्यात आले असले तरी अद्याप नियुक्तीपत्र देण्यात आलेले नाही. अनेक कामगारांना वेतन पावतीही मिळत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. पूर्वी मिळणाऱ्या १५,१२० वेतना ऐवजी सध्या केवळ १३,२२० इतकेच वेतन दिले जात असून अतिरिक्त गार्ड नेमल्याचा कारण देत कपात केल्याचा आरोप करण्यात आला आहे. मागील दोन महिन्यांत सुमारे २,००० पर्यंत कपात झाल्याचेही कामगारांनी नमूद केले आहे. वेतना बाबत विचारणा केल्यास कंपनीकडून टाळाटाळ केली जाते तसेच नोकरीवरून काढण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप आहे. या संदर्भात ११ मार्च रोजी ही निवेदन देण्यात आले होते, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे १० दिवसांत मागण्या पूर्ण न झाल्यास सर्व सुरक्षारक्षक कामबंद आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच प्रशासनाने तात्काळ चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# आयपीएलच्या आड सट्टेबाजीचा सुळसुळाट..!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

## पोलिसांची 'मिसफिल्डिंग', तरुणाई धोक्यात!"



यवतमाळ - नायगाव इंडियन प्रीमियर लींग Indian Premier League सुरू होताच बाबुळगाव तालुक्यातील नायगाव परिसरात सट्टेबाजीला अक्षरशः उधाण आले आहे. सलामीच्या सामन्यापासूनच सट्टेबाजांनी जोरदार 'फिल्डिंग' लावली असताना स्थानिक पोलीस यंत्रणा मात्र 'मिसफिल्डिंग' करत असल्याचे चित्र ठळकपणे समोर येत आहे.आयपीएल सुरू होण्याआधीपासूनच सट्टेबाज सक्रिय झाले होते.

जुन्या ग्राहकांशी संपर्क साधत त्यांनी आपले जाळे अधिक मजबूत केले आहे. नायगाव शहरासह कुंटूर, रामतीर्थ परिसरात लहान-मोठे एजंट तरुणांना आमिष दाखवत सट्ट्याच्या विळख्यात ओढत आहेत. कमी वेळात मोठा पैसा मिळवण्याच्या लालसेपोटी अनेक तरुण या अवैध धंद्याकडे वळत असून त्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू आहे. मागील वर्षी काही ठिकाणी कारवाई झाली असली तरी सट्टेबाजीचे मूळ उपटण्यात पोलीस अपयशी ठरल्याची टीका होत आहे. सध्या नायगाव, रामतीर्थ व कुंटूर पोलीस ठाण्यांमध्ये सक्षम अधिकाऱ्यांचा अभाव असल्याने सट्टेबाजांचे मनोबल वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे काही पांढरपेशी आणि राजकीय आश्रय लाभलेली मंडळी या रॅकेटमध्ये सक्रिय असल्याने कारवाई होत नसल्याचा आरोप होत आहे.दरम्यान, या सट्टेबाजीचा सर्वाधिक फटका तरुणाईला बसत आहे. अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडत असून काही दिवसांपूर्वी एका युवकाला सट्ट्याच्या जाळ्यातून बाहेर काढण्यासाठी कुटुंबाला मोठी रक्कम मोजावी लागल्याची घटना घडली आहे. त्यामुळे पालकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.

जिल्हा पोलीस प्रशासन अवैध धंद्यांविरोधात कारवाईचे दावे करत असले तरी प्रत्यक्षात सट्टेबाजीवर नियंत्रण आणण्यात अपयश येत असल्याचे चित्र आहे. आता तरी पोलीस प्रशासन या सट्टेबाजांच्या मुसक्या आवळणार का, की तरुणाई अशीच भरकटत राहणार, असा सवाल नायगाव तालुक्यातून उपस्थित केला जात आहे.

# महापुरुषांच्या जीवन परिचय स्पर्धा व सामान्य ज्ञान स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग



**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - तालुक्यातील जि.प.कें. उच्च प्राथमिक शाळा मार्लेगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित जीवन परिचय स्पर्धा तसेच क्रांतीसुर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे निमित्ताने आयोजित सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करून महामानवांचे विचार विद्यार्थ्यांना समजावे यासाठी शाळेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला होता.

परीक्षेत प्राविण्य मिळालेल्या प्राची प्रवीण कदम प्रथम क्रमांक, तृप्ती मारुती चंद्रवंशी द्वितीय क्रमांक, मनीषा अंबादास लहाने तृतीय क्रमांक बक्षीसांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन शिंदे हे कार्यक्रम अध्यक्ष म्हणून तर डॉ.कुणाल काळे, राहुल निलावार, डॉ.शिवानंद कवाने, विनायकराव कदम, विष्णू कदम, संजय देशमुख - केंद्रप्रमुख आदी मान्यवर उपस्थित होते. इतर प्राविण्यपात्र विद्यार्थि रुद्र संतोष कदम, श्रावणी विजय कदम, आराध्या गजानन चौतमाल, आवणी ज्ञानेश्वर चव्हाण, आराध्या प्रवीण कदम, गंगासागर दयानंद कदम, श्रुती मारोती चंद्रवंशी, स्वाती प्रकाश काळे, मनीषा अंबादास लहाने, संजीवनी रमेश शिंदे, भक्ती विपुल शिंदे, तृप्ती मारोती चंद्रवंशी, आदिती रामेश्वर कदम, संचिता गोविंद शिंदे, प्राची प्रवीण कदम, अक्षरा ज्ञानेश्वर कदम यांना स्कूल बॅग व शील्ड देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल रोकडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रकाश चंद्रवंशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक दिलीप लांबटिळे, प्रमोद पवार, भोने सर, जाधव सर व राठोड सर, पुष्पा जायभाये , आशा लहाने व योगिता फुंदे यांनी परिश्रम घेतले.

# व्यसनमुक्त समाजाच्या दिशेने "उदय" केंद्राचे सातत्यपूर्ण प्रयत्न



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - समाजातील वाढत्या व्यसनाधीनतेच्या समस्येवर उपाय म्हणून बेलोरा, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे स्व. मधुकरराव भगत शहरी व ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या "उदय – समुपदेशन व व्यसनमुक्ती केंद्र" मार्फत सातत्याने जनजागृती व मार्गदर्शनाचे कार्य सुरू आहे.

या केंद्राच्या माध्यमातून व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, व्यसनाधीन व्यक्तींना समुपदेशनाद्वारे योग्य मार्गदर्शन देणे तसेच त्यांना व्यसनमुक्त जीवनाकडे वळविण्यास मदत केली जात आहे. येथे समुपदेशकांच्या माध्यमातून मानसिक आधार, मार्गदर्शन व पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जात आहेत. या केंद्रात दारू, तंबाखू, गुटखा तसेच इतर व्यसनांपासून मुक्त होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना गोपनीय व प्रभावी सेवा दिली जाते. तसेच युवक, विद्यार्थी व नागरिकांसाठी वेळोवेळी जनजागृती कार्यक्रम, शपथविधी आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे. संस्थेचे अध्यक्ष राजकुमार भगत यांनी सांगितले की, "व्यसनमुक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे. या केंद्राच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे." बेलोरा व परिसरातील नागरिकांनी या केंद्राच्या सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात ! शोभायात्रेत पालवी नृत्य व मलखांब ठरले आकर्षण



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : वीरशैव हितसंवर्धक मंडळ, वसुधा प्रतिष्ठान, बसव क्लब व लिंगायत महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची ९२१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी महात्मा बसवेश्वर चौकात नगर परिषद उपाध्यक्ष दत्ताभाऊ कुळकर्णी यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. अध्यक्षस्थानी डॉ. अशोकराव मेनकुदळे होते.

यावेळी मान्यवरांनी बसवेश्वरांनी स्थापलेल्या 'अनुभव मंटप' या लोकशाही विचारांच्या केंद्राची माहिती देत समता, बंधुता व सामाजिक सुधारणा यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली. सायंकाळी निघालेल्या शोभायात्रेत वसुधा प्रतिष्ठानचा अश्वधारी रथ, संजय माटे यांचे बसवेश्वरांचे साकारण, तसेच पालवी नृत्य, बंजारा नृत्य व अष्टविनायक इंडस्ट्रीजचा मलखांब प्रयोग विशेष आकर्षण ठरले. बसव क्लबचा "कर्म हीच पूजा" देखावा लक्षवेधी ठरला. मार्गातील विविध ठिकाणी स्वागत व थंड पेयाची व्यवस्था करण्यात आली. समारोप प्रसंगी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध समाज घटकांचे सहकार्य लाभले.

# जुळ्या शहराचे अर्थचक्र रोख रकमेअभावी विस्कळीत

## जिल्ह्यातील बँकांमध्ये नगदीचा तुटवडा;एटीएमही रिकामे

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर,घाटलाडकीसह ग्रामीण व आदिवासी भागातील अर्थचक्र सध्या रोख रकमेअभावी विस्कळीत झाले आहे. जिल्ह्यातील बँकांमध्ये नगदीचा तुटवडा निर्माण झाल्याने रोखीचे व्यवहार मोठ्या प्रमाणात रखडले असून, त्याचा थेट फटका शेतकरी, शेतमजूर आणि लहान व्यापाऱ्यांना आहे.

जुळ्या शहरांमध्ये बहुतांश व्यवहार डिजिटल माध्यमातून होत असले तरी ग्रामीण भागात अजूनही रोख व्यवहारांवरच मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. त्यामुळे मजुरांचे वेतन थकले असून, शेतीसाठी लागणाऱ्या आवश्यक साहित्याच्या खरेदीतही अडथळे निर्माण झाले आहेत. खरीप हंगाम तोंडावर असताना ही परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. बँकांकडून सांगण्यात येत आहे की, अपेक्षित रोख पुरवठा होत नसल्याने अडचणी वाढल्या आहेत. रिझर्व्ह बँक इंडियाकडे मोठ्या प्रमाणात मागणी करण्यात येत असली तरी मागणीच्या तुलनेत कमी रक्कम उपलब्ध होत आहे. परिणामी, शाखांना उपलब्ध असलेल्या मर्यादित नगदीतच कामकाज करावे लागत आहे. दररोज २० लाखांची मागणी आहे. पुरवठा अपुरा घाटलाडकी येथील सेंट्रल बँकेचे शाखा व्यवस्थापक मंगेश भुरे यांनी सांगितले की,दररोज सुमारे २० लाख रुपयांची मागणी केली जाते. मात्र, जिल्ह्यातील सर्वच बँकांमध्ये रोख टंचाई असल्याने पुरवठा अपुरा पडत आहे. पुढील आठवड्यात परिस्थिती सुधारण्याची शक्यता आहे.'शेतकरी व व्यापाऱ्यांचे व्यवहार अडचणीत अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सतीश व्यास यांनी सांगितले की,'रोख रक्कम उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर चुकारा करणे कठीण झाले आहे. मेळघाटातील बहुतांश गावांमध्ये ऑनलाइन सुविधा मर्यादित असल्याने नगदी व्यवहारांवरच भर आहे. त्यामुळे व्यापारी आणि शेतकरी दोघांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.एकीकडे सुट्टीचे दिवस, सण-उत्सव आणि लग्नसराईमुळे रोख रकमेची मागणी वाढली आहे. मात्र, बँकांकडेच नगदी कमी असल्याने एटीएममध्येही मर्यादित रक्कम टाकावी लागत आहे. परिणामी, एटीएम लवकर रिकामे होत असून नागरिकांना वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. एकूणच, मागणीच्या तुलनेत रोख पुरवठा कमी असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था अडचणीत सापडली असून, परिस्थिती सुरळीत होण्यासाठी किमान आठवडाभराचा कालावधी लागू शकतो, असे बँक अधिकाऱ्यांचे मत आहे.

## अश्लील व्हिडिओ प्रसारित प्रकरणी किरीट सोमैया यांची परतवाडा पोलिसांशी चर्चा



**अचलपूर/वार्ताहर**

समाज माध्यमांद्वारे अल्पवयीन मुलींशी जवळीक साधून त्यांची अश्लील छायाचित्रे आणि व्हिडिओ प्रसारित झाल्याने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे.या घटनेचा तपास पोलिस विभागाकडून सुरू असून दररोज नवनवीन खुलासे होत आहे.काल २० एप्रिल रोजी भाजपा पक्षाचे नेते व माजी खासदार किरीट सोमैया यांनी परतवाडा पोलिस स्टेशन ला भेट देऊन अचलपूर पोलिस उपविभागीय अधिकारी शुभम कुमार आणि परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के यांच्याशी चर्चा करून आढावा घेतला.यानंतर पत्रकार मंडळी शी संवाद साधताना ,भाजपा पक्षाचे नेते व माजी खासदार डॉ. किरीट सोमैया यांनी या गंभीर प्रकरणी तपास सुरू असून तपासाची गती वाढवून दोषांवर कारवाई होणार आहे. आणि या संदर्भात अधिक माहिती देणे त्यांनी टाळले .यानंतर भाजपा पक्षाचे नेते व माजी खासदार किरीट सोमैया अमरावती कडे रवाना झाले.यावेळी भाजपा रुपेश ढेपे,शंकर भाषांनी,शंकर मालखेडे ,सतीश शर्मा,गौरव रघुवंशी ,महेश देशमुख आदी उपस्थितीत होते.

## आरटीईत २ हजार ५८६ बालकांची लागली लॉटरी

**अमरावती/का.प्र.**

प्रत्येकाला शिकता यावे म्हणून आरटीई कायदा आणला गेला. यंदा जिल्ह्यात आरटीई प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करून ऑनलाईन मोफत प्रवेशासाठी ७ हजार ९९३ पालकांनी पाल्याचे ऑनलाईन अर्ज भरले आहे. मात्र, यापैकी २ हजार ५८६ बालकांची लॉटरीत निवड झाली. परंतु, यापैकी ५ हजार ३६७ बालकांना लॉटरी न लागल्याने ही बालके मात्र मोफत प्रवेशापासून सध्यातरी दूर आहेत.

मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा कायदा २००९ पासून अस्तित्वात आला. त्यानुसार प्राथमिक शिक्षण हे मोफत आहे. मात्र, नामांकित खासगी शाळांना हा नियम लागू नाही. त्यामुळे तेथे आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के जागा राखीव ठेवून त्यावर आरटीईतून मोफत प्रवेश देणे बंधनकारक केले आहे. पण, या प्रवेश प्रक्रियेत खरा गरजू आणि गरीब कोण, हे ठरविणारी सिस्टम शिक्षण विभागाकडे नाही. प्रारंभी याकरिता 'ईश्वरचिठ्ठी' काढण्याचे प्रयोग केला. यानंतर गत काही वर्षापासून ऑनलाइन, पद्धतीने 'लॉटरी' पद्धत सुरू झाली आहे. त्यात ज्यांचा नंबर लागला, ते सोडले तर ज्यांना लॉटरी निघाली नाही, अशा विद्यार्थ्यांचे काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. वास्तविक, आरटीईचा अर्ज भरतानाच विद्यार्थ्यांचे पालक आपला उत्पन्नाचा दाखला, आपली सामाजिक वर्गवारी, घरापासून शाळेच्या अंतराचा दाखला त्यानंतरही पाल्याचा सोडतीत प्रवेशाला नंबर लागेलच याची खात्री राहिली नाही.

यंदा २०२६-२७ या शैक्षणिक सत्रासाठी फेब्रुवारी महिन्यापासून ऑनलाइन प्रक्रिया सुरू केली होती. त्यात जिल्ह्यातील २२७ शाळेत २६२६ रिक्त जागेसाठी सुमारे ७ हजार ९९३ मोफत प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज दाखल केले. ६ एप्रिलला काढलेल्या सोडतीतील निवड यादी जाहीर झाली. त्यात केवळ २ हजार ५९६ विद्यार्थीच मोफत प्रवेशासाठी पात्र ठरले. मात्र, ५ हजार ३६७ विद्यार्थी गरजू असूनही मोफत शिक्षणासाठी प्रवेशापासून दूर आहेत. यातील विद्यार्थी प्रतीक्षा यादीत असले तरी त्यांना मोफत प्रवेश मिळण्याची खात्री नाही. त्यामुळे आपल्या पाल्याला प्रतिक्षा यादीतून प्रवेश मिळेल की नाही याची धाकधुक वाढली आहे.

## त्रासदायक गतिरोधक हटविणार-जिल्हाधिकारी

**अमरावती-** जिल्ह्यात अपघात रोखण्यासाठी ब्लॅकस्पॉटवर गतिरोधक बसविण्यात येतात; मात्र अवैज्ञानिक पद्धतीने गतिरोधक बसविण्यात आले आहे. हे गतिरोधक वाहनधारकांना त्रासदायक ठरत असल्याने ते तातडीने हटविण्यात यावे, तसेच वाहनांवर प्रखर उजेड करणारी हाय बिम लाईटवर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच रस्ते सुरक्षा समितीची बैठक पार पडली. यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रतीक गिरी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.हिवरखेड, शिंगणापूर, डवरगाव आणि लेहगाव येथील हायमास्ट लाईटचा प्रश्न आहे. याबाबत संबंधित ग्रामपंचातींशी संपर्क साधून येथील याची काळजी घ्यावी, तसेच रिद्धपूर येथील पुलाच्या बांधकामामुळे झालेल्या अपघाताची काळजी म्हणून सुरू असल्यास वाहनचालकांसाठी पर्यायी मार्ग देण्यात यावी, तसेच रहदारीच्या रस्त्यांवर विकास कामे सुरक्षेविषयक उपाययोजना करण्यात याव्यात, अपघातातील जखमींना मदत करण्यासाठी पीएम राहत योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत दीड लाख रूपयांपर्यंत उपचार करण्यात येतात, याबाबत जनजागृती करण्यात यावी.

## संक्षिप्त

### महात्मा बसवेश्वर जयंती साजरी



**अमरावती-**महानगरपालिकेत महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त हार अर्पण कार्यक्रम संपन्न झाला.महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस हार अर्पण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त वर्षा लड्डा, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, सन्मानीय नगरसेवक योगेश विजयकर, ॲड. प्रशांत देशपांडे, उपायुक्त योगेश पिठे, सहायक आयुक्त भूषण पुसतकर, माजी नगरसेवक राजेंद्र महल्ले, संजय मुचळंबे, मनोज भेले, प्रमोद हडाले, पंकज कल्याणकर, गणेश काकडे, भूषण खडेकार, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### शिष्यवृत्ती परीक्षेची प्रवेशपत्रे उपलब्ध

**अमरावती-** चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणारी शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी आयोजित केली आहे. या परीक्षेची आवेदनपत्रे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली असून शाळेच्या लॉगिनमधून ती डाऊनलोड करता येणार आहे.परीक्षा परिषदेच्यावतीने चौथी विद्यार्थ्यांसाठी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले आहे. मागीलवर्षीपर्यंत ही परीक्षा पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना देता येत असे. २०२५-२६ या शैक्षणिक सत्रापासून या नियमात बदल केला आहे. आता, चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहे. डिसेंबर महिन्यापासून या परीक्षेचे ऑनलाइन अर्ज सुरू झाले होते. आता ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षेचे अर्ज भरले आहेत, त्यांची प्रवेशपत्रे राज्य परीक्षा परिषदेने उपलब्ध करून दिली आहेत. विविध शाळांच्या लॉगिनमध्ये ही प्रवेशपत्रे देण्यात आली आहेत. शाळांनी ती डाऊनलोड करून त्यांची छापील प्रत परीक्षेला बसलेल्या विद्याथ्यर्थ्यांना उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना परीक्षा परिषदेने दिल्या आहेत. प्रथम भाषा, गणित, तृतीय भाषा आणि बुद्धिमत्ता चाचणी; अशा चार विषयांची परीक्षा घेण्यात येईल. प्रथम भाषा आणि गणित यांचे पेपर सकाळी ११ ते १२.३० तर तृतीय भाषा आणि के बुद्धिमत्ता चाचणी दुपारी २ ते ३.३० वाजतादरम्यान होईल.

### सोमवारपासून कृषी विक्रेत्यांनी दिला बेमुदत बंदचा इशारा

**अमरावती-** खरीप हंगामाची पूर्वतयारी सुरू झाली असतानाच कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी येत्या २७एप्रिलपासून बेमुदत बंदचा इशारा दिला आहे. शासनाने या विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्या अद्यापही पूर्ण न केल्याने राज्यस्तरीय बंदचे आवाहन महाराष्ट्र फर्टीलायझर्स पेस्टीसाइड सीडस्, डिलर्स असोसिएशनने (माफदा) केले असून त्यास अमरावती जिल्हा कृषी निविष्ठा विक्रेता संघटनेने समर्थन देत सहभाग जाहीर केला आहे, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष मिलिंद इंगोले यांनी दिली.

कंपन्यांकडून खतांचे लिंकिंग कृषिनिविष्ठा विक्रेत्यांवर करण्यात येत असून कंपन्यांकडून रासायनिक खतांचा पुरवठा होताना होणारे कंपनीस्तरावरील लिंकिंग बंद करणे, एचटीबीटी बियाण्यांची तस्करी रोखणे, साथी पोर्टल ॲप वापराची सक्ती विक्रेत्यावर न करता बियाणे उत्पादक पुरवठादार कंपनी स्तरावर राबविणे, बियाण्यांचे नमूने फेल गेल्यास विक्रेत्यांना आरोपी न करता साक्षीदार करणे, गुणवत्ता तपासणीसाठी घेण्यात येणाऱ्या नमुन्यांची रक्कम वर्षानुवर्षे विक्रेत्यांना मिळालेली नाही, ती परत करणे या मुख्य मागण्यांसह एकूण १४ प्रकारच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. माफदाने यासंदर्भात कृषी संचालक व कृषी आयुक्तांना निवेदन सादर केले. स्थानिक पातळीवर संघटनेकडून जिल्हाधिकारी व विभागीय कृषी सहसंचालकांसह जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात येणार असल्याचे मिलिंद इंगोले यांनी सांगितले.वारंवार यासंदर्भातील निवेदने देण्यात आली असली तरी शासन व कृषी विभागाकडून ठोस निर्णय होत नसल्याने कृषी निविष्ठा विक्रेत्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. कृषी विभागाने या तक्रारींची तातडीने दखल घेऊन आठ दिवसांत त्या सोडवाव्यात, अशी मागणी करण्यात आली असून २७ एप्रिलपासून बेमुदत बंदचा इशारा दिला आहे.

## सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागात फॅकल्टी डेव्हेलपमेंट प्रोग्रॅम

**अमरावती/का.प्र.**

सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागात ऑल इंडिया काउंसील फॉर टेक्निकल एज्युकेशनचा,व्दारा प्रायोजित, इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एजुकेशन (ISTE), व्दारा मान्यता प्राप्त, एडुनेट ह्यांच्या सौजन्याने 'Green Skills & Artifical Intelligence (Skill4Future)' विषयावर एक सप्ताहाचा एफडीपी आयोजित करण्यात आला.



उद्घाटन सोहळ्याला डॉ. स्वाती शेरेकर, संचालक आणि विभागप्रमुख, incubation सेंटर, संगबाअवि, प्रमुख पाहुणे पद भूषविले. मार्गदर्शक सत्रासाठी EDUNET Ûes Re-source Persoहे जितेंद्र राठोड आणि सौरभ टेम्भूर्णे लाभले. सोबत डॉ. निसर्ग गंधेवार ह्यांनी सहभागी प्राध्यापकांना प्रात्याक्षिकाव्दारे वरील विषयावर मार्गदर्शन दिले. सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय, पीआरएमआयटीआर, पीआरएमसीईएएममी येथील प्राध्यापकांनी उत्फुर्त सहभाग नोंदविला.

कार्यशाळेकरीता डॉ. विजया शांडिल्य, समन्वयक प्रा. नितीन शेलोकार, सह-समन्वयक डॉ. निकिता मोहोड ह्यांनी संस्थेचे अध्यक्ष जगदीश गुप्ता व प्राचार्य डॉ. संजय खेरडे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम नियोजित करून यशस्वीरीत्या पार पाडला. उद्घाटन सोहळा व निरोपीय कार्यक्रमाला सर्व विभागप्रमुख, डीन, डीग्री प्रोग्राम कोऑर्डिनेटर, परीक्षा नियंत्रक, विभागातील शिक्षक प्रामुख्याने उपस्थित होते.

## अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावरही सोने खरेदीला फटका

**अमरावती/का.प्र.**

अक्षय तृतीयेसारख्या सणाच्या निमित्ताने खरेदीला विशेष महत्त्व दिले जाते. त्यातही परंपरेनुसार सोने-चांदीच्या दागिन्यांमध्ये अधिक गुंतवणूक करण्याची भारतीय ग्राहकांची मानसिकता असते; मात्र यंदा सोन्याचे भाव तब्बल १ लाख ५३ हजार प्रति तोळा, तर चांदीचे भाव प्रति तोळा २ हजार ७७० रूपयांच्या घरात पोहोचले आहे. या वाढलेल्या दरामुळे आणि तापमानाचा पाराही ४४ अं. से. पर्यंत पोहोचल्याने दिवसभरात बाजारपेठेत ग्राहकांचा प्रातिसाद अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे दिसून आले.

साडेतीन मुहतांपैकी एक मुहूर्त समजल्या जाणाऱ्या अक्षय्य तृतीयाच्या शुभ मुहूर्तावरही यंदा सराफा बाजारातील गर्दी बऱ्यापैकी ओस पडल्याचे चित्र आज पाहायला मिळाले. गतवर्षी २०२५ मध्येसुद्धा जागतिक पातळीवरील बाजारपेठेतील अस्थिरता व विशेषतः शेअर मार्केटमधील अस्थिरतेमुळे सोन्याच्या दराचा आलेख वाढताच होता. यावर्षीसुद्धा काहीशी तशीच परिस्थिती असून, यंदा तर सोन्याचे भाव दीड लाखांवर गेले आहे. यामध्ये वस्तू व सेवा कर (जीएसटी), मजुरी व इतर खर्चाचाही समावेश आहे. त्यातच आता उन्हाचा तडाखा आणि दरवाढीमुळे बिघडलेले ग्राहकांचे बजेट, याचा परिणाम



म्हणून सराफा बाजारामध्ये दिवसभर ग्राहकांचा फारसा प्रतिसाद दिसला नाही. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी मोठ्या प्रतिष्ठानांनी दागिने निर्मितीच्या मजुरीवर सवलतीही जाहीर केल्या होत्या. त्यामुळे सायंकाळनंतर गर्दीत काहीशी वाढ झाली असल्याचे दिसून आले. दरम्यान, शहरात दागीन्यांचे नवीन शोरूम उघडत असल्याचाही परिणाम सराफ्यातील बाजारपेठेवर झाल्याचे चित्र आहे.


## डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रनिर्माणाच्या दृष्टिकोनावर जीएचआरयु अमरावतीत विद्यार्थी संगोष्ठी

**अमरावती/का.प्र.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथे विद्यार्थी संगोष्ठी-२०२६ यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली. ही संगोष्ठी स्कूल ऑफ होटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी आणि स्कूल ऑफ लॉ यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली.

संगोष्ठीचे मुख्य विषय होते, 'समकालीन भारतात राष्ट्रनिर्माण : वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि जागतिक मानवतावाद यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन'. कार्यक्रमात एकूण ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी २५ विद्यार्थ्यांनी पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनद्वारे संशोधन-आधारित पेपर सादर केले.कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित माजी कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी अरुण वाघाट आणि अमरावतीचे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी जागतिक मानवतावाद या संकल्पनेवर प्रकाश टाकला तसेच युवकांना अधिकारांसोबत कर्तव्ये पार पाडण्याचे महत्त्व सांगितले आणि डॉ. आंबेडकरांचे विचार राष्ट्रीय सीमांपलीकडे जाऊन मानवी गरिमा, समता आणि बंधुत्व यांचा सार्वत्रिक चौकट देतात, असे त्यांनी नमूद केले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी अध्यक्षीय



भाषणात डॉ. आंबेडकरांच्या बहुआयामी योगदानावर प्रकाश टाकला. त्यांच्या 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' या प्रबंधाने रिझर्व बँक ऑफ इंडियाची पायाभूत रचना तयार झाली. हिराकुड धरणासारख्या प्रकल्पांमध्येही त्यांचा सहभाग होता. डॉ. आंबेडकर केवळ दलितांचे नेते नव्हते, तर संपूर्ण राष्ट्राचे दूरदर्शी नेते होते, असे डॉ. देशपांडे म्हणाले.

या दरम्यान विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. स्नेहील जयस्वाल यांनी आपल्या भाषणात सांगितले की,डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रनिर्माणातील योगदान केवळ संविधान रचण्यापुरते मर्यादित नाही. ते लोकशाही, समता आणि तर्कशुद्ध विचार यांचा समन्वय साधणारे विचारवंत होते. विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये आत्मसात करून सामाजिक परिवर्तनात सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमात स्कूल ऑफ होटेल मॅनेजमेंटचे डीन प्रो. शैलेंद्र चिकटे यांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांची आजच्या काळातील प्रासंगिकता स्पष्ट केली आणि विद्यार्थ्यांच्या विश्लेषणात्मक क्षमतेचे कौतुक केले.

पीपीटी-आधारित पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेत विजेते म्हणून प्रथम पुरस्कार सैक अली (स्कूल ऑफ लॉ), द्वितीय पुरस्कार रेणुका उल्हास बाळापुरे (स्कूल ऑफ होटेल मॅनेजमेंट) आणि तृतीय पुरस्कार पार्थ रवींद्र कदू (स्कूल ऑफ लॉ) यांनी देण्यात आले.संचालन प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी वृषाली चव्हाण आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापक क्षितिजा देशमुख (स्कूल ऑफ लॉ) यांनी केले.संगोष्ठीचे समन्वयक प्रो. शैलेंद्र चिकटे आणि प्रो. सजिब बिस्वास होते. स्कूल ऑफ लॉच्या डीन डॉ. नीता नाथ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी झाला. स्पर्धेचे निर्णायक मंडळात डॉ. भावना करमोरे, डॉ. श्रीकांत चव्हाटे आणि डॉ. मंगेश ढोरे यांनी काम पाहिले.संगोष्ठीने विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाशी गंभीर संवाद साधण्याची संधी दिली. वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि जागतिक मानवतावाद ही मूल्ये राष्ट्रनिर्माणासाठी किती आवश्यक आहेत, याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली.

## पीडब्ल्यूच्या विद्यार्थ्यांचे सीबीएसईमध्ये घवघवीत यश

**अमरावती/का.प्र.**

शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) साठी आजचा दिवस उत्सवी ठरला, कारण तिच्या अनेक विद्यार्थ्यांनी सीबीएसई १० वी बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये उच्च गुण मिळवले, ज्यामध्ये काही विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळवले आहेत. अव्वल कामगिरी करणा-यांमध्ये पंजाबच्या फजिल्का येथील वैभव अरोरा, गुजरात मधील अहमदाबाद येथील अमोलिक पंडिता आणि ओडिशातील भुवनेश्वर मधील आयुष्यमान मोहापात्रा यांनी १०० टक्के गुण मिळवून देशात पहिला क्रमांक मिळवला आहे.

याशिवाय, फिजिक्सवाला यांच्या तंत्रज्ञान-सक्षम हायब्रिड केंद्रे असलेल्या पीडब्ल्यू विद्यापीठ-पाठशाळाने अमरावती,गाडगे नगर येथे सत्कार समारंभाचे आयोजन केले. शहरातील पीडब्ल्यूच्या ज्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई १० वी बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी केली, त्यांचा सत्कार करण्यात आला. अंशुल प्रशांत सुने (९७.२०३) हे इतर विद्यार्थ्यांमध्ये उच्च गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी एक होते.फिजिक्सवाला चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अलख पांड्ये म्हणाले, 'परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा आम्हाला अभिमान आहे आणि त्यांच्या समर्पण व कठोर परिश्रमाचे आम्ही कौतुक करतो. विशेषतः ज्यांनी सर्वाधिक गुण मिळवले त्यांचे आम्ही अभिनंदन करतो. हे निकाल सातत्यपूर्ण प्रयत्न आणि योग्य शैक्षणिक सहाय्य प्रणालीचे प्रतिबिंब आहेत.'यावर्षी सीबीएसई इयत्ता १० वी च्या परीक्षांसाठी २५ लाखांहून अधिक विद्यार्थी बसले होते.

# संत्र्याचे हवे नवे वाण, मोसंबीकडे नको दुर्लक्ष

**मागील काही वर्षांत नागपुरी संत्र्याची उत्पादकता प्रभावित झाल्याने नव्या वाणांची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. नाशिक येथील सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनीच्या सहकार्याने स्पेनमधील अधिक उत्पादनक्षम टँगो वाणाच्या लागवडीला महाराष्ट्रासह देशात प्रोत्साहन देण्याचे प्रस्तावित आहे. मराठवाड्यातील मोसंबीकडे लिंबू व संत्रा यांच्याप्रमाणे गांभीर्याने लक्ष देण्याची गरजही व्यक्त झाली आहे.**



संत्रा-भारतातील लिंबूवर्गीय फळाच्या लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकी जवळपास ४० टक्के क्षेत्र एकट्या विदर्भ प्रदेशात आहे. संत्रा हे त्यातील महत्त्वाचे फळ आहे. महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, कर्नाटक, पंजाब आणि हिमाचल प्रदेशात संत्रा उत्पादन होते. महाराष्ट्राची नागपुरी संत्रा वाणासाठी ओळख असून, राज्यातील दीड लाख हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे एक लाख हेक्टर क्षेत्र एकट्या अमरावती जिल्ह्यात आहे. नागपूर जिल्ह्यात २५ हजार हेक्टर, तर उर्वरित महाराष्ट्रात २५ हजार हेक्टर क्षेत्रावर त्याची लागवड आहे. रंग आणि चवीच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मामुळे नागपुरी संत्र्याला भौगोलिक निर्देशांक (जीआय) मिळाला आहे. मागील काही वर्षांत नागपुरी संत्र्याची उत्पादकता प्रभावित झाल्याने नव्या वाणाची मागणी शेतकऱ्यांकडून व्हायची. त्या पार्श्वभूमीवर निवड पद्धतीने नवे वाण देण्याचा प्रयत्न अकोला येथील डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांकडून होत आहे. नागपुरी संत्र्याचे एकूण उत्पादन दहा लाख टनांच्या आसपास असून पैकी तीन लाख टन संत्र्याची निर्यात बांगलादेशला होते. उर्वरित संत्रा देशांतर्गत विकला जातो. नागपुरी संत्र्यात देशात इंडो-इस्माईल प्रकल्प राबविला जात आहे. या माध्यमातून लागवड अंतर कमी करत उत्पादकता वाढीचा उद्देश साधला आहे. अकोला येथील कृषी विद्यापीठाच्या भारत नगर येथील प्रक्षेत्रावर त्याचे मॉडेल साकारले आहे.

एक हजार शेतकऱ्यांनी या पद्धतीने लागवड केली आहे. या लागवड तंत्रज्ञानात लागवड अंतरासह बागेच्या छाटणीचे महत्त्व आहे. त्यासाठी राज्य सरकारच्या सहकार्यातून परदेशी बनावटीच्या चार छाटणी यंत्राची खरेदी कृषी विद्यापीठाने केली आहे. भाडेतत्वावर त्यांची उपलब्धता बागायतदारांना करण्यात येते.

**टँगो वाणाला मिळणार चालना-** नाशिक येथीस सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनीच्या सहकार्याने स्पेनमधील अधिक उत्पादनक्षम टँगो वाणाच्या लागवडीला महाराष्ट्रासह देशात प्रोत्साहन देण्याचे प्रस्तावित आहे. सध्या तीन ठिकाणी प्रात्यक्षिक स्वरूपात या वाणाची लागवड करण्यात आली आहे. सन २०२८ अखेर हे वाण व्यावसायिक लागवडीसाठी उपलब्ध करून दिले जाईल असे सांगण्यात येत आहे. त्याची उत्पादकता नागपुरी संत्र्याच्या तुलनेत अधिक असून रसाचे प्रमाणही जास्त आहे. 'टेबलफ्रूट' म्हणून त्याचा उपयोग होतो अशी माहिती सह्याद्री फार्मचे अध्यक्ष विलास शिंदे यांनी दिली. नागपुरी संत्र्यासोबतच येत्या काळात अन्य संत्रा वाणांच्या माध्यमातून निर्यातीला चालना देस्यात येणार आहे

**प्रक्रियेला चालना-** संत्र्यामध्ये ग्रेडिंग-वॅक्सिंग पॅकिंग ही मूल्यवर्धन प्रक्रिया साखळी अत्यंत महत्वाची ठरते. अलीकडील काळात याविषयी जागरूकता वाढल्याने अशा प्रकल्पांची संख्या पूर्वीच्या सातवरून नजीकच्या काळात पन्नासवर पोहोचली आहे. चीनची बाजारपेठ मोठी असून तेथे नागपुरी संत्र्याच्या निर्यातीचे प्रयत्न सुरू आहेत. अमरावती जिल्ह्यात एका कंपनीच्या माध्यमातून नव्या प्रक्रिया उद्योगाची उभारणी केली जात आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून मदर डेअरीच्या आउटलेटमध्ये नागपुरी संत्रा उपलब्ध व्हावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**मोसंबी-** जालना मोसंबीला भौगोलिक निर्देशांक (जीआय) मिळाले. त्यातून मराठवाडचातील मोसंबीचे महत्त्व अधोरेखित झाले. परंतु लिंबूवर्गीय या फळपिकाकडे लिंबू व संत्रा यांच्या तुलनेत गांभीर्याने लक्ष दिले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मोसंबीला वाचविण्यासाठी खऱ्या अर्थाने राजाश्रयासह आर्थिक पाठबळाची गरज आहे. देशात तेलंगण, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र व मध्य प्रदेश या राज्यांचा अनुक्रमे महत्त्वाची मोसंबी उत्पादक राज्ये म्हणून उल्लेख होतो सावगुडी, न्यूसेलर, काटोल गोल्ड, फुले मोसंबी या जातींची प्रामुख्याने लागवड होते.

तेलंगणा, आंध्र प्रदेशात पूर्वी सातगुडीचे क्षेत्र जास्त होते आता त्या राज्यांत न्यूसेलरचे क्षेत्र वाढले आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठवाडा त्यापाठोपाठ विदर्भ आणि काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्र व खानदेशात मोसंबीचे क्षेत्र आढळते. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड या तीन जिल्ह्यांतच सुमारे ५७ हजार हेक्टरपर्यंत मोसंबीच्या बागा असल्याची नोंद शासनदफ्तरी आहे. हेक्टरी ७ ते ८ टनांपासून ११ ते १५ टनांपर्यंत मोसंबीचे उत्पादन शेतकरी व्यवस्थापनानुसार घेतात. अलीकडे उत्पादनात मोठी घट दिसते आहे.

**मराठवाड्यात व्हावे 'सेंटर ऑफ एक्सलन्स'**

नागपूर येथे राष्ट्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन केंद्र आहे. संत्रा पट्ट्यातील या केंद्रात मोसंबीवरही प्रभावी संशोधनाची गरज आहे. हवामान बदलाच्या अनुषंगाने उपयुक्त तंत्रज्ञान सादर होणे गरजेचे आहे. कृषी विद्यापीठांची संशोधन केंद्रे आवश्यक मनुष्यबळ, अद्ययावत प्रयोगशाळा, आधुनिक तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण आदी सुविधांनी सज्ज असणे गरजेचे आहे. तरच या पिकाचा चांगला विकास होऊन मोसंबी उत्पादकांना फायदा होईल. वारंवार येणारी दुष्काळी स्थिती अवकाळी पाऊस, गारपीट, किडी-रोगांचा प्रादुर्भाव आदी विविध संकटांमुळे हे पीक खर्चिक होत आहे. हे थांबविण्यासाठी संशोधन केंद्रांचे बळकटीकरण प्राधान्याने करण्याची गरज आहे. मराठवाड्यातील मोसंबीचे क्षेत्र लक्षात घेता 'सेंटर ऑफ एक्सलन्स' केंद्राची आत्यंतिक गरज आहे. त्यामाध्यमातून निर्यातीवरही काम शक्य होईल.

पैठण येथे 'सिट्रेस इस्टेट' निर्माण होत आहे. त्यामधून काही अंशी प्रशिक्षण व रोपांचा प्रश्न मार्गी लागू शकतो. मात्र तिथेही मनुष्यबळाची वानवा आहेच. 'मार्केट'च्या दृष्टीने अजूनही मोसंबी बागवानावरच अवलंबून आहे. मूल्यवर्धन-प्रक्रियेच्या दृष्टीने ठोस काम झालेले नाही. नांदेड येथील प्रक्रिया प्रकल्प औट घटकेचा ठरला. त्यामुळे यापुढे असे प्रकल्प कोणी हाती घेईल का, त्यासाठी शासनाचे आर्थिक पाठबळ काय असेल हा प्रश्नच आहे. अन्य देशांमध्ये मोसंबीचा रस काढून त्याचे सेवन करण्याची पद्धत आहे. भारतात मात्र सोलूनच मोसंबी खाल्ली जाते. सध्या मोसंबीत न्यूसेलर, काटोल गोल्ड, सालगुडी हे वाण असून येत्या काळात कमी बियांचे वाण विकसित करण्यावर संशोधन संस्थांनी भर दिला आहे. या माध्यमातून प्रक्रियेसाठी मोसंबीचा वापर करता येणार आहे. यातूनच देशांतर्गत मागणी वाढून चांगला परतावा शेतकऱ्यांना मिळेल असा विश्वास व्यक्त होत आहे.

**विनोद इंगोले, संतोष मुंढे**

# 'डिजिटल व मल्टीपल एज्युकेटेड' महासत्ता भारत

आशिया खंडातील एक महत्वपूर्ण आर्थिक महासत्ताच नव्हे तर डिजीटल महासत्ता म्हणून उदयाला आलेला भारत आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आकाशाला गवसणी घालणारी 'मल्टीपल एज्युकेटेड सत्ता' म्हणून नावारुपाला आली आहे. सध्या भारत 'डिजिटल स्टेट' म्हणून जगात वावरत आहे.भारतातल्या किशोरवयीन पिढी पासून तर थेट वयस्कर नागरिकांपर्यंतची सर्वसामान्य जनता डिजिटल तंत्रज्ञानाला आपल्या हाताच्या मुठीत घेवून रोज वावरते.सोशल मिडीया हे शिक्षण व ज्ञान संपादन करण्याचे एवढे मोठे सशक्त व प्रभावशाली माध्यम तयार झाले आहे की, त्यामुळे क्षणाक्षणाला नवीन अपडेट सर्वसामान्य लोकांना अंगिकृत करता येतात.

पेपरलेस करन्सी ही संकल्पना सन २०१६ च्या सुरुवातीला भारताचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांनी देशवासीयांपुढे मांडली होती. तेव्हा सर्वसामान्य जनतेच्या ती पचनी पडली नव्हती. परंतू आज सहजगत्या लहानापासून तर वयस्करांपर्यंत सर्व जनता सहजगत्या पेपरलेस करन्सीचा वापर क्षणार्धात करते. कॅशलेस व्यवहार किंवा पेपरलेस करन्सी म्हणजे कागदी नोटा किंवा नाण्यांचे रुपात नसलेले पूर्णपणे डिजिटल किंवा इलेक्ट्रॉनिक्स चलन होय.

सध्याच्या वर्तमान युगात कुणालाही शक्यतोवर बॅंकेमध्ये रांगेत उभे राहून किंवा मनी स्लिप भरुन कॅश रक्कम काढण्याची वेळ येतच नाही.याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे आपला वेळ वाचवल्या जाणे.सध्या आर्टिफिशियल इंटलिजन्स ही अत्यंत प्रगत अशी टेक्नॉलाजी अस्तित्वात आली आहे. कोणत्याही बाबीविषयी तंतोतंत माहीती एका क्षणात उपयोगकर्त्याला देणारी ही अत्याधुनिक स्वयंचलित वैज्ञानिक सुविधा आहे.

मनुष्याच्या कोणत्याही प्रश्नाला समर्पक व सुसंगत अशी उत्तर देऊन त्याच्या शंकेचे निरसन करण्यात एआय (आर्टिफिशियल इंटलिजन्स) शक्तिशाली ठरली आहे. विविध प्रकारचे ज्ञान जे आपल्याजवळ नाही ते देण्याचे सामर्थ्य या प्रणालीमध्ये आहे.

एकंदरीत आधुनिक तंत्रज्ञान व डिजिटल प्रणालीमुळे भारत मल्टीपल एज्युकेटेड स्टेट म्हणून नावारुपाला आला आहे.

**अनिल बारसकर,**
अमरावती
मो. ९२७२०६१९९८

# लिव्हिंग विल : सन्मानाने जगण्याचा आणि शेवटच्या निर्णयाचा अधिकार

आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञाना मुळे जीवन वाचवण्याच्या शक्यता वाढल्या असल्या, तरी काही वेळा अशा परिस्थिती निर्माण होतात की, व्यक्ती जिवंत असली तरी स्वतःचे निर्णय व्यक्त करू शकत नाही.अशा वेळी तिच्या इच्छेचा सन्मान कसा राखायचा? याचे उत्तर म्हणजे - लिव्हिंग विल.

आपण 'विल' किंवा मृत्युपत्राबद्दल परिचित आहोत. मृत्युपत्राद्वारे व्यक्ती आपल्या मृत्यूनंतर संपत्तीचे वाटप कसे व्हावे हे ठरवते. परंतु 'लिव्हिंग विल' हा दस्तऐवज व्यक्तीच्या जिवंतपणी तयार केला जातो आणि तो विशेषतः अशा परिस्थितीत उपयोगी ठरतो, जेव्हा संबंधित व्यक्ती कोमा किंवा गंभीर आजारामुळे स्वतः निर्णय घेऊ शकत नाही.

या दस्तऐवजात व्यक्ती स्पष्टपणे नमूद करते की, अशा अवस्थेत तिला कोणत्या प्रकारचे वैद्यकीय उपचार द्यावेत किंवा किती मर्यादेपर्यंत उपचार सुरू ठेवावेत. त्यामुळे अनावश्यक उपचार टाळणे, कुटुंबीयांमधील मतभेद कमी करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यक्तीच्या इच्छेचा सन्मान राखणे शक्य होते.

भारतामध्ये Common Cause v. Union of India या ऐतिहासिक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने लिव्हिंग विल आणि 'पॅसिव्ह युथेनेशिया'ला मान्यता दिली. यामुळे 'सन्मानाने मृत्यू' (Right to die with dignity) हा अधिकार कायदेशीरदृष्ट्या अधोरेखित झाला.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने ७ एप्रिल २०२६ रोजी महत्त्वपूर्ण शासन निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयानुसार महानगरपालिका आयुक्त तसेच नगरपरिषद आणि नगरपंचायत मुख्याधिकारी यांना लिव्हिंग विलचे 'संरक्षक' म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. नागरिकांना ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने लिव्हिंग विल नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**ऑनलाईन लिव्हिंग विल करण्याची कार्यपद्धती**

१. अर्जदाराने शासनाच्या mahaulb.in या संकेतस्थळास लिव्हिंग विल या विंडो वर अर्ज भरून बनविलेल्या लिव्हिंग विल अपलोड करावे.

२. अर्जदाराने लिव्हिंग विल जतन करण्यासंदर्भात संरक्षकाची ऑनलाईन वेळ (appointment) घ्यावी.

३. सात दिवसांच्या आत दिलेल्या वेळेवर संरक्षकाच्या कार्यालयात जातांना अर्जदाराने अपलोड केलेल्या लिव्हिंग विल ची मूळ प्रत व ओळखपत्र सोबत घेऊन जाणे.

आवश्यक त्या सर्व बाबी योग्य असल्यास, संरक्षकाला अर्जदाराच्या प्रतीवर सही-शिक्का देऊन परत करतील.

**ऑफलाईन लिव्हिंग विल करण्याची कार्यपद्धती**

१. अर्जदाराने शासनाच्या संबंधित संरक्षक कार्यालयास अर्ज सादर करणे.

२. सात दिवसांच्या आत दिलेल्या वेळेवर अर्जदाराने त्यांना करावयाची लिव्हिंग विल अर्जासह नोटरी करून दोन प्रतीत संरक्षक यांचेकडे सादर करावी.

३. अर्जदाराने सादर केलेल्या लिव्हिंग विल व त्यांची ओळख नियमानुसार खात्री करून लिव्हिंग विलची एक प्रत mahaulb.in या डिजिटल पोर्टलवरील लिव्हिंग विल मोड्यूल मध्ये अपलोड करतील.

४. अर्जदाराने सादर केलेल्या मूळ नोटराइज्ड लिव्हिंग विलच्या प्रतीवरच संरक्षक त्यांच्या सही शिक्यासह अर्जदारास परत करतील.

**लिव्हिंग विल रद्द करण्याची कार्यपद्धती**

लिव्हिंग विल रद्द करावयाची असल्यास अर्जदाराने त्यांच्या लिव्हिंग विल ची मूळ प्रत संरक्षक यांच्याकडे घेऊन जावी. संरक्षक त्या प्रतीवर 'Cancel' २च्या सही शिक्क्यासह परत करून ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा संबंधिताची लिव्हिंग विल रद्द करतील.

लिव्हिंग विल संरक्षित करण्यासाठी प्रशासकीय खर्च म्हणून अर्जदारांकडून रु. १०००/- (एक हजार रुपये फक्त) नोंदणी फी घेण्यात येईल.

लिव्हिंग विल ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नाही, तर ती व्यक्तीच्या स्वाभिमानाचा, इच्छेचा आणि सन्मानाने जगण्याच्या हक्काचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या संकल्पनेची माहिती करून घेणे आणि योग्य वेळी त्याचा विचार करणे आवश्यक आहे.

**ॲड. हितेश महादेव ग्वालानी**
मो. ८४८४ ८९८९ ८७

# महिला आरक्षण नावाखाली सत्ताधारी पक्षाची फसलेली परिसीमनाची चाल !

**भारतीय जनता पक्ष कडून या विषयात मोठे राजकारण केले जात असल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने होत आहे. महिला आरक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयाला परिसीमनाशी जोडणे, मतदारसंघ वाढवण्याच्या शक्यता निर्माण करणे आणि त्यातून राजकीय समीकरणे साधण्याचा प्रयत्न यामुळे या विधेयकाच्या प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.**

भारतीय लोकशाहीमध्ये महिला सक्षमीकरणाचा प्रश्न आज केवळ सामाजिक न राहता तीव्र राजकीय वादाचा विषय बनला आहे. महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होताना दिसतो. मात्र, या सगळ्या चर्चेत तथ्य आणि प्रचार यामधील सीमारेषा ओळखणे अत्यंत आवश्यक आहे. अलीकडील काळात भारतीय जनता पक्षाकडून महिला आरक्षणाच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली जात असल्याचे चित्र उभे करण्यात आले. विरोधकांवर विशेषतः भारतीय राष्ट्रीय काँग्रेस वर महिला विरोधी असल्याचा आरोप सातत्याने केला जात आहे. प्रचार यंत्रणा आणि मीडिया माध्यमांद्वारे हा संदेश दृढ करण्याचा प्रयत्न होताना दिसतो. मात्र वास्तव वेगळे चित्र दाखवते. २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले असले तरी त्याची अंमलबजावणी तात्काळ न करता ती परिसीमन आयोगाच्या प्रक्रियेशी जोडण्यात आली आहे. याचा अर्थ जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचना पूर्ण झाल्याशिवाय हे आरक्षण लागू होणार नाही. त्यामुळे २०२९ नंतरच त्याची अंमलबजावणी शक्य होईल, अशी शक्यता व्यक्त केली जाते. याच मुद्द्यावरून विरोधकांनी आक्षेप घेतला.त्यांचे म्हणणे स्पष्ट आहे.महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय जर प्रामाणिक असेल, तर तो तात्काळ लागू करता आला असता. परिसीमनाशी जोडून त्यात विलंब करणे म्हणजे या प्रश्नाचे राजकीयकरण करणे होय. एखाद्या विधायक धोरणामागे नैतिकता आणि स्पष्टता आवश्यक असते; अन्यथा लोकशाही व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. या पार्श्वभूमीवर काँग्रेसची भूमिका तपासणे महत्त्वाचे ठरते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने पुन्हा महीला आरक्षण संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६ आणि सीमांकन विधेयक लोकसभेत सादर केली होती. या विधेयकांच्या बाजूने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सत्ताधारी पक्षातील विविध नेत्यांनी भूमिका मांडली. विरोधी पक्षांकडून अखिलेश यादव, प्रियांका गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अरविंद सावंत, अमोल कोल्हे, वर्षा गायकवाड, कल्याण बॅनर्जी यांच्यासह विरोधी पक्षांनी बाजू मांडली. हे घटनादुरुस्ती विधेयक असल्याने मंजूर करण्यासाठी लोकसभेतील उपस्थित सदस्यांच्या दोन तृतियांश मते आवश्यक असतात. लोकसभेत या घटनादुरुस्ती विधेयकावर मतविभाजनाद्वारे मतदान घेण्यात आले. घटनादुरुस्तीच्या बाजुने पहिल्या फेरीत २९८ मतदान झाले, तर घटनादुरुस्ती विधेयकाच्या विरोधात २३० मते नोंदवली गेली आहेत. एकूण ५२८ खासदारांनी मतदान केले. ५२८ चे दोन तृतियांश ३५२ होते. त्यामुळे घटनादुरुस्ती विधेयक मंजुरीसाठी आवश्यक संख्याबळ सरकारकडे नसल्याचे स्पष्ट झाले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संविधान ३११ वी दुरुस्ती विधेयक, २०२६ नामंजूर झाल्याचे जाहीर केले. यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी इतर दोन विधेयके पुढे न नेण्याचा निर्णय घेतला आहे.



केंद्र सरकार कडून महिला आरक्षण लोकसभेत आणि विधानसभेत संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयकात लोकसभेच्या जागा वाढवण्याचे प्रस्तावित केले आहे. २०२९ च्या निवडणुकीत लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांमध्ये वाढ करुन राज्यातील लोकसभेच्या जागा ८१५ आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागा ३५ जागा मिळून ८५० जागा करण्याचा प्रस्ताव विधेयकात होता. सरकारचा महिला आरक्षणातील दुरुस्ती विधेयकासोबत लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेचे विधेयक मांडले होते. विरोधी पक्षांकडून नेमका याच मुद्द्याला आक्षेप होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधी पक्षांवर टीका करताना म्हटले की, २०२३ मध्ये विरोधी पक्षाने महिलांना आरक्षण देण्याचा शब्द दिला होता. आता आरक्षण द्यायचा विषय आलेला असताना मागे हटत आहेत. महिला आरक्षण लटकवत आहात, तुम्ही निवडणुकीत जिथे जिथे जात असाल तिथे तुम्हाला या देशातील महिलांचा आक्रोश सहन करावा लागेल, असे अमित शाह म्हणाले.

**भाग- १**

विरोधी पक्षांकडून महिला आरक्षण विधेयक -२०२३ मध्ये मंजूर करण्यात आल्याची भूमिका मांडण्यात आली. केंद्र सरकारचा महिला आरक्षण विधेयकासोबत परिसीमन विधेयक आणल्याने विरोधी पक्षांनी सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी सरकारने आणलेल्या विधेयकावर बोलताना यापूर्वी महिला आरक्षण विधेयकाला सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी विरोध केल्याचे म्हटले होते. केंद्र सरकारला महिला आरक्षण लोकसभा आणि विधानसभेत लागू करायचे असेल तर ५४३ जागांमध्येच अंमलबजावणी करावी, अशी भूमिका प्रियांका गांधी यांनी मांडली. केंद्र सरकारचा लोकसभेची सदस्यसंख्या ८५०पर्यंत वाढवण्याचा प्रयत्न वरवर पाहता यात आपत्ती वाटत नाही मात्र सखोलपणे विचार केल्यास यातील राजकीय हेतू लक्षात येतो, असे प्रियांका गांधी म्हणाल्या होत्या.

मुळातच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची भूमिका स्वातंत्र्यपूर्व काळापासून महिलांच्या सक्षमीकरणाच्या बाजूने ठाम आणि सकारात्मक राहिलेली आहे. महिला आरक्षणाच्या संकल्पनेला ऐतिहासिक पाठबळ देणारा हा पक्ष आहे, हे नाकारता येत नाही. परंतु अलीकडील घडामोडींकडे पाहिले असता, या संवेदनशील विषयाचे राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न अधिक ठळकपणे दिसून येतो. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्वातंत्र्यपूर्व काळापासून महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने प्रयत्न केले त्याचा ऐतिहासिक आढावा घेता येईल.भारतातील महिला आरक्षणाच्या प्रश्नावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची भूमिका स्वातंत्र्यपूर्व काळातच मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली १९२८ पासून महिलांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, ही भूमिका मांडली गेली.१९३१ मधील कराची अधिवेशनमध्ये महिलांच्या हक्कांबाबत ठराव पारित करून समानतेचा विचार दृढ करण्यात आला. महात्मा गांधी यांनी महिलांना स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभागी करून त्यांचे राजकीय सक्षमीकरण घडवले; सरोजिनी नायडू आणि अरुणा आसफ अली यांसारख्या नेत्यांना नेतृत्वाच्या संधी मिळाल्या.

स्वातंत्र्यानंतर १९५० मध्ये भारतीय संविधान अमलात आल्यानंतर महिलांना सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळाला, जो त्यांच्या राजकीय अधिकारांच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरला. पुढे राजीव गांधी यांनी १९८० च्या दशकात स्थानिक स्वराज्य संस्था बळकट करण्यासाठी ६४ वे घटनादुरुस्ती विधेयक मांडले, ज्याने पुढील सुधारणा घडवून आणण्याची दिशा निश्चित केली. त्यानंतर पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली १९९२ मध्ये ७३वा व ७४वा घटनादुरुस्ती कायदे मंजूर झाले आणि पंचायत तसेच नगरपालिकांमध्ये महिलांना किमान ३३% आरक्षण मिळाले.संसद व विधानसभांमध्ये महिला आरक्षणासाठी काँग्रेसने १९९६ मध्ये विधेयक मांडले. २०१० मध्ये ते राज्यसभेत मंजूर करण्यात पुढाकार घेतला. २०१८ मध्ये राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून महिलांसाठी ३३% आरक्षणाचे विधेयक तातडीने मंजूर करण्याची मागणी केली. या पत्रातून महिला सक्षमीकरणासाठी सर्वपक्षीय सहकार्याची गरज अधोरेखित करण्यात आली. अलीकडे नारी शक्ती वंदन अधिनियम २०२३ ला पाठिंबा देत काँग्रेसने महिलांच्या राजकीय सहभागासाठी आपली वचनबद्धता पुन्हा स्पष्ट केली आहे. अशा प्रकारे, महिला सक्षमीकरणाच्या प्रवासात काँग्रेसचे योगदान सातत्यपूर्ण आणि महत्त्वपूर्ण राहिले आहे.

सध्या २०२६ मध्ये भारतात असम, केरळ, तमिळनाडू, पश्चिम बंगाल आणि पुदुचेरीच्या राज्यांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून विशेष अधिवेशन बोलावणे आणि त्यामध्ये महिला आरक्षणाचा प्रश्न पुन्हा चर्चेला आणणे, ही केवळ योगायोगाची बाब नाही. नारी शक्ती वंदन अधिनियम-२०२३ आधीच संसदेत मंजूर झालेले असताना, त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याऐवजी परिसीमन आयोगाशी जोडून तो पुन्हा राजकीय चर्चेचा विषय बनवण्यात आला हा खरा संशोधनाचा मुद्दा आहे.२०२६ ची जनगणना सुरू झालेली असताना, नव्या विधेयकात २०११ च्या जनगणनेचा आधार घेतला जातो,ही बाब अनेक प्रश्न उपस्थित करते. विशेषतः,२०११ च्या जनगणनेमध्ये इतर मागास वर्गीय (ओ.बी.सी.)घटकांची स्वतंत्र नोंद नसताना, आजच्या आरक्षणाच्या रचनेत त्या वास्तवाकडे दुर्लक्ष का केले जाते? हा प्रश्न केवळ तांत्रिक नाही, तर सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांशी संबंधित आहे.एकंदरीत महिला आरक्षण हा केवळ निवडणूक अजेंडा नसून सामाजिक न्यायाचा गाभा आहे. तो प्रामाणिकपणे आणि तातडीने लागू करणे आवश्यक आहे. इतिहास सांगतो की, महिलांच्या सक्षमीकरणासाठी कॉंग्रेस पक्षाने सातत्याने प्रयत्न करणाऱ्या शक्तींना कमी लेखणे आणि या विषयाचे राजकीय साधनात रूपांतर करणे ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरू शकते हे मात्र निश्चित!

**डॉ. प्रशांत विघे**
राजकीय विश्लेषक तथा
सिनेट सदस्य,
संत गाडगे बाबा अमरावती
विद्यापीठ,अमरावती
मो.९३२६८७७७४९

# फडणवीस सरकारने वाढविली बुवाबाजी !

## » बुवाबाजी विरोधी परिषदेत प्रा. श्याम मानव यांचा खळबळजनक आरोप

• अकोला | प्रतिनिधी •

राज्यात देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात सरकारने अंधश्रद्धा आणि बुवाबाजी वाढविली तसेच अंधश्रद्धा निर्मूलन कायदासुद्धा राबविण्यात अपयशी ठरले असा खळबळजनक आरोप अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक प्रा. श्याम मानव यांनी येथे केला.



महिलांना मानसिक आधार, आजारांवर उपचार, नवस-पूजा, भविष्य सांगण्याच्या नावाखाली प्रलोभने दिली जातात. त्यातूनच त्या जाळ्यात अडकतात, अशा बाबांकडून महिलांचे केवळ आर्थिकच नव्हे, तर शारीरिक शोषणही मोठ्या प्रमाणात होते. अज्ञान, भीती आणि श्रद्धेचा गैरफायदा घेत महिलांना गुलाम बनवले जाते, अशात राज्यात बुवा बापू टाकून चा मोठ्या प्रमाणात वावर वाढला आहे असे ते म्हणाले.

स्थानिक रामदासपेठ येथील मराठा मंडळ सभागृहात शनिवारी बुवाबाजी विरोधी परिषद घेण्यात आली. दरम्यान, शनिवारी सायंकाळी झालेल्या जाहीर सभेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आयोजित जाहीर सभेत प्रा. श्याम मानव यांनी बुवाबाजीवर सडेतोड हल्ला चढवला. या सभेत त्यांनी खरातसारख्या भोंदू बाबांच्या कृत्यांवर गंभीर आरोप केले.

यावेळी व्यासपीठावर शेतकरी नेते तथा दैनिक देशोन्नतीचे मुख्य संपादक प्रकाश पोहरे, सप्तखंजेरी वादक सत्यपाल महाराज, आ. अमोल मिटकरी, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सीमा बोके, राष्ट्रीय प्रवक्ते पुरुषोत्तम आवारे, अंनिसचे सहसंघटक अशोक घाटे, डॉ. सीमा तायडे, विजय कौसल, धनंजय मिश्रा, अंनिसचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत तराळ, डॉ. पुरुषोत्तम तायडे, डॉ. मिलिंद चौखडे, रमेश हिंगणकर, सौरभ वाघोडे, जिल्हा संघटक ॲड. अनिल लव्हाळे, विदर्भ संघटक किशोर वाघ, प्रतिभा भुतेकर, ॲड. रूपाली राऊत, राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

"बुवा तिथे बाया" या विषयावर बोलताना त्यांनी महिलांची होत असलेली फसवणूक, शोषण आणि अंधश्रद्धेचे जाळे याचा पर्दाफाश केला. सभेत त्यांनी नागरिकांना सावध करताना सांगितले की, कोणताही 'चमत्कार' हा विज्ञानावर आधारित हातचलाखी असते. "ढोंगी बाबांना ओळखण्यासाठी प्रश्न विचारणे, पुरावे मागणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे," असे त्यांनी नमूद केले. तसेच, आजपर्यंत अनेक बुवा-बाबांचा भंडाफोड केल्याचा उल्लेख करत त्यांनी अशा प्रवृत्तीविरोधात लढा सुरूच राहील, असा इशाराही

दिला. कुटुंबातील महिलांना जागरूक करून त्यांचे संरक्षण करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. अकोल्यातील या परखड सभेमुळे खरात प्रकरणाला अधिक धार मिळाली असून, अंधश्रद्धा व बुवाबाजीविरोधात कठोर पावले उचलण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे. संचालन चंद्रकांत झटाले तर आभार प्रदर्शन जिल्हा संघटक ॲड. अनिल लव्हाळे यांनी केले.

### रूपाली चाकणकरांना सहआरोपी करा

खरात प्रकरणाला नवे वळण देत प्रा. श्याम मानव यांनी कठोर भूमिका मांडली आहे. या प्रकरणात रूपाली चाकणकर यांना जादूटोणा विरोधी कायद्यांतर्गत सहआरोपी करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रा. मानव यांनी स्पष्ट केले की, समाजात अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या कोणत्याही कृतींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. जर संबंधित प्रकरणात जादूटोणा किंवा अंधश्रद्धेशी संबंधित बाबी आढळून आल्या, तर कायद्यानुसार जबाबदार व्यक्तींवर गुन्हा दाखल करणे टाळता येणार नाही, असेही ते म्हणाले.

### सामाजिक प्रबोधन काळाची गरज - प्रकाश पोहरे

देशात हिंदु-मुस्लीम, मंदिर-मशीद अशा धार्मिक वादात लोकांना गुंतवून ठेवण्याचा प्रकार वाढीस लागला आहे. अनेकांना लोकशाही कळाली नसल्यानेच उच्चशिक्षित लोक खरातसारख्या भोंदूबाबांच्या नादी लागत असल्याचा घाणाघाती आरोप देशोन्नतीचे मुख्य संपादक प्रकाश पोहरे यांनी यावेळी बोलताना केला, लोकांच्या मानसिकतेचा गैरफायदा भोंदुबाबा, महाराज घेत आहेत. भोंदुगिरीत मोठी वाढ झाल्याने लोकांना खऱ्या अर्थाने आजच्या काळात सामाजिक प्रबोधनाची मोठी गरज असल्याचे प्रतिपादन पोहरे यांनी केले.

### देवाचा आशीर्वाद असल्याची बतावणी

भोंदूबाबा असा काही प्रकार नसतो, बाबा असतो आणि प्रत्येक बाबा जो दैवी शक्ती आहे, असं सांगतो आणि ते सगळेच्या सगळे भोंदू आणि खोटारडे असतात. या जगातला बाबा तो कोणीही असो जो काहीतरी देवाचा आशीर्वाद माझ्यामुळे तुम्हाला मिळतो अशी बतावणी करतात ते सगळे खोटे आणि भोंदू असतात, असे श्याम मानव म्हणाले.

## शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात "झेप" निरोप समारंभ संपन्न



• अकोला | प्रतिनिधी •

स्थानिक शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात बी.ए., बी.कॉम,बी. एस.स्सी, बीसीए व पदव्युत्तर च्या अंतिम वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता "झेप" निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळ अकोलाचे सचिव गोपाल खंडेलवाल हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.विजय नानोटी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. जगदीश साबू, कलाशाखा प्रमुख डॉ.शिवाजी नागरे, विज्ञान शाखा प्रमुख डॉ प्रसन्न पांडे, वाणिज्य शाखा प्रमुख डॉ.अर्चना खंडेलवाल ह्या उपस्थित होत्या.

कार्यक्रमांमध्ये कु सुरभी धावेकर, दिव्या धारपवार, निकिता पोरे, वैष्णवी उजगावकर, रोशनी धवसे, निकिता पांडव, प्रणाली पिंपळकर, श्रावणी राजवैद्य या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. विजय नानोटी यांनी विद्यार्थ्यांनी भविष्यातील संधींचा योग्य शोध घेऊन आपले भविष्य उज्वल करावे असे आवाहन केले. गोपालजी खंडेलवाल यांनी विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाकरिता योग्य संकल्प, चिकाटी, मेहनत करून आपले भविष्य घडवावे असे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. शिवाजी नागरे तर पाहुण्यांचा परिचय प्रा. खंडेलवाल यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. डिंपल मापारी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ प्रसन्न पांडे यांनी केले. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना राष्ट्रविषयक प्रतिज्ञा डॉ मनोज मालपणी यांनी प्रदान केली.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला.

### चौकशीची जाहिर नोटिस

अर्ज क्रमांक :- 37/2026 कलम - 19

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** वसंतरावजि नाईक पुतळा सौंदर्यीकरण कृती समिती, अकोला

**अर्जदार :-** श्री. नारायण मानसिंग चव्हाण, मु.पो.कपिला नगर, दत्त कॉलोनी जवळ, गौरक्षण रोड, अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 22 / 19 अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. (1) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? 2) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ) जंगम मिळकत (वर्णन) : 1001/- रुपये नारायण मानसिंग चव्हाण यांचे जवळ जमा. आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त -1, शिक्कयानीशी आज दिनांक -16/04/2026 रोजी दिली.

(शिक्का)

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

### जाहिर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. क्रमांक : १४४/२०२६ — प्रोसेस क्र. ४०१/२०२६
चौकशी तारीख : ०९/०६/२०२६ — दि. १५/०४/२०२६

**अर्जदार :** - १. सौ. छाया विरानंद सपकाळ - वय ३९ वर्षे, धंदा - शेती, २. प्रांजली विरानंद सपकाळ - वय २० वर्षे, धंदा- शिक्षण, ३. प्रेमानंद विरानंद सपकाळ - वय १८ वर्षे, धंदा - शेती, सर्व अर्जदार रा. कारला बु., पोस्ट. सौंदळा, ता. तेल्हारा, जि. अकोला.

... विरूध्द ..

**गैरअर्जदार :** कोहीणी नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र.१ ते ३ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ चे वडील **मयत नामे विरानंद कैलास सपकाळ** हे दि. २३/११/२०२३ रोजी मौजे रेल्वे स्टेशन, अकोला, ता. जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत. त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ०९/०६/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १५/०४/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

(शिक्का)

आदेशानुसार,
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

### जाहिर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. कमांक : १४३/२०२६ — प्रोसेस क्र. ३९९/२०२६
चौकशी तारीख : ०९/०६/२०२६ — दि. १३/०४/२०२६

**अर्जदार :** - १. अनुसया वसंत ताळे - वय ६२ वर्षे, धंदा- घरकाम, २. प्रविण वसंत ताळे, वय ४० वर्षे, धंदा-शेती, ३. प्रफुल्ल वसंत ताळे - वय ३१ वर्षे, धंदा- शेती, ४. दिपाली गोपाल रंदे - वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम, अर्जदार क. १,२,३ रा. वार्ड नं. ०४, गुलमोहर, हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क्र. ४ रा. नाका नं. ०४, अंजनगांव रोड, अकोट, ता. अकोट, जि. अकोला

... विरूध्द ..

**गैरअर्जदार :** कोहीणी नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते ४ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क.. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ४ चे वडील **मयत नामे वसंत श्यामराव ताळे** हे दि. १४/०१/२००९ रोजी मौजे हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ०९/०६/ २०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १३/०४/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

(शिक्का)

आदेशानुसार,
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४१,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला -४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १३७

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन्स क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय : अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन : ९८२३०१६३०० | ९४२२९५६२६८
email : atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# सेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक

## शिबिरे घेऊन अर्जांचा आठवड्यात निपटारा करा - जिल्हाधिकारी वर्षा मीना

• अकोला | प्रतिनिधी •

सेवा हक्क अधिनियमानुसार अधिसूचित सेवा नागरिकांना कालमर्यादित पुरविणे आवश्यक आहे. त्यात एकही अर्ज प्रलंबित राहता कामा नये. सर्व यंत्रणांनी शिबिर स्तरावर काम करून आठवडाभरात सर्व अर्जांचा निपटारा करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

सेवा हक्क अधिनियमानुसार प्राप्त अर्जांवर विविध यंत्रणांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे व सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, अधिनियमानुसार कालमर्यादा लक्षात घेऊन अर्जांचे निराकरण व्हावे. या बाबीचा विभागप्रमुखांनी आपल्या विभागात प्रत्येक तालुक्यात आढावा घ्यावा. शिबिरांचे आयोजन करून आठवडाभरात सर्व अर्ज निकाली काढा. एकही अर्ज प्रलंबित राहता कामा नये. चांगला परफॉर्मन्स असलेल्या कार्यालयाला गौरविण्यात येईल. पारदर्शकता, उत्तरदायित्व, कालबद्धता व कार्यक्षमता यांचा अवलंब करून प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याचे आवाहन त्यांनी केले लोकसेवा हक्क दिन दि. २८ एप्रिल रोजी साजरा केला जाईल.

### जाहिर नोटीस

**वि. ०४थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.नं. ३२५/ २०२६ — प्रोसेस नं. : ३१०२/२०२६
चौ. ता. ०६/०५/२०२६ — दिनांक: ०७/०३/२०२६

**अर्जदार :** - १. लता बाबुलाल पोरे, २. सागर बाबुलाल पोरे, ३. संदेश बाबुलाल पोरे, अर्जदार क्र. १ ते ३ रा. कानशिवणी, ता. जि. अकोला. ४. गौकर्णा आनंदा पोरे, रा. चरणगाव, ता. पातूर, जि. अकोला.

... विरूध्द ..

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता : मयत :-** बाबुलाल आनंदा पोरे, पत्ता :- रा. कानशिवणी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बाबुलाल आनंदा पोरे यांचे दि. ०४/०५/२०२४ रोजी कानशिवणी, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

आदेशानुसार,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, (व.स्तर), अकोला

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला.

### चौकशीची जाहिर नोटिस

अर्ज क्रमांक :- 34/2026 कलम - 19

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** समता बौध्द विहार ट्रस्ट, सांगळूद बु. ता. जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. नितेश समाधान शिरसाट, मु.पो. सांगळूद बु. ता.जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 22 / 19 अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. (1) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? 2) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ) जंगम मिळकत (वर्णन) : 1001/- रुपये नारायण मानसिंग चव्हाण यांचे जवळ जमा. आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त -1, शिक्कयानीशी आज दिनांक -16/04/2026 रोजी दिली.

(शिक्का)

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

### CHANGE IN NAME

I Have Change My Name in My SON'S Passport No is (V9450501)
-- From --
SARITA NITINKUMAR NEBHANI
-- TO --
SARITA NITIN NEBHANI
My Residential Address is - Nr. Anandpur Mandir Sindhi Camp Pakki Kholi West Gandhi Nagar Akola Maharashtra 444004.

### CHANGE IN NAME

I Have Change My Name in My SON'S Passport No is (V9450501)
-- From --
NITINKUMAR ASHOKKUMAR NEBHANI
-- TO --
NITIN ASHOK NEBHANI
My Residential Address is - Nr. Anandpur Mandir Sindhi Camp Pakki Kholi West Gandhi Nagar Akola Maharashtra 444004.

### CHANGE IN NAME

CHANGE IN NAME
I Have Change My Name in My Passport No is (V9450501)
-- From --
DAKSH NITINKUMAR NEBHANI
-- TO --
DAKSH NITIN NEBHANI
My Residential Address is - Nr. Anandpur Mandir Sindhi Camp Pakki Kholi West Gandhi Nagar Akola Maharashtra 444004.

### अकोला महानगरपालिका, अकोला
### पाणी पुरवठा विभाग
### निविदा सुचना क्र. १, सन २०२६-२७

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मनपा निधी अंतर्गत अकोला महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाव्दारे विविध भागात टॅकरव्दारे प्रति किलोमिटर प्रति टॅकर दर मागविणे बाबत. दि. २०/०४/२००२ रोजी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(संपर्क- ७७०९०४९३५१)
संकेतस्थळ - www.amcakola.in

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला

# अद्वैत संगीत अकादमीच्या संगीत सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

• अकोला | प्रतिनिधी •

अभिजात संगीतासाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या स्थानिक अद्वैत संगीत अकादमी च्या वतीने आयोजित संगीत सोहळ्यास कलारसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सिव्हिल लाईन येथील आयएमए सभागृहात नुकताच हा "अनप्लग नाईट" अर्थात संगीत सोहळा संपन्न झाला. अद्वैत संगीत अकादमीचे संचालक ॲड. शिवम भौरदकर यांच्या अध्यक्षतेत संपन्न या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून फडके अकॅडमीचे संचालक प्रा सतिश फडके व सौ मंजुषा फडके उपस्थित होते. कार्यक्रमात अद्वैतच्या विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर गायन, वादन व नृत्याचे सुंदर सादरीकरण करीत जल्लोष निर्माण केला. यावेळी बिटबोक्सिंगच्या सादरीकरणाने प्रेक्षकांना आश्चर्यचकित केले.



यावेळी चिमुकल्यांच्या सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली व विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उत्कृष्ट साथ-संगत लाभली. या गीत गायन कार्यक्रमात किबोर्ड वर जयकुमार गुरु, ऑक्टोपॅड वर नितीन गुरु आणि ढोलकवर योगेश चांडाले यांनी साथसंगत केली. या कार्यक्रमात उत्कृष्ट विद्यार्थी अवॉर्ड संतोष कुमार पर्धी, पार्थ केदार व सिद्धी देशमुख यांनी पटकावला. प्रवीण देशमुख यांनी चित्रपट नटांची मिमिक्री सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. छायांकन संजय सारकटे, मयूर धनुर्धारी व अझगर हुसेन यांनी व पवन वासनकर यांनी ध्वनी यंत्रणा सांभाळली. संचालन डॉ. प्रवीण देशमुख यांनी तर आभार ॲड. शिवम भौरदकर यांनी मानलेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गायत्री तिवारी, अंतरा गद्रे, खुशी तिवारी, मांडवी पाटील, वैभव मांडवकर, आदित्य पानझडे, आदित्य माधवानी व अर्पित लोखंडे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी अकादमीचे विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

# शाहबाबू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पक्ष्यांसाठी उभारले पियाऊ

## भीषण उष्णतेत मानवतेचे उदाहरण

• पातूर | प्रतिनिधी •

भीषण उष्णतेच्या वाढत्या प्रकोपाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील पक्ष्यांसाठी पियाऊ (पाण्याची व्यवस्था) करण्याची स्तुत्य पुढाकार शाहबाबू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घेतली आहे. विद्यार्थ्यांनी शहरातील विविध ठिकाणी जसे बँक, हॉटेल, बसस्थानक, पोलीस स्टेशन आणि तहसील परिसराच्या आसपास झाडांवर माठ व पाण्याची भांडी बांधून नियमित पाणी भरण्याची व्यवस्था केली आहे, ज्यामुळे तहानलेल्या पक्ष्यांना दिलासा मिळत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत जलस्रोत आटल्यामुळे पक्ष्यांना पाण्याची मोठी कमतरता भासते. अशा वेळी ही छोटीशी पुढाकार त्यांच्या जीवनासाठी अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. या कार्यातून प्रेरणा घेऊन अनेक विद्यार्थी आणि पालकांनीही आपल्या घरांच्या छतांवर आणि अंगणात पाण्याची भांडी ठेवून पक्ष्यांप्रती संवेदनशीलता दाखवली आहे. या मोहिमेत विद्यार्थी-



विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग घेतला असून नागरिकांनाही आपल्या परिसरात पक्ष्यांसाठी पाणी आणि दाण्याची व्यवस्था करण्याचे आवाहन केले आहे.

स्थानिक नागरिकांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले आहे. यावेळी संस्थेचे प्रमुख सैय्यद इसहाक राही यांनी सांगितले, "मानवता केवळ माणसांपुरती मर्यादित नसून, सजीव प्राण्यांप्रतीही आपली जबाबदारी आहे." या उपक्रमामुळे पक्ष्यांना दिलासा मिळत असून समाजात पर्यावरण संरक्षण आणि सजीवांप्रती संवेदनशीलतेचा सकारात्मक संदेशही पसरत आहे.

या कार्यासाठी संस्थेचे सचिव सैय्यद इसहाक राही यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य मुजीबउल्लाह खान, उपप्राचार्य एहसान उर रहमान, प्रकल्प प्रमुख प्रा.सोहेल आफाक, प्रा.सैय्यद फरहान तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले

# मारवाड़ी महिला संमेलनचा महिलांना माठ वितरण उपक्रम

• अकोला | प्रतिनिधी •

सामाजिक व मानवीय सेवेत सक्रिय अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलनच्या अकोला शाखेच्या वतीने भीषण गर्मीत महिलांना शीतल जल मिळो यासाठी अक्षय तृतीयाच्या दिनावर गरजू महिलाना मातीचे माठ वितरण उपक्रम साकार करण्यात आला. यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संमेलनच्या स्थानीक अध्यक्ष संध्या अग्रवाल यांच्या पुढाकारात व सचिव दीप्ति सिकरिया, कोषाध्यक्ष हेमा खटोड़ व संमेलन च्या संस्कार संस्कृति समितीच्या प्रमुख कीर्ति



काबरा, रेखा अग्रवाल यांच्या उपस्थितीत स्थानीय राणी सती धाम मध्ये उपस्थित सदस्य कडून संकल्प घेत मातीचे माठ, आंबे साखर व चाळणी साहित्य गरजू महिलाना प्रदान करण्यात आले. या उपक्रमचा 55 गरजू महिलांनी लाभ घेत या उपक्रमाची प्रशंसा केली. यावेळी बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

**महिला आरक्षणाचा घात!**

# विरोधकांनी लोकशाहीचा गळा घोटला - मुख्यमंत्री

## ‘७० कोटी महिलांचा विश्वासघात’ : संसदेत खळबळ; महाराष्ट्रात संतापाची लाट

**मुंबई/जनमाध्यम**

महिला आरक्षण विधेयकाला संसदेत आवश्यक दोन-तृतीयांश बहुमत मिळू न देऊन विरोधकांनी जाणीवपूर्वक लोकशाही प्रक्रियेचा गळा घोटल्याचा गंभीर आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. हा केवळ विधेयकाचा पराभव नाही, तर ७० कोटी महिलांच्या आशा-अपेक्षांचा विश्वासघात आहे, असा घणाघात करत त्यांनी विरोधकांवर थेट हल्ला चढवला. या घटनेनंतर राज्यभर राजकीय तापमान प्रचंड वाढले असून संतापाची लाट उसळली आहे.

सोमवारी सकाळी ११ वाजता पत्रकार परिषदेत बोलताना फडणवीस यांनी या संपूर्ण प्रक्रियेला महिला सक्षमीकरणावरील जाणिवपूर्वक केलेली राजकीय हत्या असे संबोधले. त्यांच्या मते, संसदेत सादर करण्यात आलेले महिला आरक्षण विधेयक हे अचानक आलेले नव्हते, तर २०२३ च्या घटनादुरुस्तीच्या पार्श्वभूमीवर आणि दीर्घकालीन परिसीमन प्रक्रियेच्या आधारे तयार करण्यात आले होते.

१९७६ आणि २००२ च्या परिसीमन प्रक्रियेच्या धर्तीवरच पुढील टप्पा म्हणून हे विधेयक आणले गेले होते, असे त्यांनी स्पष्ट केले. मतदान प्रक्रियेत विधेयकाच्या बाजूने २९८ मते पडली, तर विरोधात २२१ मते गेली. मात्र घटनादुरुस्तीला आवश्यक असलेले दोन-तृतीयांश बहुमत न मिळाल्याने विधेयक मंजूर होऊ शकले नाही. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार टीका करत ठरवून या विधेयकाला अडथळा



आणण्यात आला, असा आरोप केला. महिलांच्या हक्कांचा मुद्दा राजकारणाच्या नजरेतून पाहणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याची ऐतिहासिक संधी दडपण्यात आली आहे, असे ते म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की, या विधेयकामुळे लोकसभेत महिलांचे प्रतिनिधित्व सध्याच्या तुलनेत तिप्पट झाले असते, ज्यामुळे निर्णय प्रक्रियेत महिलांचा प्रभाव वाढला असता.

फडणवीस यांनी विरोधकांच्या भूमिकेवर टीका करताना महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांचाही उल्लेख केला. समतेची भाषा करणारेच प्रत्यक्षात समतेच्या विरोधात उभे राहिले. हा फुले विचारांचा अपमान आहे, असे ते म्हणाले.

त्यांनी आरोप केला की, विरोधकांनी चर्चेच्या नावाखाली केवळ अडथळे निर्माण केले आणि शेवटी विधेयक रोखण्याचा हेतूपुरस्सर प्रयत्न केला.

या घटनेनंतर राज्यात महिला संघटनांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत महिलांमध्ये संताप व्यक्त होत असून आरक्षण आमचा हक्क आहे, भीक नाही अशा घोषणा दिल्या जात आहेत. सरकारकडून याला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप देण्याची तयारी सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत.

मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, महाराष्ट्रात एक कोटी महिलांच्या स्वाक्षऱ्यांची मोहीम राबवली जाणार असून, गावपातळीपासून जनजागृती अभियान सुरू केले जाईल. जोपर्यंत संसदेत महिलांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत हा लढा थांबणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, राजकीय वर्तुळात या मुद्द्यावर तीव्र चर्चा सुरू असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे. महिला आरक्षणाचा प्रश्न आता केवळ विधेयकापुरता मर्यादित न राहता देशातील मोठ्या राजकीय संघर्षाचे केंद्रबिंदू बनला आहे.

# व्यसनांपासून दूर राहा, उज्ज्वल भविष्य घडवा

**हुतात्मा राष्ट्रीय विद्यालयात अमली पदार्थ विरोधी जनजागृती शिबिर उत्साहात**

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

सध्याच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात तरुण पिढीने अमली पदार्थांच्या विळख्यात अडकणे ही गंभीर सामाजिक समस्या बनत चालली आहे. या पार्श्वभूमीवर हुतात्मा राष्ट्रीय विद्यालय, आष्टी येथे अमली पदार्थ विरोधी जनजागृती व व्यसनमुक्ती मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शारदा दाभाडे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्याध्यापक विना तांबसकर, पर्यवेक्षक सुनील ईखार, नंदकिशोर वाढवे, अमर ठाकूलकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्याध्यापक विना तांबसकर यांनी केले. त्यांनी शालेय वयातच व्यसनमुक्तीचे महत्त्व अधोरेखित करत अशा जनजागृती उपक्रमांची गरज स्पष्ट केली. मुख्य मार्गदर्शक म्हणून आष्टी पोलीस ठाण्याचे वाहतूक पोलीस शिपाई विभीषण



केंद्र यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी अमली पदार्थांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम सविस्तरपणे स्पष्ट केले. ते म्हणाले, एका चुकीच्या निर्णयामुळे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते. व्यसन लागल्याचे कळत नाही आणि लागल्यानंतर सुटणे कठीण होते. त्यामुळे कोणत्याही दबावाला किंवा कुतूहलाला बळी पडू नका, त्यांनी अमली पदार्थ तस्करीसंदर्भातील कायदे व पोलिसांची कडक भूमिका याविषयीही माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतात शारदा दाभाडे यांनी अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यावर तीव्र चिंता व्यक्त केली. त्या म्हणाल्या, विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. अमली पदार्थ हे समाजाला पोखरणारे वाळवीसारखे आहेत. विद्यार्थ्यांनी आपली ऊर्जा अभ्यास, खेळ आणि कला क्षेत्रात वापरावी. सुदृढ शरीर व सशक्त मन हीच यशाची खरी पायरी आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. यू. पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन एल. आर. जाधव यांनी मानले.

या शिबिराला विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्त जीवना विषयी सकारात्मक जन जागृती निर्माण झाली असून उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आरोग्य यंत्रणेचा ढिसाळ कारभार उघड

## विरूळ उपकेंद्र ‘डॉक्टरविना’च रुग्णसेवेचा केविलवाणा चेहरा

**विरूळ आकाजी/जनमाध्यम**

शासन आरोग्य विभागावर कोट्यवधी रुपये पाण्यासारखा खर्च करत असल्याच्या घोषणा वारंवार केल्या जातात. परंतु प्रत्यक्षात ग्रामीण भागातील आरोग्यसेवेचे चित्र मात्र विदारक आणि चिंताजनक असल्याचे विरूळ आकाजी येथील उपकेंद्राच्या अवस्थेवरून स्पष्टपणे दिसून येते. दोन वर्षांपासून येथे डॉक्टरच नाही. आणि जे आहे तेही नावापुरतेच, विरूळ हे आर्वी तालुक्यातील सर्वात मोठे आणि मुख्य बाजारपेठेचे गाव. या गावाला लागून तब्बल ३० ते ३५ आदिवासी बहुल गावे आहेत.

त्यामुळे हे ठिकाण आरोग्यसेवेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. बँक, दवाखाना, तलाठी कार्यालय, कृषी सेवा केंद्र यासाठी दररोज शेकडो नागरिक येथे ये-जा करतात. विद्यार्थ्यांचीही मोठी वर्दळ असते. मात्र आरोग्याच्या बाबतीत हे गाव अक्षरशः वाऱ्यावर सोडले गेले आहे. येथील उपकेंद्रात डॉक्टर नसून फक्त एक नर्स व आरोग्य सेवक कार्यरत आहे. त्यातही उपकेंद्राची इमारत जीर्ण अवस्थेत असून रात्रीच्या वेळी राहण्यास धोकादायक असल्याने संध्याकाळनंतर हे केंद्र थेट कुलूपबंद केले जाते. परिणामी, रात्री अचानक आजारी पडलेल्या रुग्णांना उपचारासाठी भटकंती करावी लागते. अनेक वेळा रुग्णांना जीवघेण्या स्थितीत आर्वी किंवा इतर ठिकाणी धाव घ्यावी लागते.

गावकऱ्यांनी वारंवार पूर्ण क्षमतेचे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याची मागणी केली आहे. मात्र अद्यापही ही मागणी कागदावरच अडकलेली आहे. मोठ्या घोषणांचा गाजावाजा करणाऱ्या आरोग्य विभागाच्या कारभारावर या घटनेमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या गावात ही अवस्था असेल तर आदिवासी गावांतील आरोग्यसेवेची स्थिती किती गंभीर असेल, याची कल्पनाच अंगावर शहारे आणणारी आहे.

स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून आता जोरदार मागणी होत आहे की, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून विरूळ उपकेंद्रासाठी नवीन इमारत, कायमस्वरूपी डॉक्टर आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. अन्यथा ग्रामीण आरोग्य यंत्रणेचे हे ढासळलेले चित्र आणखी गंभीर रूप धारण करेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## गौळ परिसरात उन्हाच्या कडाक्यातही पेरणीपूर्व मशागतीची लगबग

**गौळ/जनमाध्यम**

गेल्या आठवड्यापासून परिसरात उन्हाची तीव्रता झपाट्याने वाढली असली तरी गौळ शिवारात शेतकऱ्यांची लगबग काही थांबलेली नाही. रब्बी हंगामातील गहू, चणा पिकांची काढणी पूर्ण झाल्यानंतर आता खरीप हंगामासाठी पेरणीपूर्व मशागतीची कामे वेगाने सुरू झाली आहेत.

शेतात उरलेला काडीकचरा, पऱ्हाटी वेचणी, नांगरणीपूर्व तयारी अशी कामे शेतकरी आणि शेतमजूर संयुक्तपणे पूर्ण करत आहेत. मात्र वाढत्या उन्हाच्या झळांमुळे मजुरांनी सकाळीच कामाला सुरुवात करून दुपारी बारा वाजताच घरचा रस्ता धरावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनाच अनेक ठिकाणी स्वतः शिवारात उतरावे लागत आहे.

कधी दुष्काळ, कधी अनिश्चित पाऊस, तर कधी उत्पादन खर्चाचा वाढता भार अशा असंख्य आव्हानांमध्येही शेतकऱ्यांची धडपड सुरूच आहे.

वेळेत पेरणी झाली तरच काळ्या आईची ओटी भरते या विश्वासावर ते आगामी खरीप हंगामाची तयारी करत आहेत. उन्हाच्या कडाक्यात घाम गाळत असतानाही शेतकऱ्यां च्या डोळ्यांत मात्र हरित स्वप्नांची आस अजूनही ताजीच आहे.

# आज सिंदीत प्रथमच कबीर पंथीयांची ‘नवोदय यात्रा’

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**

सदगुरु कबीर धर्मदास वंशावली मिशनअंतर्गत, ‘नवोदय यात्रा’ व कबीर पंथाचे १६ वे पंथाचार्य पंथ श्री हुजूर उदितमुनी नाम साहेब यांचे सिंदी शहरात प्रथमच मंगळवारी (ता.२१) ला आगमन होत असुन या ऐतिहासिक सोहळ्यासाठी स्थानिक कबीर मंदीरात आणि शहरात भव्य साजश्रुंगार, सजावट करण्यात आली आहे. यानिमित्ताने शहरात कबीर पंथीयांची मोठी मादीयाळी राहणार आहे .

पंथ श्री हुजूर प्रकाशमुनी नाम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या भव्य कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ६ वाजता पंथ श्रींच्या भव्य आगमनाने होईल. त्यानंतर रेल्वे उड्डाणपूल ते मुक्तधाम कबीर मंदिर पर्यंत ‘नवोदय यात्रेची’ रोमहर्षक भक्तीमय शोभायात्रा स्थानिक ‘शिवगुंज’ ढोल पथकाच्या तालावर, डोक्यावर कलश घेतलेल्या १६ महिला, हातात आरती घेतलेल्या १६ महिला आणि १६ ध्वजधारी महिलाचा सहभागत निघणार आहे. नवोदय यात्रेची जय्यत तयारी म्हणून बसस्थानक चौकात भव्य स्वागत कमान गेट उभारले असुन यात्रेतील भक्तांसाठी ठिकठिकाणी थंडशीतपेयाचे वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे.

शोभायात्रेनंतर मुक्तधाम कबीर मंदिर येथे विविध धार्मिक विधी संपन्न होतील यामध्ये प्रामुख्याने गुरुचरण वंदनाः पंथाचार्यांचे स्वागत व पूजन तसेच सत्संग व आशीर्वादः पंथ श्री उदितमुनी नाम साहेब उपस्थित भाविकांना मार्गदर्शन व आध्यात्मिक आशीर्वाद देतील. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# राष्ट्रभाषा प्रचार समिती रोडवर विकासाचा खेळखंडोबा

## रस्ता झाला म्हणे काम संपले, नाली, लाईट, पेव्हर ब्लॉक गायब; शासन-प्रशासनावर नागरिकांचा संताप

**वर्धा/जनमाध्यम**

वर्ध्यातील राष्ट्रभाषा प्रचार समिती रोडवर विकासाच्या नावाखाली अक्षरशः खेळखंडोबा झाल्याचे चित्र समोर आले आहे. रस्ता झाला म्हणजे विकास झाला अशी थाप मारत शासनाने पाठ थोपटून घेतली मात्र प्रत्यक्षात हा रस्ता आजही अर्धवट अवस्थेतच आहे. तब्बल एक ते दीड वर्ष उलटूनही पूरक कामे न झाल्याने नागरिकांना त्रासाचा सामना करावा लागत असून संतापाचा उद्रेक होत आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बसवायचे पेव्हर ब्लॉक आजही बसवले गेलेले नाहीत. परिणामी कडेला माती साचून रस्ता झिजू लागला आहे. पावसाळा तोंडावर असताना ही परिस्थिती अधिकच बिकट होणार, हे स्पष्ट दिसत आहे. दुसरीकडे नाल्यांची कामे पूर्णपणे रखडली आहेत. काही भागात नालीच नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साचते आणि चिखल, डास व दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण होते. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. रात्रीच्या वेळी परिस्थिती आणखी भीषण बनते. राष्ट्रभाषा प्रचार समिती रोडवर अनेक ठिकाणी इलेक्ट्रिक पोल व पथदिवे नसल्याने अंधाराचे साम्राज्य पसरते. अपघातांचा धोका वाढला असून महिला व



ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा विकास की नागरिकांची थट्टा असा प्रश्न आता सर्रास ऐकू येत आहे.

विशेष म्हणजे हा गंभीर प्रश्न नगरसेविका स्नेहा आशिष आकरे यांनी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या जनता दरबारात मांडला होता. त्यांनी तत्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेश दिले; मात्र त्या आदेशांची अंमलबजावणी आजपर्यंत झालेली नाही. संबंधित अधिकारी प्रभागात फिरकलेसुद्धा नाहीत, ही वस्तुस्थिती अधिकच संतापजनक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी यांच्याकडे वारंवार संपर्क साधूनही मार्च महिना आहे, अशा कारणांवर उडवाउडवीची उत्तरे दिली जात होती. नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत केवळ कागदावर विकास दाखवण्याचा उद्योग सुरू असल्याचा आरोप होत आहे.

दरम्यान, काम पूर्ण दाखवून निधी गिळला का असा गंभीर प्रश्नही उपस्थित केला जात आहे, शासनाच्या नावावर अर्धवट कामे करून जनतेची फसवणूक होत असल्याची भावना तीव्र झाली आहे. नागरिकांनी स्पष्ट इशारा दिला आहे, राष्ट्रभाषा प्रचार समिती रोडवरील सर्व पूरक कामे तातडीने सुरू झाली नाहीत, तर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. आता तरी शासन-प्रशासन जागे होणार का, की पुन्हा आश्वासनांच्या फुग्यांनीच जनतेची बोळवण होणार, याकडे वर्धेकरांचे लक्ष लागले आहे.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर N8664580 वरील माझे NILOFAR BAKSH असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील NILOFER NAUSHAD BAKSH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता :- दाते सभागृह

**नावात बदल**

माझे पूर्वी LALITA असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील GITA EKNATH TEMBHU RNE हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे. पासपोर्ट करिता अर्ज दाखल आणि FILE- NO- NG4065933988925 हा आहेत.
:-पत्ता:-
बौद्ध विहार परिसर सावरी भंडारा ४४१९०६

**नावात बदल**

माझे पूर्वी NAVSHAD BAKSH असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील NAUSHAD IIAHI BAKSH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता :- दाते सभागृह जवळ, वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर N8664581 वरील माझे NAVAJ BAKSH असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील NAWAZ NAUSHAD BAKSH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
:- पत्ता :-
दाते सभागृह जवळ, वर्धा ४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी MOHAMMAD AKRAM DOSIKACHHI असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील AKRAM MOHAMMAD HARUN DOSHI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
:-पत्ता:-
शास्त्री वॉर्ड हिंगणघाट, वर्धा ४४२३०१

# संक्षिप्त

## दुचाकी अपघातात युवकाचा मृत्यू

**वर्धा -** नागठाणा शिवारातील उड्डाणपुलाजवळ दुचाकी घसरून झालेल्या अपघातात ऋषिकेश पंढरीनाथ ढगे (२५, रा. धोत्रा रेल्वे) याचा मृत्यू झाला. एमएच ३२ एई २३५३ क्रमांकाच्या दुचाकीने तो जात असताना नियंत्रण सुटल्याने तो रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाला. त्याला सावंगी मेघे रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र उपचारादरम्यान मृत्यू झाला. रामनगर पोलिसांनी नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रस्त्यावरील असुरक्षितता आणि अपघातांचे वाढते प्रमाण पुन्हा एकदा समोर आले आहे.

## शेतशिवारातून मोटारपंप व केबल चोरी

**वर्धा -** सावंगी (देरडा) शिवारातील शेतातून मोटारपंप आणि केबल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. गणेश काठोके यांच्या शेतातून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ३० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकऱ्यांमध्ये या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीच्या वेळी शेतशिवारात गस्त वाढवण्याची मागणी होत आहे. पोलिसांनी तपास सुरू केला असून परिसरातील संशयितांवर नजर ठेवली जात आहे.

## प्रतिबंधित सुगंधित तंबाखू जप्त

**हिंगणघाट -** परिसरात अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाई करत प्रतिबंधित सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला आहे. श्रीराम किराणा अँण्ड कोल्ड्रिंक सेंटर येथे नरेश बुल्ले यांच्या ताब्यातून विविध प्रकारचा पानमसाला व तंबाखूचा साठा आढळला. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोग्यास घातक असलेल्या पदार्थांच्या विक्रीवर प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

## बसस्थानकावर वाहतूक नियंत्रकास मारहाण

**समुद्रपूर -** जाम बसस्थानक परिसरात वाहतूक नियंत्रकास मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. कॅन्टीनमध्ये पाण्याच्या बाटली विक्रीवरून वाद निर्माण झाला होता. यावेळी आरोपीने अधिकाऱ्याशी वाद घालत थेट मारहाण केली. याप्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.

## गळफास घेऊन युवकाची आत्महत्या

**वर्धा -** आमला तिगाव येथे आकाश हरीभाऊ चिखलकर (२९) या युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. घराच्या छताला गळफास घेतल्याने त्याचा मृत्यू झाला. ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात शोककळा पसरली आहे. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सावंगी मेघे पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून तपास सुरू आहे. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## विषारी औषध प्राशन; युवकाचा मृत्यू

**हिंगणघाट -** तालुक्यातील टेंभा येथे अमीत तुकाराम खोंड (३०) याचा विषारी औषध प्राशन केल्याने मृत्यू झाला. प्रकृती बिघडल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. वडनेर पोलिसांनी नोंद घेतली आहे. आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत असून मानसिक आरोग्याचा प्रश्न पुन्हा समोर आला आहे.

## विहिरीत आढळला मृतदेह; आत्महत्येचा संशय

**हिंगणघाट -** गव्हा कोल्ही शिवारातील विहिरीत अरुण दिगांबर कडवे (४५, रा. हिंगणघाट) यांचा मृतदेह आढळला. ते घरून न सांगता निघून गेले होते. त्यानंतर त्यांचा मृतदेह विहिरीत आढळल्याने आत्महत्येचा संशय व्यक्त केला जात आहे. समुद्रपूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घटनेचा पुढील तपास सुरू असून कुटुंबीयांमध्ये शोककळा पसरली आहे.

## बेलोरा शिवारात गळफास घेऊन आत्महत्या

**आष्टी -** तालुक्यातील बेलोरा शिवारात पुरुषोत्तम दौलतराव जाने (६६) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना परिसरात खळबळजनक ठरली आहे. त्यांनी टॉवरजवळ गळफास घेतला असल्याची माहिती मिळाली.

आष्टी पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. वृद्धाच्या मृत्यूमुळे गावात शोककळा पसरली आहे.

## अपघातात जखमी युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

**कारंजा (घाडगे) -** तालुक्यातील नीरजकुमार पासवान (२३) याचा अपघातात जखमी झाल्यानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला. गुजरातला जात असताना ट्रक उलटल्याने तो गंभीर जखमी झाला होता. नागपूर येथे उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी नोंद घेतली आहे. तरुणाच्या मृत्यूमुळे कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १४४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल-** atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त



### एमएलसी साधना म्हस्के यांना देण्याची मागणी

**शिराळा-** धनगर समाजातर्फे भाजपने महिला मधुन साधना राजेंद्र म्हस्के यांना देण्याची मागणी होत आहे. अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी महोत्सवी वर्षात धनगर महिलेस कि ज्यांनी २० वर्षांपासून भाजपमध्ये कार्यकर्त्या आहेत.सध्या भाजपाच्या उपाध्यक्ष (अमरावती जिल्हा ग्रामीण) आहेत.साधना म्हस्के २०१२ मध्ये त्यांनी अमरावती जिल्हात अहिल्या महिला परिषदेची स्थापनेत पुढाकार घेऊन अध्यक्षपद भूषविले व संघटनास प्रगती पथावर नेले आज त्यांचें धनगर महिलांचे मोठें संघटन आहे.सर्व स्तरांवर कार्यक्रम सुरू असतात. गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून सहभागी असतात शिवाय डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमात त्यांचा सहभाग असतो.विदर्भातुन धनगर समाज महिला मधुन साधना राजेंद्र म्हस्के यांना एम.एल. सी द्यावी अशी सर्व स्तरातून मागणी होत आहे.



### ओम इंटरनॅशनल स्कूलमध्ये उन्हाळी शिबिर

**अंजनगाव सुजी-** येथील ओम इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिराचे उद्घाटन ओम चॅरिटेबल फाऊंडेशनचे अध्यक्ष दिनेश भोंडे, वैशालीताई भोंडे, सचिव डॉ.राजेश धुर्डे, डॉ. पूजा धुर्डे, कोषाध्यक्ष जितेंद्र कटारमल, सोनल कटारमल यांच्याहस्ते पार पडले. याप्रसंगी प्रमुख अतिथी राजेश बोडखे, प्राचार्या डॉ.पूजा हनवंते, चेतन भागवत उपस्थित होते. उन्हाळी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध उपक्रमव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये योगा, संगीत, नृत्य, अभिनय, चित्रकला, पेंन्टींग, अबॅकस, आर्ट ॲण्ड क्राफ्ट, मेमरी बुस्ट ॲक्टिव्हिटी, इनडोअर ॲण्ड आऊटडोअर गेम्स, व्यक्तिमत्त्व विकास यांचा समावेश करण्यात आलेला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ.पूजा हनवंते, संचालन प्रा. निलेश गोमाशे, आभार प्रदर्शन वंदना उभाड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता नीता खरपकर, दीपाली इंगळे, ज्ञानेश्वरी तुरखडे, चैताली आवारे, दिव्या गुजर, किरण अस्वार तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### कौंडण्यपूर येथे 'चारिका' कार्यक्रम उत्साहात

**तिवसा-** अक्षयतृतीया,पवित्र दिनानिमित्त कौंडण्यपूर येथील धम्मभूमीवर थायलंड येथील भिक्षुणी संघाच्या उपस्थितीत 'चारिका ! आर्यांजी विसुद्धी' या विशेष कार्यक्रमाचे भक्तिभावपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले.ग्रामीण भागातील बुद्धधम्मीय बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला ज्येष्ठ विचारवंत तसेच भारतीय बौद्ध महासभेचे आर्वी तालुकाध्यक्ष मधुकर सवाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची रूपरेषा आखण्यात आली. यावेळी मारोतराव फाटके, किशोर फाटके, श्रीराम पखाले या तसेच बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया विभागीय महासचिव सिद्धार्थ मुंद्रे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमादरम्यान भिक्षुणी संघाच्या उपस्थितीत धम्मदेशना, प्रार्थना आणि चारिकेचा सोहळा अत्यंत शांत, प्रेरणादायी वातावरणात पार पडला. ग्रामीण भागात अशा प्रकारच्या धम्मकार्य कार्यक्रमामुळे समाजात बंधुता, समता आणि शांततेचे वातावरण अधिक दृढ होत असल्याचे उपस्थितांनी सांगितले.यावेळी सुनीता सवाळे, वनमाला झाते, कांताबाई, शुभांगी भील, बेबी अघमयांच्यासह अनेक उपासक-उपासिका मोठ्यासंख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून कार्यक्रमाची शोभा वाढवली आणि धम्मकार्याबद्दल आपली निष्ठा व्यक्त केली.एकूणच, कौडण्यपूर येथील हा चारिका कार्यक्रम श्रद्धा, शिस्त आणि समर्पणाचा उत्तम नमुना ठरला असून, भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे बुद्धधम्माचा प्रसार अधिक व्यापक होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.




### युवकांना लाभली नोकरीची संधी

**नांदगाव खंडेश्वर-** ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी त्यांच्या गावातच उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने द ग्रॅज्युएट फाउंडेशन यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'नोकरी महोत्सव २०२६' या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. डॉ. नितीन टाले यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या नोकरी महोत्सवात एकूण ७३५ उमेदवारांनी नोंदणी करून विविध कंपन्यांच्या मुलाखती दिल्या. त्यापैकी २७१ उमेदवारांची निवड करण्यात आली, तर १२२ जणांना तात्काळ नियुक्तीपत्र मिळाले. महोत्सवात चाकण (पुणे), अमरावती, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवून उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. प्रा.डॉ. निकू खालसा यांच्या प्रमुख उपस्थितीत नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांनी उद्घाटन केले. नगरपंचायतीचे उपाध्यक्ष मोहम्मद जमीर, नगरसेवक अक्षय पारसकर, योगेश चव्हाळे, वासुदेव लोखंडे, मोहम्मद साजिद, अविनाश ब्राम्हणवाडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन प्रा.आशिष बोरकर व प्रा. गजानन काकडे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. रूपेश फुके यांनी केले.

# शिक्षकांसाठी नवीन अभ्यासक्रमानुसार आयोजित प्रशिक्षण तूर्तास स्थगित करा

## प्राथमिक शिक्षक समितीची संचालक, सहसंचालक पुणे यांच्याकडे मागणी

**अमरावती/क्रा.प्र.**
नवीन अभ्यासक्रमानुसार शिक्षकांसाठी इयत्ता २ री, ३ री, ४ थी प्रशिक्षण जिल्हास्तर- ११ ते १४ मे २०२६ आणि तालुकास्तर- दि. १८ मे ते ३० मे २०२६ आयोजित करण्यात येत आहे. नवीन अभ्यासक्रमानुसार शिक्षक प्रशिक्षण आवश्यक आहे यात दुमत नाही.मात्र सदर प्रशिक्षण कालावधी संबंधाने काही बाबी लक्षात घेऊन प्रशिक्षण सत्र सद्यस्थितीत पुढे ढकलणे गरजेचे आहे.अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परीषद पुणेचे संचालक डॉ.हेंमतकुमार वसेकर, सहसंचालक डॉ.कमलादेवी आवटे यांना निवेदनाव्दारे केली आहे.

**या मध्ये जनगणना :** भारताची दशवार्षिक जनगणना सुरु होत असून प्रगणक, पर्यवेक्षक म्हणून राज्यातील जवळपास सर्वच प्राथमिक शिक्षकांच्या सेवा अधिग्रहित करण्यात आलेल्या आहेत. प्रत्यक्ष जनगणनेचा पहिला टप्पा दि. १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत आहे. तसेच मे महिन्याच्या पहिल्या सप्ताहात जनगणनेबाबत प्रशिक्षण आहे. त्यामुळे जनगणनेसाठी सेवा अधिग्रहित केलेल्या शिक्षकांचे नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण नियोजित कालावधीत घेणे शक्यच नाही. मतदार पडताळणी (SIR) कार्यक्रम: मा. भारत



निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सध्या मतदार पडताळणी SIR कार्यक्रम राज्यात सर्वत्र सुरु आहे. या अशैक्षणिक कामासाठी प्राथमिक शिक्षकांच्या सेवा अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे BLO म्हणून नियुक्त शिक्षक नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण घेऊ शकणार नाहीत. दीर्घ सुट्टीत कोणतेही प्रशिक्षण न घेणे: प्राथमिक शिक्षक दिवाळी आणि उन्हाळ्याची दीर्घ सुट्टी उपभोगणारे कर्मचारी असल्याने प्राथमिक शिक्षकांना अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे ३० दिवसाच्या अर्जित रजा अनुज्ञेय नाहीत. दीर्घ सुट्टी लागू असल्याने प्राथमिक शिक्षकांना रजा रोखीकरण अनुज्ञेय नाही. त्याचप्रमाणे उन्हाळी सुट्टी कालावधीचा वाहतूक भत्ता सुद्धा दिल्या जात नाही.राज्यातील प्राथमिक शिक्षक दीर्घ सुट्टी उपभोगतात हा केवळ भास आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांत शिक्षकांशिवाय अन्य कोणताही शिक्षकेत्तर कर्मचारी नसल्याने उन्हाळी सुट्टी कालावधीत (टपाल, पाठ्यपुस्तके प्राप्त करणे, योजनांविषयक कामे, विद्यार्थी प्रविष्ठ करणे, दाखले देणे इत्यादी..) आणि कार्यालयीन सर्व कामकाज शिक्षकांनाच करावे लागते.शिक्षक दीर्घ सुट्टी उपभोगतात म्हणून जर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांप्रमाणे अनेक बाबी शिक्षकांना लागू नाहीत; तर दीर्घ सुट्टी कालावधीत कोणतेही प्रशिक्षण घेण्यास शिक्षकांना बाध्य करणे अनाकलनीय असून तर्कसंगत तर्कसंगत नाही अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती म्हणून ठाम धारणा आहे.

प्राथमिक शिक्षकांना केवळ सुट्टया पाहिजेत असा कोणताही सोयीचा अर्थ कुणाकडूनही न काढता शिक्षकांना असलेल्या तथाकथित दीर्घ सुट्टया बंद करून शिक्षकेत्तर कर्मचारी आणि अधिकाऱ्यांप्रमाणे प्रत्येक शनिवार सह त्याप्रकारचे सर्व नियम व सुविधा लागू कराव्यात आणि कामकाजाच्या दिवसांमध्ये प्रशिक्षणे, कार्यशाळा शासन / प्रशासनाने घ्याव्यात.जनगणना, BLO म्हणून सुरु असलेले अनिवार्य कार्य आणि तथाकथित दीर्घ सुट्टी लक्षात घेऊन नवीन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण तूर्तास स्थगित करून नवीन शैक्षणिक सत्र सुरु झाल्यानंतर शिक्षक प्रशिक्षण घेण्यात यावे अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून मागणी करण्यात आली आहे.

## तीन वेळा विदर्भ केसरीचा मान असणाऱ्या कुस्तीपटूंना शासकीय सेवेत नोकरी द्या

**अचलपूर/वार्ताहर**
तीन वेळा विदर्भ केसरी चा मान असणाऱ्या कुस्तीपटूंना शासकीय सेवेत नोकरीवर समावून घेण्याची मागणी अमरावती जिल्ह्याचे माजी खा.नवनीत राणा आणि माजी खा. रामदास तडस यांनी अचलपूर शहरातील विठ्ठलवाडी मैदानावर झालेल्या तीन दिवसीय पालकमंत्री चषक व ३८ विदर्भ केसरी कुस्ती स्पर्धेमध्ये केले.यावेळी राज्याचे महसूल मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष व माजी खासदार रामदास तडस यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की,विदर्भ केसरी म्हणून तीन वेळा मान असलेल्या कुस्तीपटूंना शासकीय सेवेत नोकरीची संधी उपलब्ध झाली तर त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. एकीकडे महाराष्ट्र केसरी च्या कुस्तीपटूंना शासकीय सेवेत संधी उपलब्ध होते. तर विदर्भ केसरी म्हणून तीन वेळा बहुमान असलेल्या कुस्तीपटूंना का नाही?असा प्रश्न सुद्धा माजी खासदार रामदास तडस यांनी यावेळी उपस्थित केला. त्यानंतर माजी खा.नवनीत राणा यांनी सुद्धा या मागणीला पाठिंबा देत राज्याचे महसूल मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तीन वेळा विदर्भ केसेरिचा मान असलेल्या कुस्तीपटू ना शासकीय नोकरी देण्याची मागणी मांडली. यावर आता राज्य शासन कोणता निर्णय घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.



# जांबू येथे वीज पडून तीन महिला गंभीर; बकरीही ठार

## अवकाळी वातावरणामुळे नागरिकांमध्ये भीतीचे सावट

**धारणी/वार्ताहर**
तालुक्यात रविवारी दुपारच्या सुमारास अवकाळी वातावरणात विजांचा प्रचंड कडकडाट सुरू असताना जांबू येथे वीज कोसळून धक्कादायक घटना घडली. या घटनेत एका बकरीचा जागीच मृत्यू झाला असून घटनास्थळी उपस्थित असलेल्या तीन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. अचानक झालेल्या या प्रकारामुळे गावासह परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी सुमारे साडेतीन वाजताच्या सुमारास जांबू गाव परिसरात अचानक ढगाळ वातावरण निर्माण झाले. काही वेळातच विजांचा कडकडाट सुरू झाला आणि पावसाच्या सरी कोसळण्याची चिन्हे दिसू लागली. याच दरम्यान शेताजवळील परिसरात उभ्या असलेल्या महिलांवर अचानक वीज कोसळली. या घटनेची तीव्रता इतकी होती की, वीज पडताच त्या तिघी महिला तत्काळ बेशुद्ध पडल्या.या घटनेत जखमी झालेल्या महिलांची नावे पार्वती मोतीराम जावरकर (३८), बाली मोतीराम जावरकर (१८) आणि सुनीता श्यामलाल जावरकर (२६) अशी आहेत. त्या तिघीही एकाच कुटुंबातील असल्याची



प्राथमिक माहिती समोर येत आहे. वीज कोसळल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्या शरीरावर भाजल्याचेही चिन्ह आढळून आले आहेत.

एका याच ठिकाणी असलेल्या बकरीवरही वीज कोसळल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. ग्रामीण भागात अशा प्रकारच्या घटनांमुळे पशुधनाचे नुकसान होणे हीदेखील चिंतेची बाब ठरत आहे. घटना घडल्यानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत मदतकार्य सुरू केले. महिलांना बेशुद्ध अवस्थेतून सावरत तातडीने ॲम्ब्युलन्सला पाचारण करण्यात आले. काही नागरिकांनी वाहनांमधूनही मदतीसाठी पुढाकार घेतला. तत्परतेने प्रतिसाद देत जखमी महिलांना उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. सध्या त्यांच्यावर डॉक्टरांकडून उपचार सुरू असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.दरम्यान, दुपारपासूनच जांबू गावासह संपूर्ण परिसरात वातावरण ढगाळ झाले होते. विजांचा राहिल्याने नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला होता; मात्र, काहीजण शेतीकामानिमित्त बाहेर असल्याने ही दुर्घटना घडल्याचे स्थानिकांनी सांगितले. सायंकाळपर्यंत परिसरात विजांचा कडकडाट सुरूच होता आणि पावसाचे वातावरण कायम होते.या घटनेमुळे जांबू गावासह परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये चिंतेचे सावट आहे. नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर सावधगिरी बाळगणे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे असल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

## झेंड्यांच्या जिर्णोध्दार पथ यात्रेच्या सोहळ्याचा समारोप

**कुऱ्हा/वार्ताहर**
तालुक्यातील रुक्मिणीच माहेरघर समजल्या जाणाऱ्या तसेच विदर्भाची पांढरी म्हणुन ओडखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र कौडण्यपुर येथे श्री अवधूत महाराजांच्या झेंडे जीर्णोद्धाराच्या रथ यात्रेचा समारोप नुकताच पार पडला.

भक्तिमय वातावरणात झालेल्या या सोहळ्याला हजारोंच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. या पथ यात्रेची सुरूवात श्रीसंत अवधूत महाराज चातूर्पती देवस्थान कौडण्यपूर येथून शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आणि भजन पूजनाने झाली.



भजन पूजनाच्या गजरात आणि कृष्ण महाराज धनी अवधुत नामघोषत ४ विशालकाय झेंडे आपल्या खांद्यावर उचलून डोंगरावरून खाली आणले आणि त्याची विधिवद पूजा करून त्यांना मोठ्या ट्रक मध्ये टाकून परतीचा प्रवास सुरू केला.या पथ यात्रेत संस्थेचे अध्यक्ष रामदास निवल, उपाध्यक्ष राजण खारकर, कोषाध्यक्ष वासुदेव चोपकर, महासचिव शिशुपाल इखार, संचालक मंडळातील मुकुंद चाफले, लाहानु वानखेडे, वसंत लोखंडे, प्रमोद इंगोले, नामदेव बेलगे, अवधूत शिरपुरे, प्रवीण खारकर, हरिभाऊ खारकर, अंकुश धुमंखेडे, किशोर माटे, देवराव माहूरे, संत बहिणाबाई देवस्थान जळगाव अध्यक्षचे रमेश अडसळ आणि संच हेगळूजी महाराज संस्थानचे विश्वस्त योगेश गुजर आणि संच चतुरपती भजन मंडळ जळगाव, चतूर्पती भजन मंडळ वर्ध मनेरी, बहिणाबाई भजन मंडळ जळगाव येथील सरस्वता वाघ आणि संच त्याच प्रमाणे हेंगडुजी संस्थान देवगाव, विठोबा संस्थान सावंगा, प्रवीण वाघ, अजय डाखोरे, संदीप नीवल, बालाभाऊ शेंडे, सूनंदा दारोकर, आशा वानखेडे, विलास खाजबागे, शारद मोरे, विनायक मोडगे, योगेश लोंधे, कैलाश वाणखडे यांच्या सोबतच मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री संत अवधूत महाराज चतूर्पती संस्थान कौडण्यपूर व गावकरी मंडळी यांनी परिश्रम घेतले.

## बस स्थानकावर दुसऱ्या दिवशीही लालपरी बंद



**आसेगाव पूर्णा-** बस स्थानकावर सलग दुसऱ्या दिवशी एसटी बस बंद पडल्याची घटना सोमवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. अंजनगावहून अमरावतीकडे जाणारी एमएच ४० Y ५३९३ ही बस अचानक बंद पडल्याने प्रवाशांची गैरसोय झाली.लग्नसराईचा हंगाम असल्यामुळे बसमध्ये मोठी गर्दी होती. त्यामुळे प्रवाशांना दुसऱ्या बसमध्ये बसवताना वाहकाला मोठी कसरत करावी लागली. यावेळी काही प्रवासी व वाहक यांच्यात वादही झाला.या प्रकारामुळे बस स्थानकावर काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. परिवहन महामंडळाच्या वारंवार होणाऱ्या अशा घटनांमुळे तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# यावली शहीद येथे राष्ट्रसंतांचा जन्मोत्सव

**अमरावती/का.प्र.**
वं. राष्ट्रसंत जन्मोत्सव समिती श्री क्षेत्र यावली शहीद, नरसिंगपूरच्या वतीने परिसरातील ग्रामस्थांच्या सहभागातून दरवर्षी साजरा होणारा वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज जन्मोत्सव अर्थात ग्राम जयंती महोत्सव वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मस्थान स्मृती मंदिर ग्राम यावली शहीद येथे २३ ते ३० एप्रिल दरम्यान विविध धार्मिक,सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम तथा बाल संस्कार शिबिर, भव्य दिंडी स्पर्धा, महिला मेळावा, रामधुन व राष्ट्रसंत जन्मावतरण सोहळा अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्राम जयंती महोत्सवाचा प्रारंभ दि. २३ ला सकाळी ५ वा.रामचंद्र दादा कांडलकर यांच्या हस्ते 'श्री 'चे महाअभिषेक पूजन आणि दिव्यांगी कांडलकर व तिलक कांडलकर यांच्या हस्ते तीर्थस्थापनेने होणार आहे. दि.२३ ते२९ पर्यंत रोज सकाळी ५. ३० ते ६. ०० सामुहिक ध्यान व चिंतन ६. ०० ते ६. ३० रामधून व भाषण आणि ८.०० वा. श्री गुरुदेव बाल सुसंस्कार शिबिर, दुपारी ३.०० वा. ह. भ. प. सुनील महाराज लांजूळकर यांचे संगीत ग्रामगीता प्रवचन, सायंकाळी ७.०० वा. सामुदायिक प्रार्थना व प्रबोधन आणि रात्री ९.०० वा. अनुक्रमे ह. भ .प. विवेक महाराज कुरूमकर, ह. भ. प. कु. कृष्णाई लांजुळकर , ह .भ .प. गणेश महाराज चांदेकर, ह.भ.प.क्रांती काळे , ह .भ .प. तेजस्विनीताई पाठक, ह. भ .प. प्रशांत महाराज ठाकरे यांचे कीर्तनाचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले. दि. २८ सकाळी ६ ते ८ ला रामधून जन्मस्थान मोक्षधाम बाग (स्मशानभूमी यावली) येथे मुर्त्यांचे पूजन तर जागृती महिला मंडळ यावली शहीदच्या वतीने दु. ३.०० वा. महिला मेळावा व माहेरवासिनीचे मनोगत कार्यक्रम होत आहे.

दि. २९ ला सकाळी ८ वा. श्री गुरुदेव बाल सुसंस्कार शिबिर समारोप कार्यक्रम. आणि

मंगळवार दि. ३० ला विशेष



कार्यक्रम म्हणजे पहाटे ४.०० ते ६.०० राष्ट्रसंत जन्मावतरण व पुष्पांजली सोहळा सादरकर्ते गोपाल सालोडकर व संच गुरुगुंज, संयोजक डॉ. देवेंद्र यादव गुरुकुंज,संचालन श्रीकृष्ण पखाले अमरावती करतील. सदर कार्यक्रमाला खा.बळवंत वानखडे,आ. राजेंद्र वानखडे, माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर तथा अनेक गणमान्य मान्यवर उपस्थित राहणार आहे.

त्यानंतर सकाळी ६.०० वा. सामूहिक ध्यान ,६.३० वा.भव्य ग्राम प्रदक्षिणा व स्पर्धात्मक पालखी दिंडी सोहळा, १०.३० ला ह. भ. प. लक्ष्मणदास काळे महाराज यांचे गोपालकाल्याचे कीर्तन दु. १२. ३० ला सत्कार समारंभ आणि दुपारी १ ते ३ दरम्यान परमपूज्य श्री संत जयश्रीराम कांडलकर महाराज यांचे स्मृत्यर्थ रामचंद्र दादा कांडलकर यांच्या सौजन्याने महाप्रसादाचा कार्यक्रम. दुपारी ३.०० वा. पालखी निरोप समारंभ. सायंकाळी ६.३० वा. सामूहिक प्रार्थना व डॉ. वसंत देशमुख यावली यांचे समारोपीय भाषण आणि रात्री ७. ३० ते ९ वा. ऐतिहासिक सत्यावर आधारित दोन अंकी नाटक 'ज्योतिबांची सावली सावित्री माऊली'

सादरकर्ते तेजांकुर बहुउद्देशीय संस्था, परतवाडा या सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा .असे वं. राष्ट्रसंत जन्मोत्सव समिती, श्री क्षेत्र यावली शहीद, नरसिंगपूर यांनी एका पत्रकाद्वारे कळविले आहे.

# मेळघाट बफर झोन निर्मितीवर ‘खाण - क्रशर लॉबी’ चा अदृश्य प्रभाव?

## अर्थपूर्ण समजुतीतून गाजीपूर-रुदाळी गावांचा ठराव दडपल्याचा गंभीर आरोप

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** मेळघाट बफर झोन निर्मिती प्रक्रियेवर आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून अकोट तालुक्यातील नरनाळा अभयारण्यालगतच्या पोपटखेड गट ग्रामपंचायतीतील गाजीपूर आणि रुदाळी गावांना जाणीवपूर्वक बफर झोनमधून वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. विशेष म्हणजे, या निर्णयामागे खाण व क्रशर धारकांचे हितसंबंध जपले गेल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेत ‘अर्थपूर्ण समजुती’चा संशय व्यक्त होत आहे.

पोपटखेड गट ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या या दोन्ही गावांचा ठराव संबंधित वन्यजीव विभागाच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी दडपल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकरणी स्वतंत्र एसआयटी नेमून चौकशी केल्यास मोठ्या प्रमाणात अनियमितता उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

गेल्या काही वर्षांत गाजीपूर व रुदाळी परिसरात खाण, स्टोन क्रशर आणि डांबर हॉट



### ■ राष्ट्रीय हरित लवादाकडे धाव घेणार!

या प्रकरणात वनविभाग, महसूल विभाग, खाणीकर्म विभाग तसेच पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई केली नाही, तर सर्व कागदपत्रे, वृत्तपत्रातील बातम्या व पुरावे सादर करून संबंधित अधिकाऱ्यांनाच पक्षकार बनवत राष्ट्रीय हरित लवादात खटला दाखल करण्याचा इशारा अकोटातील एका पर्यावरणप्रेमीने दिला आहे.

मिक्स प्लांट यांसारख्या उद्योगांची झपाट्याने वाढ झाली आहे. वनपरिक्षेत्राला लागूनच काही मीटर अंतरावर हे उद्योग सुरू असतानाही अनेकांकडे आवश्यक पर्यावरणीय परवानग्या नसल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे.

स्थानिकांच्या तक्रारीनुसार, काही अपवाद वगळता अनेक खदानींमध्ये जिलेटीन व डिटोनेटरसारख्या स्फोटकांचा सर्रास वापर केला जातो. दिवसरात्र सुरू असलेल्या क्रशरमुळे निर्माण होणारा कर्णकर्कश आवाज आणि धुळीचे प्रदूषण यामुळे वन्यजीवांच्या अधिवासावर थेट परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

वन्यजीवांचे संरक्षण व पर्यावरण संवर्धन हा बफर झोनचा मूळ उद्देश असताना, प्रत्यक्षात मात्र या भागात उद्योगांना मोकळीक मिळत असल्याची टीका पर्यावरणप्रेमी करत आहेत. तर या ‘ जाणीवपूर्वक वगळलेल्या

### ■ ‘वन सदृश्य’ म्हणजेही जंगलच!

सर्वोच्च न्यायालयाने टी. एन. गोडावरमन प्रकरणात जंगलाची व्याख्या करताना स्पष्ट केले आहे की, मोठ्या प्रमाणात वृक्षसंपदा असलेला कोणताही परिसर, तो अधिकृत अभयारण्य म्हणून नोंदलेला नसला तरी ‘जंगल’ म्हणूनच गणला जाईल. गाजीपूर व रुदाळी परिसरात मोठ्या प्रमाणावर वनसदृश्य क्षेत्र अस्तित्वात असून त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी वनविभागावर आहे. मात्र, या प्रकरणात अधिकाऱ्यांची उदासीनता स्पष्टपणे दिसून येत असल्याचा आरोप आहे.

### ■ मॉनिटरिंग समितीचेही ‘मौन’ संशयास्पद

इको सेन्सिटिव्ह झोन मॉनिटरिंग समितीसमोर हा मुद्दा आल्यानंतरही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. समितीचे अध्यक्ष असलेले अमरावती जिल्हाधिकारी, सदस्य म्हणून अकोला जिल्हाधिकारी यांच्यासह इतर सदस्यही या गंभीर विषयावर मौन बाळगत असल्याची चर्चा आहे. या शांततेमुळे ‘पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे का?’ असा सवाल उपस्थित होत आहे.

बफर झोनचा वापर वन्यजीवांसाठी नव्हे, तर खाण व क्रशर धारकांच्या फायद्यासाठी होत आहे का?’ असा यक्ष प्रश्न सुद्धा यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि गाजीपूर–रुदाळी गावांचा ठराव सार्वजनिक करून बफर झोन प्रक्रियेची पुनर्रचना करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. पर्यावरणाच्या नावाखाली उद्योगांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोप खरा ठरल्यास हा प्रकार प्रशासनासाठी मोठा धक्का मानला जाईल, यात तिळमात्र शंका नाही.

# ऑनलाईन बेटिंगचा पर्दाफाश; तिघे ताब्यात



### - क्रिकेट सट्ट्याविरोधात विशेष मोहिम

## ‘५.६० लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात सुरू असलेल्या ऑनलाईन क्रिकेट सट्टूयावर गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तब्बल ५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून चालक-मालकासह तीन जणांना ताब्यात घेतले आहे. पोलीस आयुक्तांच्या आदेशानंतर शहरात क्रिकेट सट्ट्याविरोधात विशेष मोहिम राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत ही धाड टाकण्यात आली.

२० एप्रिल २०२६ रोजी पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना गुप्त माहिती मिळाली की, फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राजुरा येथे एका घरामध्ये महेश पाटकर हा काही साथीदारांसह गुजरात टायटन्स विरुद्ध मुंबई इंडियन्स या आयपीएल सामन्यावर ऑनलाईन बेटिंग ॲपच्या माध्यमातून पैशांची बाजी लावत आहे. या खात्रीलायक माहितीनंतर गुन्हे शाखेच्या पथकाने पंचांसह घटनास्थळी धाड टाकली असता तेथे तीन जण मोबाईल व लॅपटॉपच्या सहाय्याने क्रिकेट सट्ट्याचे व्यवहार करताना आढळून आले. आरोपी मोबाईल ॲपद्वारे व्यवहार करून त्याची नोंद रजिस्टरमध्ये ठेवत असल्याचेही समोर आले.



पोलिसांनी तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्या मोबाईल व लॅपटॉपची तपासणी केली असता त्यामध्ये सट्ट्याचे व्यवहार, ‘खाई-लावगडी’चे रेकॉर्डिंग तसेच ऑनलाईन बेटिंगचे पुरावे आढळून आले. आरोपींनी शासनाने प्रतिबंधित केलेल्या बेटिंग ॲपचा वापर करून कोणताही कर न भरता गैरकायदेशीररीत्या सट्टा चालवून शासनाची ☞(पान २ वर)

# भ्रष्टाचारावर गाजली महापालिकेची आमसभा

## प्रशासक आष्टीकर यांच्या कार्यकाळातील कामांची होणार चौकशी

### सेवानिवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेत होणार समितीचे गठन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आज सोमवार २० एप्रिल रोजी झालेल्या आमसभेमध्ये प्रशासकीय कार्यकाळात झालेल्या कथित भ्रष्टाचार, निविदा प्रक्रिया आणि स्वच्छतेच्या अहवालावरून जोरदार खडाजंगी झाली.





तत्कालीन आयुक्त डॉ. प्रवीण आष्टीकर यांच्या कार्यकाळात विकास शुल्क, नगरोत्थान, दलित वस्ती आणि मनपा निधीतील कामांमध्ये कोट्यावधींचे भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले. यादरम्यान स्वच्छता समितीचा अहवाल आमसभेमध्ये सादर करण्यात आला. महापौर श्रीचंद तेजवानी यांनी भ्रष्टाचार प्रकरणाची गंभीर दखल घेत सेवानिवृत्त न्यायाधीश असलेली चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले. यामध्ये अभियंताचा समावेश राहणार आहे. चौकशी अहवाल☞(पान २ वर)

# ‘बंटी-बबली’ स्टाईल चोरीचा पर्दाफाश

## नोकर दाम्पत्याकडून १२.३० लाखांचा मुद्देमाल जप्त

### -पती अटकेत, पत्नीची चौकशी सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरातील विश्वासू नोकरच चोर ठरल्याची धक्कादायक घटना गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. ‘बंटी-बबली’ स्टाईलने मालकाच्या घरातच चोरी करणाऱ्या दाम्पत्याचा गाडगेनगर पोलिसांच्या डी.बी. पथकाने पर्दाफाश करत तब्बल १२ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



याप्रकरणी श्रवण पवन गट्टाणी (वय ३२, रा. केशव कॉलनी, विघा भारती रोड, अमरावती) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ७ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान त्यांच्या घरात काम करणारा नोकर प्रविण पंजाबराव पवार (वय ३५, रा. नांदरूण, ता. दर्यापुर) व त्याची पत्नी पुनम पवार (वय २१) यांनी घरातून ७ लाखांची रोकड व सोन्याचे दागिने चोरले.

तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान डी.बी. पथकाने संशयित दाम्पत्याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्यांनी चोरीची कबुली दिली. त्यानंतर आरोपी पतीला अटक करण्यात आली.

पोलिसांनी पीसीआरदरम्यान आरोपींकडून खर्च वजा करून उर्वरित ६ लाख ३५ हजार रुपयांची रोकड, ३६ ग्रॅमचे सोन्याचे ब्रेसलेट (अंदाजे ५.४० लाख), ३ ग्रॅमची अंगठी (३० हजार) व इतर दागिने असा एकूण १२ लाख ३० हजार रुपयांचा ☞(पान २ वर)

### तापमानाची तीव्रता :

# जिल्ह्यातील शाळा सकाळी १० वाजेपर्यंतच भरणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भात वाढत असलेल्या तापमानाची तीव्रता आणि भारतीय हवामान विभागाने वर्तवलेला उष्मालाटेचा इशारा लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांच्या वेळेत कपात करण्याचे आदेश जारी केले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील शाळा आता दहा वाजेपर्यंत भरणार आहेत.

नव्या वेळापत्रकानुसार जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा, अंगणवाडी आणि नर्सरी आता केवळ सकाळी ७ ते १० या वेळेतच भरतील. हा आदेश २१ एप्रिल २०२६ ते ३० एप्रिल २०२६ पर्यंत लागू राहील. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सकाळी १० नंतरच्या उर्वरित तासिका ऑनलाईन किंवा डिजिटल माध्यमातून घेण्याचे नियोजन करण्याच्या सूचना शाळांना देण्यात आल्या आहेत. हा आदेश सर्व अनुदानित, विनाअनुदानित तसेच खासगी शाळांसाठी बंधनकारक असेल.

वाढत्या उष्म्याचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर ☞(पान २ वर)

## सर्पदंशाने युवकाचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** सर्पदंशाच्या घटनेत ३४ वर्षीय युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना१९ एप्रिल रोजी समोर आली आहे. आकाश मनोहरराव चेडे (वय ३४, रा. वणी बेलखेडा, ब्राम्हणवाडा थडी, ता. चांदूर बाजार) असे मृताचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आकाश चेडे यांना सर्पदंश झाल्यानंतर तातडीने उपचारासाठी प्रथम पीडीएमसी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले. १९ एप्रिल रोजी रात्री सुमारे ८.५० वाजता त्यांना रुग्णालयात आणण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तातडीने तपासणी करून उपचार सुरू करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यापूर्वीच त्यांची प्रकृती अत्यंत खालावलेली होती. ☞(पान २ वर)

# सफाई कर्मचाऱ्यांचे मानधन कंत्राटदारामुळे रखडले

### अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीने निवेदन

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** कंत्राटी मेहतर सफाई कामगार नाली व झडाई कामगार यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत तसेच थकीत इ.पी.एफ. व इ.एस.आय. सी. मिळण्याकरीता अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती तर्फे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली.



नगरपरीषदेमार्फत घन कचरा,नाली सफाई,झडाई हीं सर्व कामे ठेकेदारी पद्धतीने देण्यात आली असून प्रत्येक वेळी प्रशासनाला संबंधित विषयावर पत्र देऊन अवगत केले परंतु नेहमीच मेहतर समाजावर होत असलेला अन्याय हा नगरपरिषद चे संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्या तर्फे केल्या जात असल्याचा आरोप भष्टाचार निर्मुलन समितीचे अध्यक्ष सचिन गावंडे यांनी केला आहे.

सध्या स्थितीत ठेकेदाराने ☞(पान २ वर)

## विपुल छाबडा यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** लकी फर्निचरचे संचालक आणि रिफॉर्म्स परिवाराचे सक्रिय सदस्य विवेक (लकी) छाबडा यांचे थोरले बंधू विपुल (प्रिन्स) राजनजी छाबडा यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या आकस्मिक जाण्याने शहरातील व्यापारी वर्तुळात आणि मित्रपरिवारात मोठी शोककळा पसरली आहे.



त्यांच्या निधनानंतर कॅम्प परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.

विपुल छाबडा यांची अंतिम यात्रा मंगळवार दि. २१ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता जोशी स्टेट, गणेशा किंग अपार्टमेंट कॅम्प परिसरातील ’बरकत’ निवासस्थानावरून (जोशी इस्टेट, IMA हॉलच्या मागे) निघणार आहे. गुरुद्वारा श्री गुरुसिंह सभा मार्गे ही यात्रा हिंदू स्मशानभूमीकडे मार्गस्थ होईल.तेथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# डिव्हायडरला कार धडकल्याने एकाचा मृत्यू

### -वलगावजवळ भीषण अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत वलगाव–चांदूर बाजार मार्गावरील टर्निंगजवळ झालेल्या भीषण अपघातात कारमधील एका प्रवाशाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. डिव्हायडरला कार जोरात धडकल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे.

मृत व्यक्तीचे नाव आशुतोष परमानंद मेश्राम (वय ५१, रा. सालदाड, पालघर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १८ एप्रिल रोजी रात्री सुमारे १०.५५ वाजता त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. हा अपघात वलगाव ते चांदूर फाटा दरम्यानच्या वळणावर घडल्याचे समजते. अपघाताची तीव्रता मोठी असल्याने कारचे मोठे नुकसान झाले आहे. ☞(पान २ वर)

# तासिका तत्वावरील प्राध्यापकांना पूर्ण सत्रासाठी मान्यता द्यावी - प्रा डॉ. प्रशांत विघे

**अमरावता/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत घड्याळी तासिका (CHB) तत्वावर कार्यरत प्राध्यापकांना केवळ ९ महिन्यांपुरतेच अप्रोल (Approval) दिले जात असल्यामुळे त्यांच्या वेतनावर अन्याय होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. प्रशांत विघे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने प्र-कुलगुरूंना निवेदन सादर करून Approval कालावधी पूर्ण शैक्षणिक सत्रासाठी (किमान १० ते ११ महिने) देण्याची ठाम मागणी केली आहे.



सध्या विद्यापीठाचे शैक्षणिक सत्र एप्रिल अखेरपर्यंत असून, चालू वर्षी ते २ मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आले आहे. मात्र अप्रोल केवळ ९ महिन्यांसाठीच दिला जात असल्याने एप्रिल महिन्यात अध्यापन, प्रात्यक्षिके, परीक्षा तयारी व मूल्यमापन अशी महत्त्वाची जबाबदारी पार पाडूनही प्राध्यापकांना ☞(पान २ वर)

## रहाटगाव रिंग रोडवर अपघात जखमी वृद्ध पादचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील रहाटगाव रिंग रोडवर मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या ६५ वर्षीय वृद्धाला अज्ञात वाहनाने मागून जोरदार धडक दिली. गंभीर जखमी झालेल्या या पादचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. १७ एप्रिल रोजी घडलेल्या या अपघातानंतर दोन दिवस मृत्यूशी झुंज देत अखेर १९ एप्रिल रोजी त्यांनी प्राण सोडले.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाकर रायभानजी रायबोले (वय ६५), रा. विश्वशांती नगर, शेगाव–रहाटगाव रोड, हे नेहमीप्रमाणे सकाळी फिरण्यासाठी बाहेर पडले होते. यावेळी पाठीमागून येणाऱ्या भरधाव अज्ञात वाहनाने त्यांना जबर धडक दिली. धडक इतकी भीषण होती की ते रस्त्यावर कोसळून गंभीर जखमी झाले. अपघातानंतर संबांधित वाहन चालक घटनास्थळावरून☞(पान २